म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं. २००७०
१९५८
REFBK 0003727
REFBK-0003727

# कुमुद–बांधव.

( रा. सदाशिव अनंत शुक्ल यांच्या कवितेचा संग्रह. )

## भाग १ ला.

REFBK-0003727

REFBK-0003727

सन १९२८

ग्रंथालय
३५२७

किंमत १॥ रु.

प्रकाशक—शंकर नरहर जोशी.
चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ. पुणें.

( या पुस्तका संबंधी सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. )

मुद्रक—
लक्ष्मण भाऊराव कोकाटे,
' हनुमान प्रेस ' ३०० सदाशिव पे.
पुणें शहर

# अनुक्रमणिका


| कवितेचें नांव | पृष्ठांक. |
| --- | --- |
| अभिवंदन ... | ... १ |
| मागत्याचा जयजयकार... | ... २ |
| र्गीय संगीत ... | ... ३ |
| रहह महादेव बोला ... | ... ५ |
| ाड हो पाळ ... | ... ७ |
| हा आणि अता ... | ... ८ |
| सरी ... | ... ८ |
| विश्वाचा बगीचा ... | ...१० |
| हिंदमातेची हांक ... | ...१२ |
| धन्य ती माउली ... | ...१३ |
| प्रबोध गान ... | ...१३ |
| सख्या कोकिळा ... | ...१५ |
| प्रीतीचा तिळगुळ ... | .. १८ |
| दिव्य लावण्य ... | ...१९ |
| अं. हं, बोलायचं नाही | ...२० |
| धिःकार ... | ...२२ |
| हिंदुमातेच्या वीरपुत्रा ... | ...२४ |
| तें चुंबन ... | ...२६ |
| कां शंका ... | ...२७ |
| दादा ? दादा ! ... | ...२८ |
| आम्ही मराठे गडी ... | ...२९ |
| ओझरतें दर्शन ... | ...३१ |
| हा हन्त ... | ...३२ |

| कवितेचें नांव | पृष्ठांक |
| --- | --- |
| १०५ ... | ... ३३ |
| निरोप... ... | ... ३५ |
| टिळक देव गेले ... | ... ३६ |
| अंतिम विनंति ... | ... ३९ |
| माझी मानसपूजा... | ... ४० |
| आली संधि दवडूं नका ! | ... ४० |
| उत्कंठा ... | ... ४२ |
| विरही जीवास ... | ... ४३ |
| अंगाई ... | ... ४४ |
| देवा ! निराशाच दे | ... ४६ |
| प्रणयवंचितेचे उद्गार ! | ... ४७ |
| स्मशान संगीत ... | ... ४८ |
| लक्ष्मीपूजन ... | ... ५० |
| निराशेनंतर–! ... | ... ५७ |
| दैवलेख... ... | ... ५८ |
| स्वर्गसोपान ... | ... ५९ |
| फुलपाखीण ... | ... ६० |
| जीवाची मुशाफरी... | ... ६३ |
| बंदिवान् हिंदपुत्रास– | ... ६५ |
| वेडा तर खराच ... | ... ६६ |
| बा निर्झरा ! ... | ... ६८ |
| बुलबुलास – ... | ... ७० |
| प्रशंसा–! ... | ... ७१ |

| कवितेचें नांव. | पृष्ठांक |
| --- | --- |
| विजय... | ७२ |
| जोवि, आशा आणि ! | ७२ |
| सुवर्ण-शृंखला. | ७३ |
| वळचणिची पाल ! | ७५ |
| विधवेचें गाणें | ७७ |
| काळी चंद्रकळा !... | ७९ |
| लीलावतीस | ७९ |
| पंजरस्थ चंडोलास- | ८० |
| काव्यनिर्झर | ८३ |
| उषावती | ८४ |
| हंसऱ्या तारकेस-... | ८५ |
| बोल गुलाबा गड्या ! | ८७ |
| हृद्गत .... | ८९ |
| चल-आण विषाचा प्याला ! ... | ९१ |
| राष्ट्र-संन्यासी | ९४ |
| दुर्दैवास आव्हान ... | ९५ |
| तो क्षण-पहिला कीं शेवटला ? | ९६ |
| वंदे मातरम् | ९७ |
| शिलालेख | ९८ |
| प्रेमाची फसवणूक | १०० |

| कवितेचें नांव | पृष्ठांक |
| --- | --- |
| भवानी तलवार ... | १०२ |
| बा कदंबा ! | १०६ |
| मधुर बाला | १०७ |
| ध्वजारोपण | १०८ |
| रुग्णशय्येवरचे विचार | १०९ |
| प्रेमाचा प्रभाव | ११० |
| हाकाळ धन्वंतरी ... | १११ |
| ताई-! | ११[illegible] |
| निराशेतील आशा... | ११२ |
| सौख्याशा जळलीच-! | ११३ |
| पुनर्दर्शन | ११[illegible] |
| काव्योद्यान | ११५ |
| गड कविते ! | ११५ |
| अतिपरिचयादवज्ञा-! | ११६ |
| ताजमहाल | ११७ |
| मी गाणार असाच नित्य- | ११७ |
| देवि शारदे ! | ११८ |
| काळाचा खेळ | १ |
| राधारहस्य | ३५ |

## समर्पण

मातृपितृचरणों–

# शुद्धिपत्रक

| पान | ओळ | शुद्ध | अशुद्ध |
|---|---|---|---|
| २५ | ८ | काळाचा खेळ<br>' करूं लागला आपणहि मग जेव्हां स्नानाला | |
| २६ | ६ वी | मोल | मोज |
| २८ | खालून ९ वी | पारि | परी |
| ३९ | ५ वी | जगवीण | जगवीणें |
| ५० | ३ री | कपान | कमान |
| ४३ | खालून १० वी ओळ अशी वाचावी. | मधु आशामय तोच चित्रपट जगतीं प्रीतीचा. | |
| ४८ | खालून २ री | प्रळयकाळ काळनच | प्रळयकाळ नच |
| ५० | चवथी ओळ अशी वाचावी | जन्मसिद्ध हक्कांचें मोठें माजे रण स्वातंत्र्याचें | |
| ५६ | ११ वी | अधिष्ठान | अधिष्ठान |
| ७० | खालून ४ थी | खरें | स्वैर |
| ,, | ,, ५ वी | नी | ती |
| ७१ | ७ वी | प्रेमाला | प्रेमला |
| ७५ | खालून ६ वी | जी | जो |
| ८२ | १ ली | अंतरली | अंथरली |
| ८५ | ८ वी | असा | ऐसा |
| ८६ | २ री | लास्याची | हास्याची |
| ८८ | खालून १ ली | दिव्यना | दिव्यता |
| ९२ | १६ | निर्दोषी ठरणार परी | |
| ९२ | खालून ६ वी | निर्दोषी ठरणार नपरी | निर्दोषी ठरणार परी |
| ११० | ४ थी | चिरायू देव देईल कां ? | चिरायू दैवीं आहे कां ? |

# प्रस्तावना

रा. सदाशिव अनंत शुक्ल यांची ' तेव्हां आणि आतां ' ही या संग्रहांतील
ोता, मासिकांचे अंक चाळीत असतां, माझ्या प्रथम वाचनांत आली.
नाचा वाद त्यावेळीं नुकताच सुरू झाला होता. आणि, ' रविकिरण-
ा'नें त्या वादांत विशेष उत्साहानें मन घातलें असल्यामुळें, नियतका-
ून येणाऱ्या सुनीतांकडे तेव्हां सहजच लवकर लक्ष जात असे. शुक्लांच्या त्या
तील मध्यवर्ती कल्पना जुनीच आहे. तथापि नवीन कवि जुनी कल्पना
ोमानें व्यक्त करितात, त्यावरून त्यांची योग्यता दिसून येते. लहान
ालावयाला लागलीं कीं, पहिल्यांदा नेहमीं कानांवर पडणारे शब्दच
वयाचा प्रयत्न करितात; व त्याच प्रयत्नांतून त्यांच्या वाणीचा पुढें
ः होत जातो. शिवाय, कला ही जितकी स्वयंस्फूर्त तितकीच अनुकर-
कहि असते. चित्रकार आपल्या प्रतिभेच्या सहाय्यानें चित्र निर्माण
, हें खरें. पण म्हणून, चित्रांतील हर एक दृश्याचे रूपरंग किंवा व्यक्तीचे
। व आविर्भाव तो स्वतःच्या कल्पनाकोषांतून काढतो, असें थोडेंच
नाहीं तर, ' मॉडेल ' करितां रस्त्यांतून जाणाऱ्या मुलींच्या मागून
ाचा प्रसंग रोझेटीवर कां आला असता ? त्यानंतर सर्वच प्रमुख नियत-
लेकांतून शुक्लांच्या कविता प्रसिद्ध होऊं लागल्या. आणि, अगदीं अली-
त्यांचें ' सौभाग्यलक्ष्मी ' हें नाटकहि रंगभूमीवर आलें असल्यामुळें, कदा-
थोड्याच दिवसांत त्यांची लोकप्रिय कवींत गणना होऊं लागेल,
ाटतें.

वे हा नाटककार नाहीं, असें क्वचितच घडतें. जगांतील बहुतेक नामांकित
नाट्यवाङ्मयांत भर घातलेली दृष्टीस पडते. याचें कारण अगदीं उघड
' काव्यं यशसेऽर्थकृते ' हे मम्मटांनीं वर्णिलेले काव्यरचनेचे दोनहि

उद्देश नाटक लिहिल्यानें एकदम व बहुधा हटकून सफळ होतात. अर्नोल्ड बेनेट यांनीं, कलावंतांना द्रव्यदृष्टि असते कीं नाहीं यांची चर्चा करितांना, असें म्हटलें आहे कीं, ' द्रव्यलाभाच्या आशेनें प्रेरित होऊन कवि लेखनाला प्रवृत्त होतील, हें संभवत नाहीं. त्यांना ती आशा करावयाला जागाच नसते. परंतु इतर कलावंतांचें ( Artist ) मात्र तसें नाहीं. ' या त्यांच्या उद्गारांची सत्यता निदान या उद्योगयुगांत तरी नित्य अनुभवाला येत आहे. वस्तुतः नाटक आणि काव्य हे कवितेचेच दोन रूपमात्र भिन्न प्रकार आहेत. विनोद, कादंबरी, कथा या वाङ्मयाच्या ललित प्रकारांत, कवितेला जर कोणता अतिशय जवळचा व जिव्हाळ्याचा प्रकार असेल, तर तो नाटक हाच होय; आणि म्हणून, संस्कृतांतहि नाटकाला ' दृश्य काव्य ' असें म्हणतात. परंतु, आम्रवृक्षाची मंजरी कितीहि उन्मादक असली, व पंचबाणाचें अमोघ प्रहरण म्हणून उल्लु कवींनीं तिचें कितीहि कौतुक केलें, तरी बाजारांत मोल फक्त आम्रफलालाच येतें. All art is quite useless—' कला तेवढी सर्व निरुपयोगी ' हा ऑस्कर वाइल्डचा सिद्धांत जर कुणाच्या कारागिरीला सर्वस्वी लागू पडत असेल, तर तो कवींच्या. त्यांचा उद्योग द्रव्यलाभाच्याच काय, पण यशोधन प्राप्त होण्याच्या दृष्टीनेंहि पुष्कळ वेळां निष्फळ ठरतो. अशा स्थितींत नाट्यलेखनाचा मोह जर कवींना पडला, तर त्यांत नवल काय ? शिवाय नाट्यलेखन केवळ पैशाच्याच दृष्टीनें फायदेशीर पडतें, असें नाहीं. नाटककाराला शब्दसृष्टींतील इतर कलावंतांहून लौकिकाचाहि लाभ लवकर होतो. किंबहुना, काव्य, चित्र, शिल्प, गायन या सर्व ललित कलांच्या उपासकांहून नाटककाराचीच उपासना अधिक फलप्रद होते, असेंहि म्हणतां येईल. नाटककाराची भूमिका ही एका अर्थानें, अज्ञाताआड दडून विश्वरचनेचें गारुड उभें करणाऱ्या जगत्सूत्रधाराच्या भूमिकेप्रमाणें, मोठी उत्कंठा व आदर उत्पन्न करणारी असते. कवि कितीहि लोकप्रिय झाला, तरी त्याला नाटककाराच्या लोकप्रियतेची सर

सहसा येत नाहीं. फार कशाला, कालिदासाचें 'मेघदूत' 'शाकुंतला'इतकेंच सरस असलें, तरी 'शाकुंतला'मुळेंच आज त्याचें नांव जगांत सर्वतोमुखीं झालेलें आपण पहातों कीं नाहीं ? रंगदेवतेपुढें धूप जाळल्याशिवाय कवींना लोकप्रियतेचा कौल लाभत नाहीं, असा आजपर्यंतचा अनुभव आहे. खुद्द शुक्ल हेसुद्धां नाटककार या नात्यानें लोकांना जितके माहित असतील, तितके कवि म्हणून माहित असण्याचा संभव कमी. म्हणूनच बहुधा, त्यांना प्रस्तावनेच्या या औपचारिक परिचयाची आवश्यकता भासली असावी; व समान व्यवसायामुळें उत्पन्न होणाऱ्या सहानुभूतीची भीड तोडणें कठिण वाटल्याकारणानें, मीहि त्यांचा शब्द मोडला नाहीं.

शुक्लांच्या कवितेविषयीं आजच निश्चित किंवा निर्णायक मत देणें, थोडें धाडसाचें होईल. नवजात अर्भकाचा चेहरा पाहून, तें पुढें सुंदर दिसेल कीं नाहीं हें सांगणें जितकें कठीण, त्याहूनहि नवीन कवीची कविता वाचून, तिच्या भावी विकासाविषयीं निश्चयानें विधान करणें, अधिक कठिण असतें. सदा बदलणाऱ्या हस्तरेषा बघून, एकंदर आयुष्याची रूपरेषा वर्णन करणाऱ्या कुडबुड्या जोशाच्या भाकिताप्रमाणें, तें निरर्थक ठरण्याचाच संभव फार. त्यांतून, शुक्लांचा गद्यलेखनाकडे आतांच इतका कल आहे कीं, यापुढें त्यांच्या हातून काव्यलेखन सतत होईलच, असा भरंवसा वाटत नाहीं. आरंभापासूनच कवीचा गद्यलेखनाकडे अतिशय ओढा असणें, म्हणजे नदीला उगमापाशीं कालवा काढण्यासारखेंच आहे. मग, कालांतरानें तिचें पात्र कोरडें पडून, त्या कालव्यालाच मुख्य प्रवाह मानण्याचा प्रसंग आल्यास नवल नाहीं. कवि म्हणून प्रथम जे उदयाला येतात, त्यांनीं गद्यलेखनांत एकदां मन घातल्यावर, त्यांचें कवितेवरून अजिबात लक्ष उडतें, असा नेहमींचा अनुभव आहे. सर वॉल्टर स्कॉट यानें कादंबऱ्या लिहावयास सुरुवात केल्यावर, त्याच्या हातून काव्यरचना कितीशी घडली ? परंतु, इतकें दूर न जातां, खास महाराष्ट्रांतीलच अगदीं अलीकडचें उदाहरण द्यावयाचें झालें,

तर तें गोविंदाग्रजांचें देतां येईल. यशस्वी नाटककार म्हणून चांगला लौकिक संपादन केल्यावर, त्यांचें त्यांनाच असें वाटूं लागलें कीं, इतउत्तर आपल्या-कडून काव्यनिष्पत्ति होणें नाहीं. गद्यलेखनाच्या व्यवसायाला वाहून घेतल्यावरसुद्धां कविता लिहिण्याची आवड कायम रहावयाला, केवळ मनाची आर्तताच कारण होत असते. गद्यलेखनांत निष्णात असूनहि, स्वतःच्या मनाला विरंगुळा म्हणून, नित्य कविता लिहिणारा गोल्डस्मिथसारखा नाटी लेखक खरोखरी विरळा.

Dear charming nymph, neglected and decried,
My shame in crowds, my solitary pride,
Thou source of all my bliss and all my woe

या त्याच्या उद्गारांत जी तीव्रता व तळमळ दिसून येते, तिला मनाच्या आर्ततेशिवाय दुसरें कोणतें कारण सांगतां येईल? गोल्डस्मिथसारखे कवि हे कवितेचे जसे भोक्ते तसेच तिचे भक्तहि असतात. आणि 'सद्यः परनिर्वृतये' या शब्दांनीं त्यांच्या काव्यरचनेचा हेतु खचित वर्णन करितां येईल.

या काव्यसंग्रहांतील, 'काळाचा खेळ' हें खंडकाव्य सोडलें, तर बहुधा सर्वच कविता भावनात्मक आहेत. मात्र त्यांतील भावना भव्य किंवा भेदक नाहींत; व त्यांना जरी थिल्लर म्हणतां न आलें, तरी ठिसूळ म्हटल्यास तें गैर होणार नाहीं. कांहीं कविता अशा असतात कीं, त्या वाचून मनाला जरी उन्नत अथवा उदात्त विचारांचें स्फुरण न घडलें, तरी क्षणमात्र निर्दोष आनंद अनुभवितां येतो, निदान कांहीं करमणूक तरी खास होते. सामान्य लोकांच्या मनोरंजनाला खरोखरी अशाच कविता विशेष उपयोगी पडतात. दिवसभर जीविताचा दुर्वह भार वाहून शिणलेल्या मनुष्याला, ढगांभोंवतीं घोटाळणारी वर्ड्स्वर्थची गंभीर कविता वाचून, काय आनंद होणार? त्यांतील तत्त्वविचारांनीं त्याच्या रंजलेल्या मनाला

तकवा येण्यापेक्षां थकवा येण्याचाच संभव फार. जगांतील सामान्य मनुष्य हा सुखलोलुप, व प्रत्येक गोष्टींत प्राय: स्वार्थबुद्धीनें क्षणभरच लक्ष घालणारा, असा असतो. रस्त्यांतून लगबगीने जातांना, गर्दी झालेली दिसतांच तो थोडा थबकून डोकावून पाहील. अपघात किंवा आपत्ति दृष्टीस पडल्यावर त्याचें मन तत्क्षणीं किंचित् कळवळतेंहि. पण लगेच तो उद्योगाला लागतो; व त्याला त्या पाहिलेल्या गोष्टीची आठवणहि मग रहात नाहीं. 'सुख पहातां जवापाडें। दुःख पर्वतायेवढें'—हें तत्त्व त्याच्या मनावर ठसलेलें असतें; आणि म्हणून, सुखाचे सांपडतील तितके क्षण पदरांत पाडून घेण्याकरितां तो सदैव धडपडत असतो. पराचीवर उभें राहून, सात मजली हवेलीला रंग देणाऱ्या मजुराला, जरा तोल गेला तर आपला कपाळमोक्ष होईल, याची कल्पना नसते असें नाहीं. तरी तशाहि स्थितींत तो लावणीचें कडवें गमतीनें गुणगुणत आपलें काम करीतच असतो कीं नाहीं ? व्याधि, जरा व मरण यांना भिऊन, गौतमाप्रमाणें जर प्रत्येक मनुष्य रान गांठूं लागला, तर जगाचा संसार कोण वाहिवाटील ? सुखदुःखाच्या भावनांनीं इतके वाहून जाणें, हें सामान्य मनुष्याचें शील नव्हे. आयुष्याचे दिवस जितके मजेनें घालवितां येतील तितके घालवावे, हीच त्याची कामना. उदात्त तत्वविचार, उच्छृंखल कल्पना, उज्ज्वल ध्येयवाद यांची किंमत त्याला कळत नाहीं, असें नव्हे. परंतु, त्यांचें आकलन करण्याची ऐपत नसल्यामुळें, त्याचा नाइलाज होतो. जवाहिऱ्याच्या दुकानांतील बिलोरी कपाटांत ठेविलेले जडावाचे बहुमोल दागिने पाहून, गरिबाच्या मनाला घटकाभर कौतुक वाटलें, तरी ते स्वतःला मिळावेत अशी वासना त्याला सहसा शिवत नाहीं. तसेंच अत्यंत श्रेष्ठ वाङ्मयाच्या बाबतींत सामान्य मनुष्याचेंहि होतें. त्याच्या रंगेल भावनांची रेखाटणी, क्षणिक विकारांच्या छटा ज्यांत आढळतील, तें काव्य मात्र तो आवडीनें वाचतो. एकंदर समाजाची वृत्तीसुद्धां याहून निराळी नाहीं.

सामान्य मनुष्यांकरितां लिहिलेल्या या कविताहि सामान्य असतात.

म्हणजे त्यांत अद्भुत अगर असामान्य कांहीं नसतें असें नव्हे; सामान्यतः जे विषय कळावयाला कठिण, त्यांचें गंभीर व गहन विवेचन त्यांत केलेलें नसतें, इतकेंच. सामान्य मनुष्याचे क्षणिक विकार--विचार त्यांत कुशलतेनें ग्रथित केलेले असतात. समाजसमुद्राच्या सपाटीवर सदैव उठून फुटणाऱ्या या विकारांच्या बुडबुड्यांवर कविप्रतिभेचे किरण पडले कीं, ते मोत्यांसारखे चमकूं लागतात; आणि त्यांना शोभा व शाश्वतीहि थोडीबहुत येते. वॉल्टर बेजहॉट यानें–Light expression of its light emotions—या शब्दांनीं समाजाच्या या आवडत्या कवितांचें वर्णन केलें आहे. या प्रकारच्या कवितांतील भावना क्षुल्लक पण सरस आणि चंचल पण चित्तवेधक असतात. वाङ्मयांतहि त्यांचें स्थान कांहीं कमी महत्त्वाचें नाहीं. ताटव्यांच्या कमानदार उतरणीवर, हारीनें लावलेल्या टीचभरच वाढणाऱ्या पांढऱ्या पिवळ्या फुलांच्या गेंदेदार झाडांनीं बगीचाला जरी भव्यपणा न आला, तरी त्याच्या शोभेंत भर खचित पडते. शिवाय, मृण्मय सृष्टीचें उघडें शरीर हिरव्या पानांनीं व हसऱ्या फुलांनीं झांकलें जातें, हा लाभ काय थोडा आहे? तसेंच, मनुष्याचे शबल व क्षणजीवि विकार कवीनें खुलवून वर्णन केले, तर त्यांची सरसता तेवढीच अनुभवाला येते. मराठी शाहिरांचें लावणीकवन याच जातीचें आहे. या प्रकारची रचना करणारे कवि जरी पहिल्या प्रतीच्या कलावंतांत न मोडले, तरी त्यांची कारागिरी पुष्कळच कौतुकास्पद असते. जगांत कांहीं गुणी लोक आपण असे पहातों कीं, त्यांची वादनाच्या कलेंत पूर्ण गति नसली, तरी हरएक चीज ते अशा हिकमतीनें वाजवितात कीं, ती ऐकतांना मन अगदीं गुंग होऊन जावें. या कवींची रचनाहि तशाच तऱ्हेची असते. मनाचें आकाश सदा उदास विचारांच्याच ढगांनीं ओथबलेलें असावें किंवा उज्ज्वल कल्पनांची दीप्तीच तेवढी त्यावर तळपावी, असें कोण म्हणेल? शरदभ्रांच्या गहिऱ्या गुलाबी छटांनीं त्याचाहि संध्याकाळ रमणीय होणें इष्ट असतें. ओहळाची खळखळ कानांवर पडतांच, मन जरी

उदात्त विचारांनीं भरून न आलें, तरी चढण चढून आल्याचा शीण हरपून, त्याला आल्हाद झाल्याशिवाय रहात नाहीं. तोच उपयोग, कष्टमय मानवी जीवितांत, असल्या कवितांचा असतो.

रा. शुक्ल यांचीं बहुतेक चांगलीं भावगीतें या प्रकारचीं आहेत. मननाच्या मार्गानें गूढ विचारांचा माग काढीत दूरवर प्रवास करणें त्यांना झेंपत नाहीं; अगर पिळवटलेल्या हृदयाच्या सूक्ष्म भावनांचे धागे उकलणेंहि, त्यांना साधत नाहीं. पण आनंदाच्या व उद्वेगाच्या फार सूक्ष्म नव्हेत अशा भावना मात्र ते चांगल्या रीतीनें रेखाटतात. 'स्वर्गीय संगीत' हें या संग्रहांतील मधुर गाणें त्या दृष्टीनें वाचनीय असून, त्यांचीं सुनीतेंहि परिचित असलेल्या कल्पनांची आठवण पुन्हा गोड शब्दांनीं करून देतात. स्वतःचें आणि समाजाचें दुःख तीक्ष्ण शब्दांनीं बोलून दाखविण्याची हौस त्यांना फार आहे. परंतु, वाणींत तेज कमी असल्यामुळें म्हणा किंवा आंतरिक तळमळच तितकी तीव्र नसल्यामुळें म्हणा, त्यांच्या आवेशाचा जोर लटका पडतो. 'दादा दादा' ही या काव्यसंग्रहांतील कविता हृदयंगम आहे. पण त्या कवितेंतील मूलभूत कल्पना मनाला पीळ पाडणारी असूनसुद्धां तिचा विकास मात्र तितका उत्कटतेनें झालेला नाहीं. 'काळाचा खेळ' या चटकदार खंडकाव्यांतहि वर्णन करितांना घाई झाली असावी, असें वाटतें; तथापि तें काव्य वाचतांना, शुक्ल भाषा किती सफाईनें व सहज लिहितात, याचा प्रत्यय येतो. जुनीं मराठी वृत्तें वापरण्याच्या फंदांत ते पडलेले नाहींत; आणि गजल व अलीकडील नवीन धांवतीं वृत्तें लिहितांनाहि त्यांच्याहातून चुका झाल्या आहेत. पण त्याबद्दल त्यांना एकट्यांनाच दोष देण्यांत काय अर्थ? शाहिरी शब्दांच्या अतिरेकाप्रमाणें वृत्तदोष हासुद्धां अलीकडे कवितेचा एक विशेष होऊन बसला आहे! सुंदर शाहिरी शब्दांनीं मराठी सारस्वत सजविण्याचें श्रेय जसें गोविंदाग्रजांना दिलें पाहिजे, तसेंच त्या शब्दांचा वेळीं अवेळीं निष्कारण व निरर्थक वापर करण्याची रूढीहि त्यांनींच पाडली, असें म्हणणें भाग आहे. जिथें खुद्द गुरू-

लाच आपण जे शब्द वापरतों, त्यांचा अर्थ पुष्कळ वेळां माहित नसे, तिथें बिचाऱ्या शब्दजीवि शिष्यांची कथा काय ? या संग्रहांतील ' फुल-माळिण ' व ' वळचणीची पाल ' या कविता नव्या शाहिरी संप्रदायाच्या लिखाणांत नमुनेदार म्हणून शोभतील. कांहीं वनस्पतींच्या फक्त पालवी-लाच काय तो सुवास असतो. त्याप्रमाणें या शाहिरी कवितेच्या निव्वळ शब्दांचीच शोभा पाहून डुलावें. आणि,

Words are like Leaves; and when they most abound,
Much fruit of sense beneath is rarely found

या पोपच्या उद्गारांची सत्यता हें शाहिरी लिखाण वाचतांना बहुधा अनुभवास येते. परंतु, रा. शुक्ल यांची रचना जरी सदोष व सैल असली, तरी तिच्यांत एक प्रकारचा सहजपणा व ऐट आहे. आणि, कलेचें मर्म ओळखून, जर ते एकनिष्ठेनें कवितेची उपासना करतील, तर त्यांना कवियश दुर्मिळ नाहीं, इतकेंच मी तूर्त म्हणतों.

नागपूर,
९।८।२५

ग. त्र्यं. माडखोलकर

ग्रंथालय ठाणे
३६२७

# कुमुद-बांधव

## अभिवंदन !

( चाल—आनंदकंद ऐसा. )

स्वातंत्र्य--संगरांत घे प्राण जो मुठींत
काळास दावि हात केले तयास चीत
जो वंद्य कीर्तिवंत सातां चिरंजिवांत
तो हिंदपुत्र थोर
वंदीतसे त्रिवार !

आधार जो जिवींचा या हिंददेवतेचा
सत्पुत्र मायभूचा वालीच गांजल्यांचा
देशार्थ जन्म ज्याचा देशार्थ जीव ज्याचा
झुंझार शूर वीर
वंदीतसे त्रिवार !

बुद्धी बृहस्पतीची शौर्यांत सव्यसाची
वाणी कवीश्वराची तेजाळता रवीची
खाणीच कीं गुणांची मूर्ती जनार्दनाची
लोकाग्रणी सुधीर
तो वंदितो त्रिवार !

सह्याद्रि डोलवीला भूगोल हालवीला
अंधार घालवीला सैतान ठार केला
भारोनि विश्व गेला तो एक जादुवाला

शाहीर कर्मवीर
तो वंदितो त्रिवार !

देशास उद्धराया
राष्ट्राऽऽपदा हराया
सत्या जयी कराया

धर्मास उद्धराया
दास्यास संहराया
झाला जगावरी या

विश्वेश्वरावतार
तो वंदितो त्रिवार !

---

## मांगल्याचा जयजयकार !

मंगलदेवी मंगल सेवी । मंगल जगताला शिकवी ॥
पुढतीं पाठीं वरतीं खालीं । मंगल विश्वाभंवतालीं ॥
निशा निमाली उषा उदेली । प्रभात पुण्यद पातली ! ॥
मांगल्याची सुरबाला
उधळित आली तेजाला
पावित्र्याला प्रेमाला
दिव्यानंदोत्साहाला !
काव्यप्रतिभा कीं अवतरली । स्वर्गासह या अवनितलीं ॥
विश्वेशाची सुहास्य–लहरी । तोषविण्या कीं जगिं आलीं ॥
पुण्यात्म्यांच्या पुण्याईची । पवित्र गंगा कीं दिसली ! ॥
पांखर प्रेमाची पडली
सुमनें कांट्यांचीं बनलीं
कलिका विश्वाची खुलली
जादु अजब ही अवतरली !

दुःख—नगांतुनि झुळझुळ वाहे। सुंदर ही कीं सुख—सरिता ॥
सुख—रत्नांची दुःख—महोदधि। दौलत दावित कीं जगता ॥
क्षणभंगुर चंचल बिजली कीं। आशेची दिपवी आतां ॥
मधुतर कटुतेचें हें सार
जहरी अमृत किं हा संसार
मंगल एक प्रभु आधार
मांगल्याचा जयजयकार !

---

## स्वर्गीय संगीत.

( घट भरे प्रवाहीं......इ. चालीवर. )

मन भुलें दिव्य मंजुळ गानीं।
न दिसे परि कुणी गातसे गुणी ॥ ध्रु० ॥
प्रभातवेला मंगल झाली,
शांतिरसानें सृष्टि रंगली,
एकतानता विश्वीं भरली,
भ्रमत मी परि वनीं शून्य मनीं.
श्रवण—सुभग आलाप मनोहर
बेसुर नच परि अतितर सुस्वर,
दिव्य राग कुणि आळवि निरंतर,
जन भुलवि डुलवि जागिं निजगानीं.
गान—माधुरी भान ही हरी,
मन तल्लिन करि वृत्ति बावरी,

झुलली खुलली दुनिया सारी,
गुंगली नाद–रव–रस–पानीं.
श्रवण मधुर नित गान लकेरी
छेडि सदय निर्जन कांतारीं,
माझ्यास्तव दुरि खास कोणि तरि
मोहनी मोहुनी घालि कुणी.
गानरसाच्या सुंदर लहरी
जिवा भुलविती मंगलकारी,
चित्त मग्न आनंद–सागरीं,
मन गान–तरंगीं रंगुनी !
कवण एकला गातचि बसला,
सन्निध गमला परि नच दिसला,
गात कां असा नकळे मजला,
हा हृदयिं दिसे परि नच नयनीं.
गोड गुणी गंधर्व कां कुणी
गाउनि भुलवी जगता लपुनी ?
आकर्षित जन--मन निज चरणीं,
गांजल्या जिवांना रिझवोनी
गाशि वद कुठें मधुर गायका !
शोधुं कुठें तुज सौख्यदायका !
दुःखभंजका ! हृदयरंजका !
होऊंदे धन्य तव दर्शनीं.

जीवन–कलिका खुलवी गायक–
भृंग–गान–गुंजारव मोहक,
प्रेम–मधुर–रस सुचिर देत सुख,
मम हृदय--कमल--दल उमलोनी.
मृत्यू अविरत अगणित साहिन,
गायक परि मी शोधिन पाहिन,
पद–रत–मति चिर सन्निध राहिन,
गायनीं जाय मग मी विरुनी !

३१।३।२१ हुसंगाबाद. मनोरंजन.

---

## हर हर महादेव बोला !

[ चाल—सबसे रामभजन. ]

गुलामगिरिवर घाला घाला
हर हर महादेव बोला ! ॥ ध्रु० ॥
स्वतंत्रतेचे दिन सोन्याचे मायभूमिचे गेले
मेघ डंवरले परदास्याचें ग्रहण भाग्य–सूर्याला !
काल गर्जला ' हर हर ' मंगल निधड्या वीरांचा
डंका झडला मर्दाईचा भिडला अस्मानाला.
महाभाग हतभागी परि हा महाराष्ट्र आज
कपाळ पिटुनी ' हर हर ' बोले हाहाकारचि उडला !
बाजी प्रभुचा शिवदेवाचा राष्ट्राच्या संतानांचा
कुठें कालच्या मर्दगड्यांचा ' हर हर ' आतां दडला !

कडेकपारीं गडागडांतुनि दुमदुमला बोल
अणुरेणूंतुनि चराचराच्या घनगंभीराचि उठला.
मर्द मराठे गडी फांकडे शूर बीनीचे त्यांनीं
अठरा अक्षौहिणि असुरांच्या नेल्या यमसदनाला !
विझती प्राणज्योति वदली ज्या हर हर बोला
वीर मृत्युशय्या दगडांची अझुनी वदते त्याला.
मराठशाही मानकऱ्यांचे मूठ मावळ्यांचे
चित्र हांसरें मर्दगिरीचें रंगवि इतिहासाला.
ताजे उठले या बोलानें मेले मुडदे काळ
जिवंत मुडदे स्फुरतिल अजिही बोला 'हर हर' बोला !
नांव कुणाचें तुह्मी लावतां जरा बाळगा लाज
जित्या तापल्या रक्ताचे नां मग कां अजि गारठला ?
परवशतेनें प्राण कोंडले मुलुखागिरी मेली
हात कपाळीं ठेवुनि रडतां धिक् शतधा तुम्हांला !
पुण्यवंत हे प्रौढ प्रतापी पूर्वज भ्याडांनों !
स्वर्गाच्या उंबरठ्यावरुनी सखेद बघती लीला.
भिजल्या नयनीं अनाथ आशा तळावते अझुनी
देशजननिचे गोळा झाले प्राण येति कंठाला !
स्वाभिमान जरि स्वपूर्वजांचा- अपुला--देशाचा
मराठरक्ताचा--धर्माचा तरि हर हर जय बोला !
पाक कुळींचा मर्द जीव कुणी मायेचा पूत
वाऱ्यावाणी येइल धांवुनि राष्ट्राच्या हांकेला.

सत्यसंगरीं घोर शांतता--युद्ध करायाला
सैतानांशीं झगडायाला चला अघाडीला!

तरुण भारत.

---

# तोड ही माळ !

तोड ही माळा स्मृतींची कटु विषारी सुंदरी !
पाकळ्या कोमेजल्या त्या फेंक आशेच्या दुरी
करपली ही जीवकलिका तीव्र नैराश्यानलीं
माधुरी जळली पुरी ती जीवनीं शून्यावली !
हंत ! ना कशि खंत तिळभर करिशि अदये ! वंचना
हृदय भंगुनि जाय तिळतिळ हाय ! न सहे कल्पना
प्रेमवचनें फोल दिघलीं कपटहृदये ! काल नां ?
प्रेमस्मृति जहरी जिवाला देत भारी तापना
दृष्टिपुढतीं पळ न राहे अंत बघसी हा किती
दग्ध हृदया खोलुनी कां राख दावूं संप्रती ?
कुस्करीलीं निर्दये ! त्वां गोड आशेचीं फुलें
एक जगणें आणि मरणें ! धिक् जिणें शून्यांतलें !
प्रेम मरतां काय उरलें हाय संसारीं अतां
प्राण जातां मग कुडीला मोल कुठलें तत्वतां ?
घे--फुलें प्रेतावरी या सकळ टाकी उधळुनी
तोड ही माळा विनवितो पुनरपी तुज साजणी !

१ जून १९२२ सातारा — महाराष्ट्र साहित्य

---

# तेव्हां आणि आतां

थाटोनी चिमणाचं भातुकालिचा संसार तो साजरा
प्रेमें घालिसि हार सुंदर मला मानोनियां ' नोवरा ' !
जेव्हां मीहि तुझ्या सुरेख गजरा वेणीवरी बांधला
लाजोनी हंसलीस तूं जणुं तदा तो काळही हांसला !
संगें खेळुनि वाढलों अजवरी एकत्रची आपण
झालें जीवन एकरूप अपुलें लोपोनि ' मी तूं '--पण
आतां आठवतांच बाळपणिंच्या सौख्यस्मृती गोड या
धांवें दुःख दुणावुनी झणिं जिवा शोकानलीं लोटण्या !
आशेनें बघुनी जिवा रिझविलें मी ज्या गुलाबावरी
देई हाय ! विधी मला फसवुनी तोची दुजाच्या करीं
गेला गोड गुलाब पूर्व-सुकृतें सौख्यांत नांदावया !
कांटेरी जग मात्र येथ उरलें जीवास बोंचावया !

*　　*　　*

होता पेटत जीव आतुर अती तेव्हां सुखाशेमुळें !
आहे पेटत जीव तोच सखये ! आतां निराशेमुळें !

ता. ८-१२-१९२२, ग्वाल्हेर.　　महाराष्ट्र साहित्य

---

# बांसरी.

[ चाल-चांद चवथिचा—या ओंवीची ]

मधुर बांसरी मृदुल हांसरी
बन्सीधर नादवितो कान्हा परतीरीं !

मंजु नादली दिगांतिं कोंदली
विश्वहृदयिं मुरलि झरलि वृत्ति खुलविली !
जग भुलें डुलें किति खुलें झुलें
रम्य बाल्यचित्र जणूं नयनिं बिंबलें !
जगपणा नुरे कुंजवनिं विरे
सुर--तरंगिणी मदंतरंगिं नव भरे.
हंस हा गुणी श्याम साजणी !
पोहत जणुं—पुष्करिणी रागरागिणी !
राधिका भली भान हरपली
नादरूप प्रगटलि मनिं मूर्ति सांवळी.
ज्योत जागती प्रीत नवरितीं
नादब्रह्मलीन जिव दिव्य संगितीं.
जादु पसरुनी जीव भारुनी
बेहोष करी चतुराई खरि भुलावणी !
नजर बांधितो नंदबाळ तो
चांद बिजेचा राजस रात उजाळितो.
अज्ञेय विलसुनी गूढ उकलुनी
बांसरींत विश्व रिझें अनंत उमलुनी !

प्रमोद.

# विश्वाचा बगीचा.

[ चाल–' आनंदी आनंद गडे. ]

बागेचा फुलला विश्वाचा !
सुगंध सुटला प्रेमाचा ! ॥ ध्रु० ॥

आनंदाची वनराई । नंदनवन अवनी होई.
ऐक्यरसाचे मधुर झरे । भ्रातृभाव--रसपूर्ण खरे !
उल्हासाचीं कारंजीं । थुइथुइ नाचति हर्षें जीं.
चाल—सुविचारांचे । उडति मजेचे । तुषार साचे,
आला प्रेमालाच बहार । अभ्युदयाचा वसंतकाल !

मंद विहरतो तोषद हा । स्वातंत्र्याचा पवन अहा !
हवा सुखाचि खेळतसे । मंगल तेजा उधळीतसे.
चित्शक्ती गाते बसुनी । सर्वस्वाचीं शुभ गाणीं.
चाल—मधुर यशाचा । सौजन्याचा । परिमल ज्यांचा
मानवपुष्पें हीं फुललीं । कालतरूचीं अवनि–तलीं !

मृत्यू मालाकार खरा । गुंफित जीवन--सुम--माला.
सुदिव्य मालेला ऐशा । अर्पुनि भावें सर्वेशा,
प्रभुस्वरूपीं मिळित करीं । जिवा शिवाची जोड खरी !
चाल—सौरभशाली । सुम–तति फुलली । पूर्ण विकसली
वाजवि सद्यश–दुंदुभिला । पवन पसरुनि सुगंधाला
पराग रेणू प्रेमाचे । उधळत विश्वावरी साचे.
लोकहितास्तव अवतरली । वृत्ती सेवामय बनली.
तनमनधन जन–हितकाजीं । अर्पुनि डोलत वदती जीं.

चाल—" तरिच जन्म हा । सफल हो अहा ! जरि निजदेहा
झिजविति जनाहितिं जन्मोनी । जनीं जनार्दन जाणोनी."

" विश्ववृत्तिव्रत स्वीकारा । फोडुनि स्वार्थबंधारा.
जगदुद्धारीं आत्मोद्धार । हेंची जीवन–रहस्य–सार !
सेवापथ अवलंबणें । स्वोन्नतिशैला जरि जाणें !

चाल—मधुर निर्मला । सुयश–परिमला । विश्वीं उधळा "
गोंडस गोड गुणी गमली । दिव्य बोल विश्वा वदली.

हाय ! अकालीं किती परी । कठोर काळें कुसकरली.
गोजीरवाणीं परि गळलीं । सुंदर सुमनें इवलालीं.
मातींतुनि जन्मा आलीं । मातींतचि मिळुनी मेलीं !

चाल—फुलें चिमुकलीं । व्यर्थचि सुकलीं । जगा अकालीं.
पवित्र जीवित–तेजाला । ल्यालि प्रेमनवरंगाला.

जगाद्विषमता–तापें सुकलीं । एकेकचि खालीं गळलीं
सडकथा पुष्पांचाल सडा । काय शिकवितो जगीं धडा ?
नश्वर जगतीं जन्म जया । मृत्यू चुकला कधिं न तया.

चाल—जागुनि मेला, कर्तव्याला । जनसेवेला
चिरंजीव तो जगिं झाला । कीर्तिस्वरूपें जगिं भरला !

वागिश--विश्वात्मक वाणी । गात गोडशी गुणगाणीं
कठोर काळें तोडियला । विश्व–वृक्ष हा परि त्याला
अंकुर फुटली नवेनवे । द्विगुणित जोमें फैलावे.

चाल—ज्ञानोदय नव । जीवन घाला । पुन्हा बहरला ।
बगिचा साचा विश्वाचा । प्रसंग तो बहु बहरीचा !

५–९–२० दिल्ली. मनोरंजन

———

# हिंदमातेची हांक !

[ चाल—मजवरि तरु कुसुम० ]

दीन गाय हिंद माय हाय ! मोकळे
हंबरडा फोडि रातादिन मनिं जळे ॥ ध्रु० ॥

वीरसु नवतेजखनी विभवशालिनी
विसलत जगिं निजप्रभवें भुवन दिपवुनी
तापत्रय–त्रस्त तीच आर्यमेदिनी
हाय ! काय दुर्दिन अजि घोर पातले !

निद्रावश पुत्र कांहीं स्वस्थ घोरती
कलह निरत अन्य मूढ बेकि खेळती
देशद्रोही कांहीं नरक साधिती
कर्तव्या विसरुनि निजसत्व जाळिलें !

दारिद्र्यें गांजियली दीन माउली !
दुष्काळें पीडियली अबल जाहली
दडपशाहि पिळिते इज राक्षसी खरी
दास्यपंकिं रुतली मनिं दुःख दाटलें !

पुत्रांनों ! निजधर्मा सतत जागुनी
कर्तव्याची माझी हांक ऐकुनी
उद्धारा दास्य--घोर--रौरवांतुनी
धन्य ! धन्य ! तरिच सफल जनन जाहलें !

तरुण भारत.

---

## धन्य ती माउली !

स्वधर्मरत कीर्तिवान् भुवनिं सत्वशाली गुणी
झिजे जनहितार्थ जो जनिं जनार्दना जाणुनी
खरा कुल--ललाम जो सुजन--पूज्य या भूतलीं
असा प्रसवि पुत्र या जगतिं धन्य ती माउली !

---

## प्रबोध-गान

( चाल--वसंतीं बघुनि० )

ऊठ रे ऊठ झणीं बाळा !
दिशा फांकल्या, प्रभात झाली बघ रे वेल्हाळा !
निमाली निशा. उषा हंसरी
नटुनि थटुनि ये लाजत मुरकत ही मंगलकारी !
सुखाचा अरुणोदय झाला
बाळरवीचें किरण कोंवळें वितरति तेजाला.
चलाचल धरि हें जागृतिला
पूर्वदिशेचा प्रांत रंगला या मंगल काला.
विकसल्या नलिनी कासारीं
कमलवृंद सानंद डोलती उल्हासित भारी !
खुलतसे सुम-तति आनंदें
परिमल त्यांचा मधुर दरवळे सुंदर जगिं कोंदे.
चंपक पारिजात फुलती

जाइजुई मोगरा मालती गुलाब शेवंती.
गुलवशी गुलतुर गुलनार
जास्वंदी माधवी मोतिया गुलछवु दळदार !
लाडक्या बाळा ! या समयीं
मंद समीरण सुगंध उधळित वाहत सुखदायी !
सोनकळी चांफ्याची खुलली
साखरकळि हुंगुंदे सोनुल्या ! ही चिमणी इवली.
पांखरें भिरभिरती गगनीं
शुक पिक कोकिळ चंडोलहि गाती मंजुळ गाणीं
गोप बालकें नेत बाळा !
गाइगुजी वांसरें गोजिरीं रानि चरायला.
गोडशा गातचि भूपाळ्या
आन्हिक कर्में करूं लागती सुजनहि या समया.
अंगणें झाडुनि बाला या
कुंकुम केशर सडे शिंपती· ·घालिति रांगोळ्या
किति तरी निजायचें बाळ !
जरा उघडुनि डोळा हंसुंदे मुखमणि तेजाळ !
टाकुनी निद्रेचा चाळा
ऊठ राजसा ! चिमण्या बाळा ! लगबग लडिवाळा !

२३।६।२३ मुंबई

महाराष्ट्र माध्यंदिन

# सख्या कोकिळा !

[ चाल—फुले वेलींची. ]

सख्या कोकीळा !
गा सृष्टिसतीच्या बाळा !॥ ध्रु० ॥
वसंतराजा शोभला अहा !
सकल ऋतूंचा बादशहा हा
हांसत आस्ते कदम् आ रहा
देख वेल्हाळा !
हिरवळ नव्या नवतिची फुलली
फळांफुलांची बहार खुलली
हंसरी हिरवी दुनिया झुलली
चिमण्या बाळा !
आनंदी आनंद उसळला
स्वर्गसुखाचा मार्ग उजळला
उत्साहाचा रंग उधळला
बघ लडिवाळा !
काळी किनखाबू मखमल
तुझ्या जिवाची प्रणयिनि व्याकुल
गुज गुलनार करी गुलगूल
प्रीत सोहाळा !
वाऱ्यावरती मारि भराऱ्या
छेडित मंजुळ गानलकेऱ्या

रिझवित जगताला या साऱ्या
चालिव चाळा.
भाट वसंताचा तुज वदती
थाटमाट बघ--दे झोंकुनि ती
तान तयारीची भिरभिरती
ही शुभ वेळा !
पद्यामध्यें गद्य गोंवुनी
रचित निरर्थक शब्दश्रेणी
जगीं मिरविणें ' काव्य ' म्हणवुनी—
शब्दजंजाळा.
दगडफुलांचें अम्ही कवि खरे !
सवंग कीर्तिस हपापलेले
वृथाभिमानें ताठरलेले
भाव मनिं काळा !
थाट शाहिरी रसवंतीचा
दिव्य स्फूर्तीचा प्रतिभेचा
रसिकां रिझवी तव कवनाचा
घुंगुरवाळा !
जीवकळा निर्जिवांत भरली
चलाचलीं चेतनाच स्फुरली
नवता ल्याली ही अलबेली
सृष्टी—बाला.

वसंत राणा जिवाजिवाचा
झोंक वनश्री-शृंगाराचा
प्रीतसिंगम मंगल यांचा
मोद-हिंदोळा !
सुंदर निर्झर धरितो ताला
मोरमयूरी किति अनुताला
नाचति—पवन लावि सूराला
रंग जलशाला !
प्रीतीचा पंचम मनहारी
माधुरिची बढती लयकारी
दिव्याची गा गाणीं सारीं
प्यार रसाळा !
शुकपिक बुलबुल साथीदार
रंगरसेले गडि दिलदार
गोड गळ्याचा जमला थोर
जिव्हाळा-मेळा.
पिके प्रीतिचा पानमळा हा
स्वर्ग जादुचा उभारें अहा !
फुललें फत्तर प्रीतिनें पहा !
तुझी ही लीला !
असेंच गा गा तूं दिनरात
सृष्टीचें स्वर्गीय संगीत
विरलें बघ जग गानरसांत
राजस बाळा !

मौज.

# प्रीतीचा तिळगुळ

बाल्य—संक्रमण
होउनि यौवन—
शुभदिन समुदित सौख्याचा । जीवाच्या खुलत्या बहरीचा
मनो—मंदिरीं
गान—माधुरी
मुग्ध—मधुर—तर प्रणयाची । फुलली दुनिया आशेची
होत चिरंतन
मधुर—सुमीलन
प्रणयी परस्पर जीवांचें । एकरूप दों हृदयाचें
प्रीति—शर्करा
पाक हा खरा
पेटे हृदयाची हसनीं । तीव्रोत्कंठा—ज्वालांनीं
विचार प्रेमळ
जणूं विमल तिळ
आंच मंद विरहाग्नीची । चढति पुटें नव प्रीतीचीं
मनोवृत्ति या
मुकुलित झाल्या
खुलति प्रीतिचे अभिनव रंग । उचंबळति हृत्प्रणय—तरंग
वियोग—शंका
येतां मनिं कां
थरकांटा यावरि बाई ! । नवलाईचा हा येई ?

मूक मनींचे
मुग्ध प्रीतिचे
बोल मधुर जगिं बहुमोल । मृदुल हृदयिं शिरती खोल
दिव्य प्रीतिचा
तिळगुळ साचा
सेवुनि आनंदें आतां । मंजुळ बोला प्रियनाथा !

१४।१।२२, ग्वाल्हेर. महाराष्ट्र माध्यंदिन.

---

## दिव्य लावण्य

निसर्गसुंदर नयनमनोहर नवे नवे किति नवलाचें
निर्मल आदरजन्य हृदयिं लावण्य दिव्य या सुगुणीचें !
देखुनि खुलत्या सौंदर्याच्या फुलत्या दुनियेची नवता
विविधकल्पनातरंग होई मदंतरंगा रंगविता
पवित्रतेची पुण्य पताका मंगलतेची मूर्ति खरी
स्वर्गिंचाच जणुं दिव्य तजेला तनु--कांती खुलवी भारी
मूर्तचि भासत अभिनव विकसित मृदुल कमलिंची कोमलता !
लोचनलुब्धक लावण्याची कीं नाजुक लतिका ललिता
मोहकतेची मूस मनोज्ञा सौंदर्याची सूर्यकला
नवस्फूर्तिची सुधास्यंदिनी चित्तनंदिनी चंद्रकला
हलवी धागे मृदुहृदयाचे मधुर छबी मधुमासाची
चेतोहारी दिव्य चारुता चमकत चढत्या चंद्राची
गात्रें गोंडस हंसरीं सारीं वदनचंद्रमा हंसणारा
नयनतारका तेज वितरती हंसुनि हंसविती चराचरां

शांति चंद्रिका तनुवरि नाचत मंगल तेजहि खेळतसे
आनंदी आनंद चहुंकडें मुक्तकरानें उधळितसे
विश्व करित आकंठ अखंडित रूपसुरस तें सुखपान
भासें डोळें ब्रह्मानंदीं प्रेमसमाधीमधिं मग्न
मुक्या मनींचा भाव उकलला विश्वीं प्रेमच तें विजयी !
प्रेम दिव्य लावण्य दिव्य अति सृष्टी सारी प्रेममयी !

वि. ज्ञा. विस्तार.

---

# अं-हं-बोलायचं नाहीं !

**आणि तें कां ?** आयुष्याचा वसंत सुरू झाला तरी आठ महिन्यांनंतर कंठ फुटलेली ही कोकिला सृष्टिच्या चालू वसंतांत न बोलण्याची शिक्षा अशी कुणाकुणाच्या कमनशिबाला आणणार आहे देव जाणें !

वसंताची खडी स्वारी सजे ही कोकिला प्यारी
लकेरी गोड गाण्याची खुमारी जादुची न्यारी !
जिवाच्या आडवी बोला बळें कां ओंठ ही दापी
मुळाला ये परी माझ्या अशी काळजी कां कांपी ?
कळूंदे कोकिले ! आतां मनाई कां अशी बाई !
दरारा कां तुझा माते 'अं-हं-बोलायचं नाहीं !'

*           *           *

फिरेना दैव माघारा तरी हा घांवरा जीव
क्षणीं या बावरा झाला विवेकाची त्यजी शीव
कसा कोणास दावावा दिलाचा पोळता भाव ?
बघोनी प्रेत आशेचें कुढावा बावळा जीव

तुटे तें पूर्वींचें नातें
बजावी कोकिळा बाई
सुखाशा-भंग हा दाही
'अ-हं-बोलायचं नाहीं !'

*  *  *

स्मृतींचीं रंगलीं चित्रें
सुखाचा काळ पूर्वींचा
दिसोनी चित्तचक्षूला
खडा डोळ्यापुढें झाला
स्मृती त्या गोड तेव्हांच्या
पसारा आजचा सारा
जिवाला लोटती शोकीं
वृथा शोकानलीं फेंकी
अभागी मी पुरा दीन !
खुळे ! हे अश्रु मोलाचे !
उदासी कां तुला जाळी
असें कां लाड.... !

*  *  *

सदाचा शब्द प्रीतिचा
जरी तो लाडका भारी
तुझ्या संबोधनीं यावा
आतां मी केंवि बोलावा ?
जिवाचा प्रीतिचा ठेवा
सहारा हा निराशेचा !
दुजाला लाभला थोर
असे बेमान तख्दीर !
अडे ओंठावर वेडी
विवेकानें दिली ग्वाही
उफाळे प्रीतबोली ही
'अं-हं-बोलायचं नाहीं !'

*  *  *

सुखानें नांद वेल्हाळे !
तुझा संसार भाग्याचा
तुझ्या सौख्यीं मला मोद
जिवाला हाच आनंद !
मनाच्या माधुरीनें ही
जगीं ना प्रीतिला वाचा
सुखाची भागली भूक
पढावा पाठ हा ठीक
जिवींच्या गूज जीविंचें
तसें तें आपणांलाही
पुरें प्रेमी जनां ठावें
कशाला काय बोलावें !

*  *  *

जगाच्या पाप दृष्टीला दिसेना प्रीतिचें दिव्य
कुणी मानील हें गाणें म्हणोनी कल्पना-काव्य !
अपूरें प्रीतिचें चित्र अपूरें प्रीतिचें काव्य
अपूरें विश्व आशेचें अपूरें स्वप्न सौख्याचें
जिवाचें हांसणें गाणें रडें ही एकची आतां
सुखाशा....! भ्रम....! ! ! ! ! ! ! ! !

२१।३।२२ ग्वाल्हेर मौज वसंत अंक

---

## धिःकार !

हा ! हाय ! असो शतवार अम्हां धिःकार !
विसरुनि कर्तव्या निज सत्वा कां तिलांजली देणार !
दख्खनची धवला कीर्ती
दुमदुमली जी दिक्प्रांतीं
जीवां संजिवनी शक्ती
ती मळवुनि दुष्कीर्तीचा जगिं कां डंका वाजविणार !
मावळचा मर्द मराठा
काळास आणी थरकांटा
पळवि रिपुसि बारावाटा
तद्रक्त तापलें गारठुनी तो मवाळ कां बनणार !
एकमांड घोड्यावरती
दख्खनहुनि उत्तर प्रांतीं
हुरडा जे खातचि जाती

रणधीर वीनिचे वीर अतां ते कायम कां निजणार !
भगवा झेंडा राष्ट्राचा
अटकेंतहि फडकायाचा
अस्माना भिडुनि साचा
तो चिंध्या होऊनि खालीं अदळुनि मातिंत कां मिळणार !
सोनेच पिकावें जेथें
घावेत मोति भिक्षेतें
त्याच का हिंदभूमीतें
दारिद्य जाळीते—पुत्र तिचे परक्या दारीं फिरणार !
सिंहाचा शूरचि छावा
श्वानपंक्तिला बैसावा
इभ्रतिचा जाळुनि वणवा
कां राबुनि दास्यीं मेंढरागती जगांत हा जगणार !
कटु परिस्थितींची घोर
बंधनें धरोनी फेर
जखडती जिवा बेजार
किती अनाथ हृदयें जळती !—ओलाव्याविण कां मरणार !
घोर काल—निद्रा त्यजुनी
प्रगती—पथि पद ठेवोनी
हा भारत बलधर भुवनीं
कधिं डोळे उघडुनि दास्याचा कटु पाश नष्ट करणार !

* * *

अजि उठा ! उठा ! बंधूनों !
हिंदभूमि–वीरसुतांनो !
स्वातंत्र्याच्या प्रणित्यांनों !
वाहिते माय गांजली धाय मोकलुनी वारंवार.

५।१।२२ ग्वाल्हेर. तरुण भारत.

---

## हिंदमातेच्या वीर पुत्रा !

पार शकलें उडवीत संकटांचीं
कदर करुनी नच विघ्नकंटकांची
मार्ग पुढचा तूं काट अटोकाट
जपत ' वंदे मातरम् ' मंत्रपाठ १

परिस्थिति जरि ओढील तुला मागें
आंच दुःखाची जरीं जिवा लागे
वीरमर्दा ! बेधडक धडाडीनें
प्रखर वान्हित देशार्थ उडी घेणें २

मायभूमीची राखण्यास लाज
धांवुनी ये आलीच घडी आज
हिंदसंताना ! करुनि राष्ट्रकाज
दीन देशा स्वातंत्र्य–सुधा पाज. ३

स्मरुनि भावें पावलोंपावलाला
शिवप्रभुच्या त्या शिवस्वरूपाला

हिंदमाता–सौभाग्य तिलक–देव !
पुढें अपुल्या आदर्श तोच ठेव ४
राष्ट्रदेवीचा लाडका जिवात्मा
वंद्य साऱ्या लोकांत हा ‘ महात्मा ’
मार्ग दावी उजळता कर्मवीर
गांठण्याला स्वातंत्र्य–मेरु थोर ५
दडपशाहीनें देश गांजलेला
दुःखदारिद्र्यें दीन पीडलेला
हांक मारी फोडुनी हाच टाहो
‘ दास्यापंकांतुनि मला उद्धरा हो ! ६
जरी कांहीं अभिमान पूर्वजांचा
हिंद रक्ताचा–देश धर्म यांचा
तरी येशिल चालोनि छातिठोक
पारतंत्र्यावरि धरूनियां रोख ७
नांव उजळावें पाक निजकुळींचें
नांव राखावें वीर हिंदभूचें
मर्दगिरिनें इतिहासिं रंगवावें——
पान–हेतू धरिं हाच जिवेंभावें. ८
जरी आला सैतान झुंझण्याला
नसे डगमगला–वीर कधीं भ्याला !
श्वानवृत्तीला कधिंहि नच वरावें
शूर छाऱ्यानें शौर्य गाजवावें ! ९

श्रीद शूराचें धर्म रक्षणाचें
श्रीद वीराचें देश रक्षणाचें
उडी घेणें स्वातंत्र्य–संगरांत
करुनि काळावर चढाइची मात. १०
सकल मिळवाया जन्मसिद्ध हक्क
मोल जीवाचें मोल आज रोख
वीर–मृत्यूचा पुण्यलाभ थोर
स्वर्ग हक्कानें चढे कर्मवीर ! ११
हिंद–पुत्रा ! तुज झोंप येत कैंची?
धांव ऐकुनियां हांक मायभूची
हस्त मस्तकिं तव वरद भवानीचा
वीरसुत रे तूं वीर–माउलीचा ! १२

**१४ आगस्ट १९२१ मुंबई** **तरुण भारत**

---

# तें चुंबन !

एकांतीं मज देखुनी अवचिता मद्भाव तूं जाणुनी
लाजोनी पदरास सांवरिशि गे ! दूरीं उभी राहुनी
हाता बोंचुनि वीणतां सुइ गळे तें भान कांहीं नुरे
झाला हर्ष मनीं–भयें परि वृथा देहीं भरे कांपरें !
दृष्टी बावरली वळे झट तुझी खालीं–बघे चोरुन
येतां मी जवळी उगाच भिउनी गेलीस भांबावुन.
घालोनी तव कंठिं हात उजवा सोत्कंठ आलिंगनीं
चिंचोळीं उचले हनूवर दुजें या चुंबना लोभुनी

मानेचा मुरडोनि झोंक कलता किंचित् तदा राजसे !
शृंगारें वदलीस—' काय करणें हें इश्श बाई ! असें '
चुंबाया फिरुनि प्रयत्न करतां ओठीं हंसें दाबुनी
कांहीं तूं वदणार—गेलिस झणीं चाहूल तों ऐकुनी.

*　　　*　　　*

प्रेमाच्या पहिल्या क्षणीं जिकिर तूं केली अशी ज्यास्तक
दे—दे—तें पहिलेंच चुंबन गडे ! ना धीर चित्तीं लव.

११ जुलै १९२३, मुंबई.　　　महाराष्ट्र साहित्य.

---

## कां शंका—?

साकारें नटल्या बघोनि भंवतीं सौंदर्यमूर्ती किती
नित्याचीच जिवा जडे संवय कीं, वेडे बनावें अती
जादूची नव जेथ चारु विधिची सौंदर्य-सृष्टी दिसे
तेथें दृष्टि वळे, बळें रसिकता ओढी मला राजसे !

प्रेमानें फुलली, भरें बहरली सौंदर्य बागाइत
तेथें हे मम नेत्रभृंग वळती रंगोनि आनंदित.
प्याया रूपरसा सदा सुरसची सोत्कंठ हे धांवती
पापी हेतु मनीं न कांहिं लवही—भोळे बिचारे किती

जें जें मोहक रम्य सुंदर जगीं तें सर्व मोही मना
डोळे जीव, पवित्र जागृत तदा हाले मनोभावना
स्फूर्तीनें मग हीं अशी रचतसें काव्यें मनोरंजना
तेणें कां ' मम चित्तभाव चळला '—केली खुळी कल्पना ! !

*　　　*　　　*

माझे नेत्र कसे कुठेंहि फिरले सौंदर्य—लोभी जरी !
जीवाची मम तूंच मालकिण गे !—शंका वृथा कां तरी !

१३ जानेवारी १९२३ — महाराष्ट्र साहित्य

---

## " दादा ! दादा !! "

[ परिस्थितीच्या प्रभावानें पतिप्रेमाच्या पहिल्या अनाथ आशा नष्ट झाल्यावर भोगहृदयी बापाच्या लोभामुळें वृद्धाशीं तनुविक्रय करणें भाग पडून अकालीं वैधव्याच्या वज्राघातानें व्याकुळ झालेल्या आमच्या या निष्ठुर समाजांतील हताश युवतींना आपल्या जीवाच्या जिवलग प्रियकराजवळ शेवटीं बंधुप्रेमाचीच भीक मागणें नशिबीं येतें ना ! प्रस्तुत प्रसंग असाच आहे ! ]

दैवानें अघटीत दुष्ट घटना—चातुर्य हें दाविलें
काळाची कुटिला गती उमगली दिङ्मूढ मी जाहलें;
वृद्धाला विकुनी जरी मम पिता दुस्मान झाला खरा,
देखावा न परि अनाथ विधवा कन्येस या वांचला.

हृत्सिंहासनिं पूजली अजवरी नाथस्वरूपें भली,
मूर्ती मंगल सुंदरा प्रियकरा ! लाखांत जी शोभली;
' प्राणेशा ! प्रियवल्लभा ! ' नित असें संबोधिलें मीं जिला
जातें काळिज फाटुनी जिवलगा ! ' दादा ! ' म्हणाया तिला.

प्रेमाच्या नव पूजनास्तवचि जीं आशासुमें वेंचिलीं
दैवीं येइच तींच हा ! उधळणें त्याच्या समाधीवरी.
सौख्याशा जहरी खुळ्याच हृदयीं जी प्रीतिनें पोशिली
जीवा वंचुनि घातकी अति अतां ती तीच जाळी पुरी.

माता तातहि देवधर्म सगळे तुम्हीच आतां मला,
जिव्हाळा जळत्या जिवा जगिं; पदीं मत्प्राण हा गुंतला,
आलें धांवुनि मी अनन्यशरणा आशाळभूतासम,
ओशाळून जरी असें परतणें धिक्! धिक्! जिणें हें मम.

ये पाणिग्रहणास हात पुढती सृष्टि-क्रमा नेणुनी,
मागें जो परि खेंचला निजबळें काळें खळें तत्क्षणीं,
आशा दीन तळावतेच अजुनी निस्तेज या लोचनीं,
" तो तोची आजि उद्धरील मजला या दैन्य पंकांतुनी."

बंधो! प्रेम-विशुद्ध-भाव पहिला चित्तीं स्मरोनी तरी,
तारी-वा भगिनी अनाथ चरणीं ताडोनि लोटा दुरी,
भारी अंतरिं सांठला भरंवसा-आधार तुम्ही मला,
निःस्वार्थी दिलदार वृत्तिसि तरी साजेल तैसें करा.

१।११।२२ ग्वालेहर. मनोरंजन

---

# आम्ही मराठे गडी!

तेजें मंगल आत्मतेज उजळूं मेल्या महाराष्ट्रिचें
दावूं अंतरिं शुष्क सह्यगिरिच्या पाणी पुनः जातिचें
फेंका वन्हित एकजात पहिली देशार्थ घालूं उडी.
फोडोनी नरडी कडाड रिपुची ' आम्ही मराठे गडी!

अंगीं देवकळाच दाविति जिथें निर्जीव पाषाणही
कृष्णेचें जल बिंदुमात्र उठवी जीवंत प्रेतासही
ज्याचें नांवच शत्रुला भिववुनी लावीत देशोधडी
त्या देशांत कसे हराम निपजूं ' आह्मी मराठे गडी ' !

आह्मी कर्दन काळ मर्द ! उडवूं काळाचिही गर्दन
दास्याचें करुनी क्षणांत अवघ्या निर्मूळ निर्दाळन
प्राणांना विकुनी क्षणार्धिंच करूं स्वातंत्र्यशाही खडी,
निःशस्त्र प्रतिकार नित्य करुनी ' आह्मी मराठे गडी ' !

सिंहाचे रणगाजि पाक कुळिंचे बच्चे—न हो ! मेंढरें
मेलें रक्त मवाळ गारठुनियां देहांत ना संचरें
मारूं वा मरुं ना पळूं बचवुनी युद्धीं परी कांतडी
नाहीं ठाउक षंढता कधिं अह्मां ' आह्मी मराठे गडी !'

ज्यांनीं काल कृतांतही नमविला बच्चे तयांचे अह्मीं
नामर्दासम कां गुलामगिरीच्या सारे सडूं कर्दमीं ?
धिःकारीं वदतील पूर्वज तरी ' वाचाळता कोरडी—
स्वार्थाचेच गुलाम देशबुडवे कैचे मराठे गडी ? '

" शापें जाळि समाधि रायगडची; क्रोधानला पांखडी
शोकानें तुटती तटाट कढत्या सह्याद्रिची आंतडीं
ओशाळून स्वराज्य—माय परक्या दारीं फिरे बापुडी
स्वातंत्र्या गमवोनि स्वार्थ बघतां ! कैचे मराठे गडी !"

" स्वार्थी शील विकोनि हाय ! भुलता या वैभवा बेगडी
कच्चे भ्याड तुह्मी बहादुर खरे हे बोलके बांगडी !

संग्रामीं पडली–चिरंजिव परी ती मर्द मेलीं मर्दी
नाहीं सत्त्व तुम्हां–जिवंत मुडदे तुम्ही मराठे गडी ! ”
कां दैवा अजि दोष देत रडतां ? साधाच आली घडी
कां ठेवोनि कपाळिं हात बसतां ? आतां करा तांतडी
हातीं आइ भवानि घेउनि पुनः ती लेखणी तागडी
दावूं हा अभिमान सार्थ करुनी ‘ आह्मी मराठे गडी !
भाईनो ! बलहीन दीन दुबळी ही मायभू आपुली
टाहो फोडुनि दास्यपंकिं रुतली बाही बहू गांजली
या या धांवुनि राखण्या झडकरी लज्जा तिची नागडी
दावा या जगतास कोण कसले तुह्मी मराठे गडी !

*　　*　　*

आई देवि ! स्वतंत्रते ! वद कुठें जासी अह्मां सोडुनी ?
पापी कर्तबशून्य हे अह्मि तरी जातेस रागावुनी !
प्रायश्चित्तचि घेउं थांब सदये ! रक्तार्घ्य वाहूं कुडी
पापांच्या उजळूंच कोटि तर्थि या ‘ आह्मी मराठे गडी !

तरुण भारत

---

## ओझरतें दर्शन.

रस्त्यानें रडक्या जगीं रखडतां दृष्टी तुवां वेधिली
तारे ! होउनि मोह–संभव मनीं ही ओढणी लागली
जागे जीव पिसाट हें संभवतीं नाचे निराशा–तम !
आशा–तारक हांसला मजवरी; जाळी परी संभ्रम

झालें ओझरतेंच दर्शन तुझें मोही मनोहारिणी !
प्रेमाचा तव दास जीव हळवा जाई तुझ्या मागुनी
प्रीतीची वहरे अखंड फुलती ती जादुची वाटिका
दिव्यीं लीन करोनि देवि ! सदये ! त्यामाजिं नेशील कां ?

काव्यीं चित्र चितारिलें नच रुचें माझें मला हें परी
व्हावें चित्त गमे अखंड तव या तेजाळ नेत्रांतरीं
मी हा पामर रंक ! आणि तुजला तें स्वर्ग–सिंहासन
सौंदर्यें अति दिव्य कोण न परी जाईल वेडावुन ?

*                *                *

बैसे लावुनि दृष्टि शून्य गगनीं वेडा बने मी खरा
वाटे प्रेमसुधेसि सिंचुनि तया देशील शांती जरा

४ नोव्हेंबर १९२२, ग्वाल्हेर.                मधुकर.

---

## हा ! हा ! हंत !

तारापुष्पतती मनोहर किती तेजाळ ही गोजरी
फेंकी हा खडकाळ काल विजनीं आकाशमाळावरी !
हा सौगंधभरें गुलाब वहरे कांट्यांत कीं कोंबला
रत्नांचा खजिना अमोल भरुनी अब्धीतळीं ठेविला.

घाली हा मदिरार्कची जहरिला द्राक्षारसीं सुंदर
जाळी जीवकला वियोग–अनलीं प्रीतीच चेतोहर
प्याला जों न रिता अखंड भरला सौख्यामृताचा नवा
दुःखाची छपलीच आग जळती जाळीत जाई जिवा

आशेची नव पौर्णिमा उजळली आनंद–तेजें फुले
काळी आवस तोंच येत नशिबीं ! हें चित्त शोकें उलें
काळाचेंच अफाट अंगण ! विधी–सत्ता तिथें नांदते.
विश्वाचें करिं सूत्र नाचवित ही मायावती खेळते.

*　　　*　　　*

आनंदें नटली सुरम्य दुनिया, वैषम्य लेणें तिला !
हा ! हा ! हंत कठोर निष्ठुर किती भासे विधाता मला !

महाराष्ट्र साहित्य

---

१०५

बंधू बंधू विभक्त आम्ही शंभर आणिक जरि पांच
' पंचाधिक शत ' एकचि परि समध्येयास्तव होऊं साच !
तेतिस करोड बंधू आम्हीं भिन्न भिन्न जरि पथ अमुचे
हिमतीचे नव अचल हिमाचल विभव वाढवूं राष्ट्राचें.
मतामतांचा विरोध झाला जाती धर्मास्तव भांडूं
सत्वासाठीं स्वातंत्र्याचें संगर परि सारे मांडूं.
मवाळ कोणी जहाल कोणी कुणी बनो वा नेमस्त
स्वतंत्रतेचें एकचि वाहे नसानसांतुनि नव रक्त.
बुद्ध पारशी हिंदु मुस्लिम आम्हीं नाना धर्मांचे
रंग विविध हे वरवरचे परि हृदय एकची हिंदाचें !
दख्खन कन्नड उत्तरवासी कुणि मद्रासी गुजराथी
' एकमेवाद्वितीय ' माता कुठें कुणाची जरि वसती !

राष्ट्रलतेवर फुलेंच फुलली सुंदर कोठें कशीतरीं
ऐक्यप्रेमाचा दरवळतो सुगंध एकचि दिगंतरीं.
राष्ट्राच्या या विराटदेहीं जीवकला एकी नाचे
इजा जाहली एकाला तरि दुःख दुजाला होत असे.
उठा बंधुनों ! एक दिलानें रण माजे स्वातंत्र्याचें
गत कालाच्या गर्तेमध्यें गाढ मुडदे कलहाचे.
दावा पाणी मर्दावाणी वणवा भडके दास्याचा
घुंगट घेउनि खुशाल नंतर स्वैरपणें निजगृहिं नाचा.
लाभ तिजाला कलह माजला नाहक जरि जगिं उभयांचा
कुचला कैंचा वेड पांघरुनि चाळा घातक निद्रेचा !
डावा उजवा भेदचि नुरला बंधु सहोदर सर्व अम्ही
परस्परांस्तव प्राण वेंचुं या स्वातंत्र्याच्या संग्रामीं ?
जवान जनानी असेल कोणी भ्याड दिलाचा तो कच्चा
बोला 'हरहर महादेव' तो स्फुरेल मर्दाचा बच्चा.
कोट छातिवर जरी मांडिती तांडव अठरा अक्षौहि
संघशक्ति निर्भंग–दुभंग न करूं शके कल्पांतिं कुणी.
राजदंड थोपले प्रचंडहि भंग पावले यमदंड
अखंड नाचे उदंड अमुचें शौर्य नाचविल ब्रह्मांड !
अंगचोर पळपुटा अडमुठा तोहि करी आटापीटा
उठा यार ! भिडवाच बाहुटा काढा बेकीचा कांटा !

[illegible] जून १९२१, सातारा स्टेशन. तरुण भारत

# निरोप

शब्द बाहेरी फुटेना फार घोटाळे जरी
'जा' असा ओंठावरी
या निरोप द्यावयाला ऊर माझा फाटतो
कंठ भारी दाटतो
ये कधीं ऐसा सुदैवें योग भेटीचा पुनः
कल्पना नाहीं मना
सौख्यदायी गोड होतां भूतकाळींची स्मृती
चित्तवृत्ती रंगती !
भावना बेभान झाल्या जीव मेला तत्त्वतां
बाह्य विश्वाला अतां.
हा परी डोळ्यापुढें या काळ भावी ठाकतां
धांव घेई शून्यता !
हांसती भारोनि जीवा तारका तेजाळ या
चित्तहारी जादुच्या.
हांसुनी केव्हां तरी कां प्रेमधारा वर्षिती
या पुनः ऐशा रितीं ?
पेटत्या जीवा रिझाया गे पुनः लाभेल कां
नेत्रिंची ही चांद्रिका ?
क्रूर खोटा काळ भावी हा—तरी बेचैन तो
जीव शंका वाहतो.

पूस वेडे लाडके ! हे अश्रु शोकाचे असे
मोल त्यांचे राजसे !
नित्य ठेवी लोभ भारी दीन या दासावरी
ही विनंती सुंदरी !

२ सप्टेंबर १९२२, पुणें. महाराष्ट्र साहित्य

---

# टिळक देव गेले—?

वैभवांत चढत्या साचा निखळला चांद गगनींचा !
ग्रहमाला तुटली सारी चळकांप मेरुमंदारीं !
या अशा घोर अवकाळीं ब्रह्मांड फोडि किंकाळी
हिमातिचा हिमाचल चळला
आणि शेषशीर्षिंचा गळला
ताराच ध्रुवाचा ढळला
जीवास बसे हा धाय टिळक देव गेले—? हाय !
जनतेचा छेलछबेला राष्ट्रदेविचा अलबेला
देशाचा पालनवाला जगताचा जादूवाला
जणुं घेई मुरलीवाला अकराव्या अवताराला
बांसरिचे घुमतां बोल
गुंगला जगाचा गोल
चेतना स्फुरे अनमोल
ही चलाचलाची ग्वाही टिळक देव गेले— ? नाहीं !

मोहरा पडे विद्येचा निर्भीड लेखणी तुटली
अस्खलित ओघ वाणीचा ती वक्तृत्वाची शैली !
तेजस्वी बाणेदार ती वंद्य विभूति निमाली.

स्मरतां ती सोज्ज्वळ मूर्ती
उज्ज्वलचि चिरंजीव कीर्ती
सहजींच उसळुनी स्फूर्ती

दे शांत जिवाला ग्वाही टिळक देव गेले—? नाहीं !

तोडुनी पाश कायेचा या दुबळ्या पार्थिवतेचा
या अनंतधामीं आला हा अनंतरूपीं नटला
उजळत्या कर्ममार्गाला दावितो हिंदजनतेला

तरळती तयाचे अंश
कळविती दिव्य संदेश
सत्यचि कर्तव्यादेश

उधाळितो दिव्य चैतन्य तो कर्मवीर जगिं धन्य !

कीर्तिनें चिरंजिव ठेला बुद्धीनें अमर जहाला
हक्कास्तव धैर्ये लढला हक्कानें स्वर्गा चढला
व्यापुनी उरे दिक्काला काळावरी घाली घाला

मरणाला मारुनि उरला
सर्वान्तर्यामीं रमला
अणुरेणुंत अवघा भरला

तो वीर कधीं नच मेला हरघडीस जन्मा आला !

कर्तब वीराची खाशी रंगवी पान इतिहासीं
हिंमत मर्दांची खाशी ! तारिले मायभूमीसी
फांकडा गडी दमदार झुंझलाच आपत्तीशीं

पुरुषार्थ खरा गाजाविला
पुरुषोत्तम जगतीं ठरला
वीर–टिळक सार्थ जहाला

काळावर करुनी मात स्वर्गास घातला हात !

फांकली प्रभा पूर्वेला ये बाळरवी उदयाला
तो तोची टिळक महात्मा जागवी प्रतिदिनीं आम्हां
हे किरण नव्या स्फूर्तीचे उसळलें तेज राष्ट्रांचें

दगडास देवपण येई
निर्जिवांत जीवकळाही
बरसात सुधेची होई

रसरसलीं पिकलीं पानें मोहरलि करपलीं रानें

अवतरला हरिहर आतां जयविजय गातसे गीता !
थाटला राष्ट्रसंसार ! लोटले मोद आऊर !
स्वातंत्र्याच्या प्रणित्यांनों ! जातिच्या हिंदपुत्रांनों !

पाउलें शिवाचीं स्मरुनी
टिळक–कार्य आणा ध्यानीं
ऐकावि महात्मा–वाणी

दाखवा अंगचें पाणी बेदर्दच मर्दावाणी

डोलूंदे समाधी मोदें संतोषें गयगडींचीं
या—उठा—धांव घ्या—राखा नागडी लाज देशाची
उसळूंदे उत्साहाची उकळी ताज्या रक्ताची
देशार्थ देह झिजवीणें
देशार्थ जिव जगवीण
देशार्थ काय तें करणें
दे पाठ याच मंत्राचा शाहीर लोकशाहीचा !

मौज.

---

# अंतिम विनंती

पाजले ऐले विषारी क्रूर दैवानें मला
जाळती जाणीव झाली अंत आतां नेमला !
ये अकाळीं दैन्य भाळीं; जिव जाळीं कोंवळा
ये उदासी हर्घडीसी—हा प्रवासी बावळा !
स्वार्थवृत्तीची प्रचीती ये जगाची ही भली
गोड शब्दाची सुखाशा ! तीहि नाहीं लाभली !
क्रूर सत्यांची निशाणी जागजागीं थाटली
रात अंधेरी निराशेची मनीं या दाटली
वीट आला--या जगाचा पाश आतां तोडला
बेनिशाणी तीर हा वाऱ्यागती या सोडला !
भारुंदे इष्की नशा जीवा समाधी लागुनी
अंतरींची ही सदाची विस्मरूं दे कांचणी
दे भरोनी प्रीतप्याला ऊठ—कांठोकांठ हा
जिव वाळे—सोड चाळे—दाह चाले—हा पहा !

१६।७।२२ मुंबई

मधुकर

# माझी मानसपूजा

आयुष्याची आधिदेवता किशोर मूर्ति प्रेमाची
जीवनांतली जादु अजब कीं माया मूर्तचि मदनाची
तूं आशेची कमान चढती; फुलवी दुनिया प्रेमाची!
तुझ्याच चरणीं जीव वाहिला कुरवंडुनि काया साची.
मनोमंदिरीं अविरत विलसे मुग्ध—मनोहर तव मूर्ति.
सतत तेवते—जळती ज्योती मम जीवाची तुजपुढतीं.
प्रतिदिनिं वाहुनि दल एकेकचि नव-विकसित हृदयाब्जाचें
अखंड चाले प्रणय—देवते! व्रत मम मानसपूजेचें.
तुझ्या गुणांचीं स्तोत्रें मंगल भावभक्तिनें गात सुखें
निर्हेतुक मत्प्रेमामृत—नैवेद्य अर्पितां मन हरखें.
मूलमंत्र राजसे! प्रेम हें दिव्य एक या विश्वाचा
प्रेमसमाधी जडली गातां प्रेमपाठ त्या मंत्राचा!
प्रेमाचा तव दास तुला मी असेंचि पूजुनि विमल मनें
आळवीन नित हृदय—देवते! वढत्या भोळ्या भावानें

१२ जुलै २१ पुणें

मधुकर

---

# आली संधी दवडूं नका!

खुंडित हा ब्रह्मांड अखंडित झपझप चाले काल कराल
आली संधी वाया गेली नंतर रडुनी काय कराल?
क्षण मोलाचा आयुष्याचा व्यर्थ एकही नच दवडा!
पळापळानें काळ चालला—उठाच! खळ आळस सोडा!

ऋद्धीसिद्धी सुखसमृद्धी जल वाहति उद्योग-गृहीं
उद्योगाच्या कल्पतरूसम अन्य फलप्रद जगिं नहीं
करा आजच्या आज काज निज प्राप्त काय जें करण्याला
" उद्यां " शब्द हा घातकी महा मूळ दुःख दारिद्र्याला
लक्ष्मी कीर्ती त्याला वरिती अविरत ज्या उद्योग-रती
" प्रयत्नांतिं परमेश्वर " पावे धरा चित्तिं ही सुजनोक्ती
" भूतकाळ " चीं सुत्रें भिवविती " भविष्य " टाकी भेदरुनीं
चाटाळ्या हा वैद्य विचक्षण " वर्तमान " कटु " काल वनीं "
भूतकाल निज मनांत स्मरुनीं नजर भाविष्यीं टाकावी
वर्तमान आचरुनी आली संधी कधिं ना दवडावी.

अमराझेया अंत " उद्यां " ला नच कल्पांतापर्यंत
" काल " एकदां गेला ये ना माघारा जरि कल्पांत.
" आज " अशाश्वत खचित मरोनी भूतकाळचें हो भूत
आहे तोंवरि संधी साधा करा परिस्थितिवर मात.
लोकनायकांच्या या हांका ऐका ! " ओ " द्या झणिं सारे
कर्तव्याला अखंड जागुनि कार्य करा उत्साहभरें.

झगडुनि या स्वातंत्र्य-संगरीं जन्मसिद्ध हक्का मिळवा
संपादुनियां मंगल विजया झेंडा अस्मानीं रोंवा !
हक्कानें मग स्वर्गे चढोनी आत्मा ध्रुवतारा बनवा
इतिहासाच्या नीळ निराळीं तारा अढळाचे चमकावा
त्या ताऱ्याच्या तेजबळानें जन-जागृति झणिं होईल
दृष्टी रोंखुनि कर्मपथीं तरोजें जनता चालेल.

उठा ! उठा ! महेशबंधुंनों ! स्वदेशभूच्या भक्तांनों !
डोळे उघडा ! स्वातंत्र्यास्तव स्वतंत्र जळत्या जीवानों !
सभोंवतालीं दृष्टी फेंका ! आली संधी दवडुं नका !
अभिष्ट चिंतित सफल सहज तरि सत्य बोल हे विसरूं नका

तरुण भारत.

---

## उत्कंठा

भरला दर्या तुफान तुंबळ खवळे हृदयाचा भारी
उत्कंठेच्या उंचावोनी उर्मी उसळति वरीवरी!
सळसळ परती फेंसाळोनी पूर वाहतो प्रेमाचा
आजिना खोलुनि दुनियेला नव दावित आशारत्नांचा.
निरखुनि सुंदर तव वदनाचा चांद उजळत्या कांतीचा
भरती आली आनंदाला हंसला तारा जीवाचा
मगरामिठी घालुनी जिवांची ये ये मुग्धे--विमलमनें
परस्परांच्या हृदयसागरीं उडी घेउंया प्रेमानें
प्रणयतरंगासवें रंगुनि अंतरंग मग उभयांचा
अनंतांत गे जाइल.विरुनी पाश तोडुनी द्वैताचा !
अव्यक्ताचा अज्ञेयाचा अंत काढुं सुंदरी ! तरी
दिव्य सुखाचा ब्रह्मानंदीं जिव झुले हा घडभरी !
शून्याच्या मग पैलतिरावर अद्वैताच्या मैदानीं
सर्वस्वाची दिव्य प्रीतिची आनंदें गाऊं गाणीं !

महाराष्ट्र साहित्य.

---

# विरही जीवास

( विरहानें व्याकुल झालेल्या प्रेमी जनाला सुज्ञाचें प्रेमी हृदय आणखी समजाविणार ! )

प्रणयी जीवा ! धाम तूंचि मम भव-विश्रांतीचें
आनंदाचा स्वर्गचि मंगल निधान शांतीचें
सुदिन हांसले अमित सुखाचे प्रणय विलासाचे
निर्दय दुर्दैवाला परि ते सहतीलचि कैचे ?
विरह असह नशिबाला आला सखये ! उभयाला
नाहिं विसावा तिळहि सुखावा जळत्या जीवाला
रिता जाहला सुखामृताचा प्याला जों न जरा
यदृच्छें दुःखाचा जहरी ओंठाला भिडला.
वीण सुबक ही सुख दुःखाची मनहारी गमली
चलच्चित्र-चारुता भवाची क्षणभंगुर नटली !
मधु आशामय तोच चिलपट जगतीं निर्झर मोदाचा
जिवधारणा करि जीवांची निर्झर मोदाचा.
दुःखसागरीं अगाध लपलें सुखमणि भांडार
अर्क जहरिला तो मदिरेचा द्राक्षारसिं मधुर.
प्रीतीमध्यें विरह वसावा विरहीं ती प्रीती
विरह वाढवी जगीं राजसे ! प्रीतीची महती !
नको-गडे-मुळिं नको वृथा हीं वेरूं अश्रूचीं
अशीं अमोलिक माणिक मोती दिव्य प्रेमाचीं.
कालाचें हें पडेल रमणी ! झपझप पाऊल
विरह निशा संपुनी सुखाचा शुभ दिन उगवेल

आशेच्या मधुतालावरती जीवकला नाचे
आशादेवी हृदय नाचवी साऱ्या विश्वाच
हृदयिं कवळुनी अतां लाडके ! त्या मधु आशेस
प्रणय सुंदरी ! मन हृन्मंदिरिं सुखें करी वास.

विजय-

२३।८।२१ ग्वाल्हेर.

---

## अंगाई

[ चाल—वीर अभिमन्यू० ]

नीज रे बाळा । बाळा लडिवाळा !
जरा तरि लागूं दे डोळा.
टाकुनी चाळा । चाळा खेळाचा
छंद धरि जो जो गाईचा
मिटेना डोळा । डोळा क्षणभरही
उडाली झोंप कुठें बाई !
खळ कशी नाहीं । नाहिं खेळण्याला
खुदुखुदू गालीं हंसण्याला.
गुणाचा भारी । हा चिमणा राजा
गोजिरा जीवाचा कलिजा.
तान्हुल्या ! निजली । हंमा गोठ्यांत
वांसरें तान्हीं चाटीत.
सोनुल्या ! छकुल्या ! । पिंजऱ्यांत निजली
राघू मैना बघ अपुली !

चुलीच्या मागें । दुदु पीवोनि मनी
ध्यान करी डोळ्यांना मिटुनी
छबकड्या ! बगड्या ! वेल्हाळा सारें
काउचिउ घरट्यामधिं निजले.

बांधुनी झोळें । झाडावर झुलते
फुलें वनवेली निजवीते
चलाचल झाले दंगाचि निद्रेंत
चहुंकडे होत शुकशुकाट.

लोटला प्रहर । रात्रीचा पहिला
हांसतो चांदोबा तुजला !
घातलें न्हाऊं । काजळ डोळ्याला
लाविली तीट कपाळाला

बाळगोळी कां । ती चढली तुजला ?
शिवेना तरिच झोंप डोळां
दृष्ट कीं लागे । कोण्या पाप्याची
मावळे नीजच छबुल्याची !

येइ जोखाई । आई सटवाई !
बाळा सांभाळा बाई !
अमंगळ सारें । जळो दुष्ट भारी
टळो ती इडापिडा सारी.

घांस उतरून । उद्यांच टाकीन
माझ्या या बाळावरून

झाविते तुजला । अंगाऱ्याला या
नांवानें सटवाईच्या.
सुखानें नीज । नीज अतां बाळा!
भिऊं नको तूं काळिकाळाला
घुटी कीं देऊं । पुनः राजसाला
लागण्या डोळा डोळ्याला.
तुज असा बघुनी । बघुनि खेळतांना
स्वारिला झोंपच येईना.
उठे बघ स्वारी । तुज खेळविण्याला
मटामट मुके घ्यावयाला.
सांगते 'तिकडे'। निजला बरं बाळ
लाडका भारी अवखळ
नीज नां बाळा । अतां पाळण्यांत
गाते अंगाई गीत.

३ डिसेंबर १९२१ इंदोर.

---

## देवा ! निराशाच दे

आशा अंधुकही जिवास दुबळ्या होते जगाया पुरी
आशेवीण अशक्य जीवन जगीं प्रेमी जनांचें तरी
जी जी गोड गणोनि मी कवटिळिली आशा मुदें अंतरीं
अंतीं काळिज कांपुनी फसवुनी ती तीच गेली परी

वाटे चंचळ घातकीच नटवी ही दुष्ट वारांगना
चित्तोद्वेग दुणावुनी वितरते नानापरी यातना
माया–जाळिं खुळ्या जिवास फसवी ! दुःखें नवीं वाढवीं
ऐशी ही मृगनीरशी असुखदा आशा कशाला हवी ?

वेडे पीर तिला कितिक भजती एकाग्र चित्तें जरी
कोणाची जगिं जाहली अजवरी सर्वांशिं आशा पुरी ?
दुःखाची करि तीव्र जाणीव मना आशा निमाल्यावरी
जीवाची समतोलवृत्ति बनवी ती ही निराशा बरी.

आशेचें न मुखावलोकनहि तें कालत्रयीं होउं दे
आतां कायमची अशीच मजला देवा ! निराशाच दे.

१०।१।१९२२, ग्वाल्हेर.

---

## प्रणयवंचितेचे उद्गार !

स्वार्थी साधुनि शेवटीं फसविले भोळ्या जिवाला खला !
जन्माची धुळदाण !–हाय ! मुकले लोकांत मी अब्रुला
निंदा घोर असह्य चालत जनीं वैतागला जी ।
मृत्यूवांचुनि कोण टाळील अतां निर्भर्त्सना ही महा ?

नेणें मत्सम पापपंकिं अबला गाई किती लोटुनी
डोळे पोकळ सभ्य वेषिं फिरसी या अंध वेड्या जनीं
कीर्तीमान धनांत नांदसि जरी काळा ! सुखें संप्रति
दुष्कीर्ती जगतीं भरे तुज मिळे मेल्यावरी दुर्गति

चांडाळा ! बहु पापराशि रचिल्या ज्या घोर तूं चोरुनी
देती रौरव यातना कुजुनि दुर्गंधें तुला जाळुनी
चाखाया जरि चांगली न पचती ती दुष्कृतींची फळें
कामांधा ! कळि कोंवळी चुरडुनी ही काय तूतें मिळे ?
अन्यायी तुजला समाज पुजुंदे—हो न्याय देवाघरीं
पापांचा भरला घडा फुटतची जन्मांत केव्हांतरी !

२।१२।१९२२ ग्वाल्हेर

---

## स्मशान—संगीत

(आग्र्याच्या आसपासच्या प्रदेशांतील पूर्ववैभवाची व स्वातंत्र्य—साम्राज्याची साक्ष पटविणाऱ्या इमारतींची प्रस्तुत स्थिति पाहून स्वातंत्र्यासाठीं जळत्या जीवाची अशी मनः—स्थिति झाल्यास नवल काय ?)

झालों वेडा पुरता—सोडा वाट मला—मज जाऊंदे
हिंद—भूमिचें स्मशान येथें स्मशान—संगीत गाऊंदे.
गुलामगिरिचा गुलाम बंदा पिशाच्च जो परवशतेचा
करी नाच बेताल ओळखुनि तालसूर या कवनाचा.
राख माखली तनुवरि करुनी होळी सुखाची स्वार्थाची
धडधड जळते ज्वाला हृदयीं स्वदेशभूच्या भक्तीची.
अनाथ दुबळे अपंग आत्मे परवश वणवण किति फिरती
हिंदस्मशानीं स्वातंत्र्याचें अश्रूंनीं तर्पण करिती !
सृष्टी थिजली; दास्याचा हा प्रळयकाळ काल नच सामान्य
शून्य घनांधःकार चहूंकडे शून्याविण न दिसे अन्य !

फत्तर सारे—उंच ढिगारे—व्यर्थ पसारे विभवाचे
    महालावरती महाल चढले भयाण भेसुर शांतीचें
मनोरथांचे नष्ट मनोरे स्वातंत्र्याचें हें थडगें
    स्वातंत्र्याच्या इतिहासाला संतत कंठरवें सांगे
अफाट माजें एकछत्रि निष्कंटक शांती—साम्राज्य
    परवशतेच्या पोशिंद्याला स्मशान—शांती ना त्याज्य
क्रीडा—स्थळ कीं मंगल केवळ स्वतंत्रता सुरदेवीचें
    आज जाहलें स्मशान सगळें परवश पापी प्रेतांचें
काळाची कीं अंसुरी माया उघडी दौलत दुनियेची
    दौलतजादा काळ बजावणी करी वारसा हक्काची
कबराचे हें जाल करालची निर्जिव दगडांची रास
    नव्हे—झोपलें हिंदपुत्र हे—जागुनि निज कर्तव्यास

*　　　*　　　*

ऐका हांका मम हृदयाच्या—कबरा फोडुनि बाहेर
    चला उठा या—मेली नच कां नीज—अजूनि किति निजणार ?
ऐका भेरी स्वतंत्रतेची ! हृदयतुतारी झणिं ऐका !
    हीन दीन अवस्थेमाजीं किति सहणें अपमान फुका !
हिंदभूमिचे पुत्रांनों या ! हांक हिंतमाता मारी
    परवश झाली फार गांजली मुक्त करा दुःखी भारी
देशभक्तिची सुधा सिंचिता नेत्रपद्म उमलतील
    तांठ लांकडे हलूं लागतिल प्रेम पल्लवें फुलतील !

फोडुनि टाहो कंठरवें चिर हलविन मी ब्रह्मांडाला
परी एकदां जिवंत उठविन मृतवीरांना या सकलां

❀ ❀ ❀

सत्व सुरांचें बळ असुरांचें अंगीं संचारित सांचें
जन्मसिद्ध हक्कांचें माजे रण स्वातंत्र्याचें
स्मशानसंगीत गाया मजला साथ भग्न निज हृदयाची
गातां गातां त्यांतचि विरलों स्मृति कैंची मग गाण्याची !

११।१०।१९२० आग्रा फत्तेपूर तरुण भारत.

---

## लक्ष्मी-पूजन

लक्ष्मीपूजन आज—कां परी
हृदयसागरीं विचार-लहरी विविध उसळती फार॥ध्रु०॥
सण वर्षाचा दिपवाळीचा
सम्राटचि जणूं सकळ सणांचा
उधाळित ये उत्साह स्वर्गींचा
अवनितलावरि अखिल चराचरिं दाटे मोद अपार !
आनंदाचें पर्व उदेलें
मांगल्याचें तेज उसळलें
उल्हासाचे रंग उसळले
आनंदी आनंद कोंदला—सेवि जीव सुखसार !
सानथोर नटल्या नरनारी
नगर शोभलें इंद्रपुरीपरि

3626

लक्ष्मीपूजन अहा ! घरोघरिं
    रावरंक पूजनीं सकळे करिती लक्ष्मीचा सत्कार !
चकचकाट नयनांस दिपवितो
थाटमाट जीवास खुलवितो
घमघमाट मनहारि सुखवितो
    प्रसन्नतेचीं फुलें वाटिका—सौख्याचीच बहार !
आनंदाची अशी दिवाळी
उत्साहें जन करिति साजरी
मीच अभागी जन्मदरिद्री
    दैन्यकर्दमीं कुजणें भाळीं—! जाळी हाच विचार !
संपत्तीमार्गे कुणी लोळती
किती आकिंचन दैन्यीं सडती
निराश जीवित कष्टें कंठिति
        प्रभो ! देइ वैषम्य—ताप जरि रम्य विश्वसंसार
गांठीं नाहीं कपर्दिकाही
विन्मुख मजला लक्ष्मीमाई
लक्ष्मीपूजन—दिन हा येई
        हाय ! कोपली सदय माउली—पुजूं कोणा साचार ?
विचारतंद्रित अशा गुंगुनी
रखडत असतां रस्त्यावरुनी
सहज देखिलें दिपल्या नयनीं
        एका धनिकाच्या प्रासादीं खुलें रत्नभांडार.

संपत्तीच्या राशी अगणित
बघुनि अशा त्या भांडारांत
कुबेरही तो व्हावा लज्जित
गमलें मंगल मज तें लक्ष्मीचेंच विलासागार !
यथाविधि लक्ष्मीस पूजती
नव वर्षाचें पान उलटती
सद्भावें शेटजी संप्रतीं
मंगल वाद्यें गर्जेति—खेळे उत्सव हारोहार !
ऐश्वर्येचि तें खिळलें नयनीं
तसाच दुर्मुखलेला परतुनि
दूर बैसलों विषण्ण होउनि
मिटल्या नयनिंहि दिसूं लागला तोची घन—संभार.
त्या तेजस्वी धनराशींतुनी
स्त्री—रूपाची ज्योति प्रकटुनी
गगनिं चालली दिगंत दिपवुनी
दिव्यरूप साकार श्री धरी—झाला साक्षात्कार.
" कुठें चाललिस आई ! आई ! !—?
दया लेंकरांची कां नाहीं ?
वत्सलता कां लोपूनि जाई ?
तूंच जिव्हाळा तूंच त्यागतां कोण अम्हां आधार.
वदतां ऐसें क्षणीं थांबुनी
बोलुं लागली विषण्णवदनीं

" बाळ ! पुससि कां वेड पांघरुनी ?
दूर लोटुनी तुह्मींच दाविलें मज परक्याचें दार "
" तुह्मि पोशिंदे गुलामगिरिचे
बोलघेवडे भक्त रूढिचे
पुत्र कशाचे—! वैरी साचे !!
धर्म—नीतिला वधिलें—केला स्वत्वाचा संहार ! "
" दिव्य स्वरूपें माझीं भुवनीं
मंगल—परि या स्वार्थांधांनीं
निष्ठुरतेनें तुडवुनि चरणीं
विडंबिलें गांजिलें मज असें—झालें मी बेजार ! "
" गणितां लक्ष्मी जिला जगीं या
केवळ ती मम तेजच्छाया
मूढा भुलवी चंचल माया
बहिरंगाचे करी सोहाळे वेड्यांचा बाजार !
तव बंधूंच्या कृती निरखुनी
पहा एकदां उघड्या नयनी
पुरतें मग तुज उमजेलचि मनीं
परदेशी मी अभागिणी कां फिरतें दारोदार. "
' आइ कृपेची पांखर घाली '
' क्षमस्व'—वदलों जों बद्धांजलि
क्षणार्धिं अंतर्धान पावली
ज्योत निमाली—तेज लोपलें—माजे अंधःकार !

शब्दब्रह्म वाऱ्यावर विरलें
नादरूपिं परि भरुनी उरलें
अणुरेणुंत जणुं घुमत राहिलें
        उदासवाणी स्थिरे दृष्टी मम गगनीं शून्याकार.
काळोखाची रडकी रजनी
भयाण भुरकी भरली भुवनीं
दृष्टी पाहे खालीं वळुनी
        कभिन्न काळा समाजांतहि सामावे अंधार.
अज्ञानी दुर्दैवि आंधळा
कवळोनी अज्ञान तमाला
समाज सारा घोरत पडला
        अहंपणाच्या नशेंत झिंगे—रूढीचा लाचार !
सत्त्व—आंगिचें पाणी सडलें
द्वेषदुःख सुसरींनीं भरलें
दुष्ट मती कीटक बुजबुजले
        गुलामगिरिचा डोह विषारी—समाज बुडला ठार !
सुधारणेचे शाहिर सारे
तोंडाचे बोलके नगारे
क्रियाशून्य वाचाळ हे खरे
        भ्याड जातिचे पोकळ ढोलें उगाच तणतणणार.
जुनें तेवढें सोनें लेखुनि
नवें सर्व तें निंद्य मानुनी

'धर्म–धर्म' रूढीला वदुनी
        वरुनि सोंवळे आंतुनि सडके धर्मलंड रडणार !
विचित्र ऐशा किळीसवाणी
काळिज चरके देखाव्यांनीं
ओंठावरतीं अदळे थडकुनि
        हृदयसागरीं विचार कल्लोळचि माजे अनिवार.
देशसुखाची भडके होळी
परी स्वतांची पिकवुनि पोळी
करिति साजरी अशी दिवाळी
        द्रव्यमदांधा या धनवंता कोण कसें पुसणार ?
जीव गांजले गरीब कष्टी
राबति गिरणिंत अर्ध्या पोटीं
कोर मिळाया पोटासाठीं
        हवापाणिही परि न पुरेसें ! झाला हाहाकार !!
सस्यलक्ष्मी जाई परदेशीं
गुलाम राबती परक्या दास्यीं
शेत पिकवुनी मराति उपाशीं
वाट वाढलें पुढें न आपुलें–वणवणती बेकार !
स्वार्थासाठीं शील विकोनी
इमान, इभ्रत, इज्जत जाळुनि
उगाच काळा दोष देउनी
        सत्व विमल लक्ष्मीच्या तेजा दडपति बेदरकार.

देशहितावर सोडुनि पाणी
पूर्वज–कीर्तिस कलंक लावुनि
कुलांगार घरभेदे ठरुनी
    स्वतंत्रता–लक्ष्मीस जाळती हे दास्याचे प्यार !
दास्य–प्रलयानल भडकवुनी
बेकीचें तयिं तेल ओतुनी
त्यांत राष्ट्रलक्ष्मीस लोटुनी
    अहंमन्य हे मूढ बांधती किति पदरीं अंगार
पवित्रतेचें-मंगलतेचें
सार दिव्यता–सर्वस्वाचें
अधिष्ठान कीं मूर्त प्रभूचें
    स्त्रीजाती–गृहलक्ष्मी देशाची ही कर्णाधार.
वृथा ह्मणवितो ' सुधारलेला '
समाज निष्ठुर अन्यायी अपुला
पक्षपात करि कपटी कसला
    स्त्रीजातीला विडंबितो जीवरती सर्व मदार !
अनाथ अबला गरीब गाई
दया कुणाला कसली नाहीं
निंदा त्यांची करुनि प्रत्यहीं
    समाज आमुचा सुधारणेचा व्यर्थ करि बडिवार !
गृहलक्ष्मीला गुलाम समजुनि
मूक पशू अज्ञानी म्हणुनी

नका छळूं त्यां धिःकारोनी
समता—ममता—विवेक वरुनी करा तिचा उद्धार.

* * *

लक्ष्मीपूजा ही राष्ट्राची
सस्य—सत्त्व—गृह—स्वतंत्रतेची
खरी दिवाळी ती भाग्याची
देशबंधुंनो ! करा तिचा मग मंगल जयजयकार !
भक्तीभावें अशी पूजतां
लक्ष्मी या स्वरुपांत सेवितां
प्रसन्न होउनि झणीं तत्वतां
कीर्ती नीती सरस्वती श्री राष्ट्रीं अवतरणार !

५ नोव्हेंबर १९२२ ग्वाल्हेर — मौज.

---

# निराशेनंतर—!

कशाला सारखी ऐसी — वळोनी पाहसी मागें ?
स्मृती हो भूतकाळाची — मनाला ओढणी लागे
मनोरे भावि आशांचे — मिळाले मातिला वेगें
निराशा निर्दया तोडी — जिवानें जोडिले धागे
जिवाला जाळती काळें — विषारी रोंखिले डोळे
सभोंतीं पेटल्या आगी — अभागी जीव हा पोळे
सुदैवें आज वेल्हाळे ! — सुखानें वैभवीं लोळे
स्थिती ही वर्तमानाची ! — मनाचे हे वृथा चाळे !

जिवाची प्रीतिची ज्योती बुझाली–! घोर अंधार !
उफाळे सिंधु दुःखाचा कुणाचा हात आधार ?
तुझी ही अश्रुची गंगा जिव्हारीं झोंबते फार
दिलाचा भाव हा जाळी जगाला जीव लाचार !
अतां जा–जा सुखानें तूं तुझा तो थाटला स्वर्ग
फिरे हा प्रेमसंन्यासी जगाची प्यावया आग !

पुणें २८।१।२५

---

# दैवलेख

बागेश्री उसळेच बाळपणिची आयुष्यवीणेवरी
गेला काळ सुखें तिला अळवितां अर्घ्या तपाच्या क्षणीं
शाळेच्या ' चिमण्या जगांत, जनकें विद्यार्जना धाडिलें
' पाती तोपि.' दिली मुहूर्त बरवा अन् तेथवां पाहिला
पंतोजी गिरवावयास शिकवी दो तीन धूळाक्षरें
'श्री' ही हातिं न 'जों' छळी ग कुठला भ्यालें 'ण' कारा मनः
रेघोट्या अडव्या उभ्या खरडल्या ज्या अर्थ साधाहि न
झाला मात्र अनर्थ योग्य मिळतां शिक्षा तदा यामुळें
या माझ्याहि अरुंद भाळपटलीं रेषा उभ्या आडव्या
मौजेनें जणुं अर्थहीन अवघ्या काढोनि दैवें अशा
खेळोनी स्वमनास कीं रिझविलें–शिक्षा परंतू मला
जन्माचा मम खेळ होतचि असा हा कोठला न्याय हो ?

लेखाचा तव दिव्य अर्थ नुमजे ठाऊक तूझा तुला
दैवा ! घोर अनर्थ मात्र बघ रे ! माझा तयें जाहला.

२८ आगस्ट १९२३ मुंबई — मौज

---

## स्वर्ग-सोपान

कुणि रंगाची अंगावरतीं उडविलि भरली पिचकारी
दाहि दिशा रंगल्या कशा या लाल, वाटतें भय भारी
तमुल चाललें रणकंदन हें समरांगणिं अस्मानाच्या
दिशा माखल्या पुऱ्या खास या साऱ्या रंगें रक्ताच्या.
तिमिर-रिपूला ठार करिति बलवंत वीरवर बीनीचे
अरुण-किरण-सैनिक-देहांतुनि पाट वाहती रक्ताचे
विजयी भगवा झेंडा फडके पूर्व दिशेला अरुणाचा
विजयघोष दशादिशां दुमदुमे थाट समरिंचा नवलाचा !
विजयश्रीच्या मदें रंगला रविराणा रुधिरें न्हाला
उदयाचल सिंहासनिं मग हा अधिष्ठिताचि डौलें झाला.
तेजबळानें एकछत्रि साम्राज्य चालवी विश्वाचें
द्विजबंदीजन यशोगीत गाती या विजयी वीराचें
सुरमुनिवृन्दाहि किति सानंदचि शूचिर्भूत अति शुद्धमनें
संध्यावंदनिं अर्घ्यें अर्पिति रविस उगवत्या प्रेमानें.

*　　　*　　　*

घनतिमिरांशीं लढुनि घोर रणिं वीर रवी हो घायाळ
कर्तव्याला जागुनि परि करि निज सत्वाचा सांभाळ.

अखंड अनुदिनिं रवि राजेश्वर उदयाचलिं ये उदयाला
कर्तव्याचा बोध करितसे कंठरवें ब्रह्मांडाला.
कदापि नच दिव्यास दडपणें निज तेजाला विस्मरणें
भाग्य घेऊनी रणिं वीराचें लेणें कीर्तीचें लेणें.
निज रक्ताचें अर्घ्य देउनी शिरकमलानें पूजुनियां
राष्ट्र विभव-रविराज पूजिला आजवरि वीरांनीं निधड्या.
आपत्तीशीं झुंज खेळुनी मर्द गडी रणझुंजार
वीर बहादुर समशेरीवर नाचवितो निज तगदीर.
उज्ज्वल ध्येयीं दृष्टि रोंखुनी मार्ग काढणें ज्यां जगतीं
संकट-कंटक कितीक खुपले सुम–सम मृदु परि त्यां होती
आपत्तीच्या बिकट पथानें जाणें विभव–नगा जाण
धारातीर्थीं वीर पुनित-तनु चढे स्वर्ग-शुभ-सोपान!

काव्यरत्नावली

---

## फुल मालिण

माळिण मतवाली
जादू नवलाची केली
जिव झुकवायाला डोळे मोडित ही आली.
दिल दुबळे दिसलें
दलदलित अपुलेसें केलें
चौचालचि चाळे ! चाल झणकारी दे झोले

गालिं हंसे लाज
नवतिचा नाजुकसा साज
सहजीं रुजवीले प्रीतिचें हें पहिलें बीज
आशेची माया
जिवावर नटवी पसराया
घेई ठाव कसा घाव हा बेडर घालाया !
झोंबे जिव्हारीं
कट्यारी प्रीतीची जहरी
चतुराई न्यारीच गहन्या नारीची भारी
इष्काचा वारा
नाचुनी सुरतेवरी सारा
जोबनवंतीच्या उघाळि फुलत्या दिलरंगाला
फुलती फुलबाग
आशेची जागोजाग
बढत्या बहरीची फुलविली उगाच कां सांग.
वृत्ती थरथरली
रसरसे आनंदें सारी
नव कमळन फुलली प्रतिदलीं हळुवारीं नटली
वसंत फुलता हा
फुलांचा बहर उडेल अहा !
आशेचा इमला ढांसळे नवकोनीहि पहा.

घालुनि प्रेमाची
शिंपणी नव्यानवाईची
तूंच वाढवीला प्रीति-तरु ! हौस तुला याची !
जोपासुनि ज्याला
थोर लहानाचा केला
अजि निष्ठुरतेनें धजसि कां तोच तोडण्याला

*           *           *

हाय घात झाला !
तुवां हा समूळ तोडियला
डोळ्यांच्या जहरें जाळिलें पुरतें तूं याला !
आशेच्या फुलत्या
करपल्या मूक कळ्या साऱ्या
यानें प्राणांची गळाली भावनाही जळल्या !
पण ही अविचारी
करोनी कृति पहिली सारी
आतां कां रडसी? होत पस्ताव मनीं भारी.
बीजें जळलेलीं
उगवतिल वद कां कधिं काळीं ?
जा-आतां सारी-प्रीतिची देवघेव सरली.
कुढशी मनिं वेडे !
पिसोनी प्रेमाची हाडें
अश्रूंची न्हाणी करि पुनः जिवंत काय मढें ?

खडीच रखवाली
जागते जीवा भंवताली
शोकाची—बघ ही अंतरी खाई रखरखली !
सारखीच झाली
फुलांची पंखरण जरि केली
थडग्यावर किंवा रास ती दगडांची रचली
ज्योत पेटलेली
तूंच नां तेव्हां मालवली
स्नेह सांडतां ती तोंड काळे करुनी बसली
जन वदती कोणी
ऐक—' माळिण वेडी बनुनी
फुलवायास फुलें शिंपिते अघणाचे पाणी. '

७ जानेवारी १९२३ ग्वाल्हेर.

---

## जीवाची मुशाफरी

[ चाल—सबसे राम० ]

मुशाफरी चालली अखंडित
शीण जाहला जीवाला ॥ ध्रु० ॥
दुनियेचा पसरेचा सहारा रखरखला सारा
चालचालुनी जीव भागला मरणावांचुनि मेला
कोठुनि आलों कुठें चाललों नकळे ठाव ठिकाणा
औट घडीची सराईमधली वसती ये नशिबाला.

किती चाललों तरिहि रखडतों किती चालणें अजुनी
लवहि विसांवा मुळीं कसा तो ना ठावा जीवाला.
पायाखालीं कंटक कर्दम दाट धुकें भंवतीं
मागें पुढतीं शून्याकाराचि मार्ग न पुढचा दिसला.
स्वार्थसाधु मत्सरी जगाचा दाहि विषारी वारा
जीव पोळला पार वाळला ओलावा न मिळाला
अनाथ आशा थिजली नयनीं शोधि सुखाशेला
किरण सुखाचा नाहिं एकही दिसला चुकलामुकला
झूट्या दिलदारीला भुलुनी मिठी मारिली खाशी
दूर लोटिले अदय जगानें लाथेसरशी मजला!
जिथें जिव्हाळा म्हणुनि धांवला जीव दुराशेमागें
दुजेपणाचा प्रपंच पटला तसाच मागें फिरला!
कर्तव्याचें ध्येय आंखले ऐल तिरावरती
प्रचंड लहरी कालाब्धीची नामशेष करि त्याला.
भावि सुखाशा चित्र चितारी जलावरी मन वेडें
काय पाहिजे सांगायला गेले तेहि लयाला
सौहृदयाच्या फत्तरावरी शिलालेख प्रेमाचा
जरी कोरिला कालावधिनें तोही पुसटुनि गेला
आयुष्याचा ओसाडीमधिं आशा दंव मोतीं—
निराशतेची माती हातीं!—सजतां वेंचायला!
परतीरावर कितीक तरले दिसती पदाचिन्हें
कांहिं निशाणी नुमटे माझी प्रवास नाहक झाला.

ज्ञान--वालुका--कण एकहि नच लाभे दुर्भाग्याला
आणि वृथा परि अहंपणाचा ताठा अंगीं भरला
पुरे–पुरे ही मुशाफरी प्रभो ! रान जिवाचें जळलें
तारीं अथवा मारी आतां जीव वाहिला चरणाला !

१९।७।२२ सातारा.

---

## बंदिवान् हिंदपुत्रास—

[ सारंग ]

बंदिवास आनंदें स्वीकारि हिंदवीरा !
मंदिरासमान कारा होय सत्वधीरा.
प्रगटवीत आपत्तींची आग आत्मतेजा
घोर तपस्या लाजविते चंड भानुराजा
वाण सतीचें आहे ही कषाय बंदिशाला
शुक्रतेज ध्रुवपद देई विमलतम यशाला
मार्ग कंटकांनीं भरला राष्ट्रवैभवाचा
मायभूमिच्या कालिजांना भासला फुलांचा
देवता स्वतंत्रतेची जागते इथें ही
धाम राष्ट्रमंगलतेचें देत हीच ग्वाही.
इथें पूर्वपुण्याईचे दिव्य अंश सारे !
अणूरेणुमाधिं सत्वाचें खेळतसे वारें.
इथें जन्म घेई भगवान् कृष्ण कर्मवीर
देश धर्म उद्धाराया त्रिभुवनांत थोर.

दास्यशृंखला तोडाया देशजननिची ही
लोहशृंखला जखडोनी पदीं आज घेई !
देह बद्ध ! आत्मा परि हा संचरे स्वतंत्र
' हिंद मातरं वंदे ' हा जपत दिव्य मंत्र !
देशबंधु तेतिस कोटी वीर हिंदमाता
अदय होई कर्तव्यास्तव हा निरोप देतां
अहा ! कीर्ति नीति श्री या पहा ! स्वर्गबाला
सज्ज होति घालायाला तुला विजयमाला.

३।२।२२ ग्वाल्हेर — छिन्नमक्तजगत्

---

## वेडा तर खराच

खुशाल वेडा बुरा भला
म्हणा—फिकिर त्याची न मला !
बझार दिवानोंका दुनिया
हरदम ही झुकती माया
कांचन कांता कीर्तीचें
वेड जगा लागे साचें
कविता माझें सर्वस्व
तिला वाहिला हा जीव
सृष्टी माता मोद पिता
जगीं कुणाची वाण अतां ?
कविता माझी मनरमणी

दया क्षमा शांती भगिनी
बांधव प्रेमळ द्विजवृंद
रिझविति हृदया सानंद
काव्यफुलें गोजिरीं मुलें
हंसतां तीं हा जीव झुले

खग सुम निर्झर हे तारे
खेळगडी माझे सारे
पंचमहाभूतें सारीं
रक्षक माझे संसारीं

एकांतांतचि वृत्ति रमे
गिरिकंदर मंदीर गमे
भक्त शारदा देवीचा
अभिष्ट प्यारा परी तिचा

धि:कारित या जगताला
पर्वा याची मुळिं न मला
काय जगाचा संबंध
तुटला मम मायाबंध !

नसे कुणाचा मी बंदा
परी प्रीतिचा पोशिंदा
धरुनी प्रेमाचा ताल
असा नाचतों बेताल.

राग आळवी प्रेमाचा

गोड दिल्रुबा जीवाचा
जंगल मंगल जगताचें
बनविन नंदनवन साचें.
निसर्ग माझा गुरुदेव
दिव्यज्ञानाची ठेव !
वेडा म्हणतां तर वेडा
पण माझी वाट मला सोडा !
फिरेन कोठें कसा तरी
मरेन केव्हां कधीं तरी.

११ । ७ । १९२३ मुंबई.

---

## बा निर्झरा !

[ चाल—नृपममता० ]

तूं छकुला सृष्टिसतीचा
लाडका लाल जीवाचा । निर्झरा !
दिव्य गान अस्फुट साचे
हरि गड्या ! भान जीवाचे । निर्झरा !
स्फटिकासम मधुराचि हंससी
तरुराजींतुनि झुळझुळसी । सुंदरा !
उत्कंठित मनिं कां होशी
तरि असा धांव घेतोसी । सुंदरा !
॥ चाल ॥ प्रणयिनी । जिवाची गुणी । प्यार साजणी

तिजासि चुंबाया । तिजासि चुंबाया
सरितेला आलिंगाया । जाशि कां ?
प्रीतीचा चमके चांद
बिंबला हृदयिं सानंद । हा तुझ्या
नव तरंग तव प्रणयाचें
मधु रंग अंतरंगाचें । दाविती
हे तुषार उल्हासाचे
उसळले बोल जीवाचे । प्रीतिचे
किति सुंदर तुज भोंवतिचा
गालिचाच हरित तृणाचा । शोभला
जलबिंदूंची—मोत्यांची
उधळण तूं करिशी खाशी त्यावरी
नाहींस बांधला कोणा
तूं तुझाच जगतीं राणा । होय नां ?
॥ चाल ॥ स्वातंत्र्य । सौख्य हे दिव्य । भोगतिं धन्य !
तूंच या जगतीं । तूंच या जगतीं
हतभागी मानव जाती । निर्झरा !
दास्याचे तोडुनि पाश
सेवावा प्रिय वनवास । वाटते
स्वार्थी जग धिःकारावें
मी स्वतंत्र तुजसम व्हावें ! आस ही !
व्रत देशहिताचें घ्यावें
तुजसंगें गात बसावें । निशिदिनीं

॥ चाल ॥ परिहाय ! बरळतो काय । ओढिते पाय
परिस्थिति मागें । परिस्थिति मागें
भंगले मनोरथ वेगें । सर्व हे

८ । १ । २० कागल

---

## बुल्बुलास–

[ चुंबि चुंबि बालका० या चालीवर ]

बोल बोल बुल्बुला !
बोल मधुर मंजुला !
श्रवण–मधुर ळल्कारी
भुलवि फुलवि मज भारी
माधुरिची जादुगिरी
भान हरी जीव भारला
जगत धरित नवीनता
नवलाची चारुता
बोल तुझे तार्यि घुमतां
विश्व गोल गुंग रंगला
सुरेल गोड नी ळकेर
वायूसह फिरे खरे
उसळुनि ये दिल्बहार
भरलि तान सुखवि कोमळा
भिरभिर किति तरळती

सूर वियातिं विहरती
दिव्य मोद उधळती
देत चेतना चलाचला

चतुर दूत कल्पुनी
धाडित तुज विरहिणी
मम हृद्याची राणी
काय गड्या ! बोल प्रेमाला !

अस्फुट संदेश हाच
प्रीतीचा वदसि साच
केव्हांचा तूं असाच
माझाही दूत हो भला

'रमत सतत अंतरीं
तुझीच मूर्ति सुंदरी !
विरह हृदय विकल करी'
हितगुज हें कळिव जा तिला

५।११।२१ ग्वाल्हेर प्रमोद

---

## प्रशंसा—!

गाती मद्गुण आदरें रसिक हे सन्मानिती वानिती
हंसक्षीरनयें उदार हृदयी काव्यास या सेविती
तूंही कां म्हणुनी वृथा मम अशी गाशी प्रशंसा मुखें
होतां एकचि तूं नि मी वद कुठें द्वैतास थारा सखे !

काव्याची प्रतिमाच सुंदरतमा तूं मूर्त गे भासशी
प्रेमानें तुझिया मला शिकविलें काव्यें रचाया अशीं
अन् या चंचल नाचतील भिवया जैशा तुझ्या सुंदर
चाले जविन–गान हें मम गडे ! त्या एकतालावर
देहीं जीवकळा तुझ्याच जंवरी प्रेमामुळें खेळते
हातीं जोंवरि लेखणी हलविण्या सामर्थ्य हें नाचेंत
गाणीं गाइन मी यथामति अतां ऐशींच नानापरी
लाभे प्रीति–सुधा तुझी मज सदा स्फूर्तिप्रदा सुंदरी !
वाटे तूं करिशि प्रशंसुनि मला आत्मप्रशंसा गडे !
सभ्याला करणें कदापि वद कां आत्मस्तुती आवडे ?

७ मे १९२२ पुणें — रसवंती

---

## विजय

ज्याचा शील सुधी पितामह सदा दावीतसे सत्पथा
' कार्योत्साह ' सुधीर थोर भुवनीं न्यायी जयाचा पिता
' आकांक्षा शुभ ' पुण्यशील जननी ज्याची अति प्रेमळ
आनंदें जगतीं अहा ' विजय ' हा नांदे महन्मंगल !

२ जून १९२१ ग्वाल्हेर. — रसवंती

---

## जीवित, आशा आणि—!

आहे जीवित पुष्प एक फुललें ओसाड रानांतलें
स्वच्छंदी फुलपांखरूं क्षिति मनीं त्याची धरीना मुळीं.

ज्ञानी उद्यमशील भृंग परि हा सानंद रंगोनियां
सेवोनी नित साधितो स्वहितची जें जें भालें गोडसें

*　　*　　*

आशेचा मकरंद गोड गळतो आनंद आणी नवा.
हुंगावें सुख सेवुनीच दुरुनी तें तोडल्यावांचुन
सारोनी कटु कंटकां भंवतिच्या एका करें दुःखदां
सेवावें जगिं मानवें करिं दुज्या कर्तव्य सौख्यप्रद !

१५ जुलै १९२३ मुंबई　　मौज

---

## सुवर्ण-शृंखला !

[ नलिनी-निमीलनामुळें बंदिवान झालेल्या भ्रमरास अनुलक्षून. ]

[ चाल--वीरा भ्रमरा० ]

कवीश्वरांची रसवंती रंगेल गाइ मधुकरा !
तव यशोगान सदा सुंदरा !
स्वतंत्रतेच्या चिमण्याबाळा ! स्वच्छंदें विहरसी
दशदिशां आनंदा उधळिशी.
बंदिवास परि तापद रुचला तव कोमल मानसा
कसा अजि सांग सख्या राजसा !
सत्वपूर्ण तूं स्वातंत्र्याचें मोल जगीं जाणसी
तिलांजलि देशि तया कां अशी ?
निजशक्तीनें वंशहि मोठें विंधुनियां टाकसी
आज परि निर्बलता तुज कशी ?

'काळा' तूं रे गौरकाय परि इश्रतिची कमलिनी
वंचिते ही प्रणयाराधनीं !
कोमलहृदया दिसे परि जगीं दिसतें तैसें नसे
जिवाला जडे जाळतें पिसें.
प्रेमपाश नच आत्मनाश हा ! मधुतर कटुता वसे
जहर कीं सुधेसारखें दिसे.
॥ चाल ॥ मधुमरंदिं वेड्या ! जीव कसा भुलतसे
प्रीतिचें दास्य कीं दास्य–प्रीती असे ?
ही गुलामगिरि–शृंखला नरकिं नेतसे
विनाशकालीं विपरित बुद्धी स्वकार्य विन्मुख रमे
दुःस्थिती हीच तुझी मज गमे ॥१॥
तोड रुपेरी बेडी चल ये काळरात्र संपली
मंगला वेला बघ पातली !
धाय मोकलुनि माय गांजली बाहित ही षट्पदी
रिझविसी तिचिया जीवा कधीं ?
क्षण मोलाचा दवडुं नको रे साधुनि आली घडी
चुकिव ती गजकाळाची उडी !
बाळरवीचा यशोदुंदुभी दिगंतांत गर्जला
जगाचा कर्ममार्ग उजळला !
महा खरा हा अहा ! महात्मा जन–हित–रत पातला
चलाचलिं खेळवितो चित्कला !
चैतन्याचें तेज उधळते स्वतंत्रता–बालिका
रुचे तुज गुलाम होणें फुका !

॥ चाल ॥ स्वातंत्र्यसुखाचा स्मरसि सुदिन मनिं जरी
येईल उमजुनी गुलामगिरि नच बरी
चल—ऊठ करीं गुंजारव तव शाहिरी
स्वकार्यरत हे बांधव तुजला कंठरवे बाहिती
बावळ्या ! दास्य कवाळिसी किती ? ॥ २ ॥

१८।५।२४ विजापूर.

---

## वळचणिंची पाल !

[ चाल—ओंवींची० ]

चांद राजसे ! डोइवर ढळे
कल्पनेमुळें जीव हा जळे.
रात रोशनी उजळ ढवळली
वायदा सरे आस डंवरली !
स्वारी सख्याची गेलि जी रणीं
खास येईल आज परतुनी !
जी ऐशी झुरत्या मनीं आस बांधली
अपरातीं वळचणिची पाल बोलली

जीव चरकला दिल दुखावला
बघ सणाणला अंगिं शहारा
धाय मोकले आस मावळे
वृत्ति थरकली संशयामुळें !

उठत काहूर जाळि हुरहुर
धडकला उर ! शोक–आउर !
काळिज करपोनि फिकिर एक लागली
वळचणिची पाल सखे ग काय बोलली ?

हाय लागली धरि हा गळे
जीव धांवरा चहुंकडें पळे
हृद्‌य बावरें बाइ नावरे !
जीवनाविणा मासळी झुरे.
रानरानिंचा ठाव घेउं कां ?
देव दिलाचा दगडिं पाहुं कां ?
सांग सजणि ! मतवाली कुचकुचे भली
वळचणिची पाल गडे ! काय बोलली

काय–सांग नां ? ‘ शकुन चांगला ’
खरंच कां गडे सुचविते मला
उमज ना परी धरत जीव हा
बावळा उडे हा ! पिसा पहा
भरंवशावरी जीव टांगला
धांवरे प्रभो ! दीनवत्सला !
वाऱ्यागति धांवत जिव बुडत बादली
वळचणिंची पाल कांहिं सांगते खरी

* * *

वीर बीनिंचा शिपाइ संवगडा
पाठिशीं खडा शूर फांकडा !

हळुंच मागुनी नयन झांकितों
लाडकी गुणी हंसत चुंबितो;
गालिं गुलाबी लाज हांसली
प्रेम विव्हळा हळुंच बोलली
‘ रीत बाई ही भलती काय आपुली ’
‘ वळचणिंची पाल सखे गं हेंच बोलली ’!

५।१०।२३. मुंबई — मौज.

---

## विधवेचें गाणें

[ चाल–चंद्र चवथिचा० ]

भाव नादले
हृदयब्रह्मांडि भरुनि घुमत राहिले. ॥ ध्रु० ॥
उमलली कळी
हंसली जीवाची क्षण तोंच करपली !
पुष्पवति चढे
वनवेली–परि तरुवरि वीज कडकडे !
डाव रंगला
कुणि गं हुसकला हा अर्धाच राहिला. !-
हार गुंफला—
आशेनें;—कुणि बाई पायिं तुडवला !
जीवकळि खुले
वाळुनि परि मुग्ध मूक मातिला मिळे !

चमकला भला
तारा तेजाळ असा क्षणिंच निखळला !
विभविं बढतसे
पुनवेचा चांद्–काळराहु गिळितसे !
नवल भासते
जीवाला जाळतसे स्वप्न जागतें.
जीव जगिं जगे
जीव कुठें हरपत परि–आग धगधगे !
वेळ विसरली
अवसेची रात्र दीर्घ भवंति पसरली !
झोंप जागती
दिवसाच्या घनतिमिरीं जीव जगवि ती !
वृत्ति थरकली
जाणवतां जहरी जग–मनिंच चरकली !
सहज उसळले
शब्द तेच हृद्यांतिल येथ ओंविले
ओंवि जाहली
विरली परि अश्रूंच्या तापल्या जळीं
हृद्य भंगलें
रुतली कंठांत तान गान हरपलें !
गीत गावया
करुणेची साथ कुठें–कवण करि दया

२२ जुलै १९२३ मुंबई. मुरली.

# काळी चंद्रकळा !

[ चाल—मन द्विधा होतें. ]

झोंके घेत कुणी बालिका झोपाळ्यावरती
ओवी गुणगुणली ‘ काळि गं चंद्रकळा ’ ऐसी
ऐकुनि कानीं ती सहजची प्रश्न उठे चित्तीं
चंद्रकला धवला परी जन वदती कृष्ण कशी ?
वृथा इंदुची ती मंदमति निंदा चालविती
सान थोर घेती तोंडसुख खंत न हृदयासी !
अंध दृष्टिला कीं जगाच्या मुळीं न दिसते ती
शांत शुभ्र कांती दिगंतीं उधळि नितांत शशि
विमल चरित्र जगा महात्म्यांचें आदर्शचि तें
निंदाप्रिय जगता ! तुला परि काळें कां दिसते ?
धिक् बालिशता! धिक् पिशुनता ! निंदिसि थोरांना
भलत्यास ताडोनी बुऱ्याला चढविसि माथीं नां ?
विषाद नच मानीं मनीं तूं चंद्रकले बाई !
कुटाळ निंदेची आमुची रुची नवी कां ही ?

१७ जून १९२२ सातारा

---

# लीलावतीस—

झुले चटकचांदणी चमचमा नभःप्रांगणीं
खुले कनककोंदणीं हिरकणी गुणांची खनी

झुले सुमनवेल कीं तरुवरी नव्या प्रीतिनें
फले कळिच कोंवळी गमसि हांसरी चांगुणे !
घनांत बिजली ठवे करि नवे लपंडाव ते
अफाट तिमिरांत चारु नव चंद्रिका हांसते.
तुला बघुनि कल्पना उसळतात बाले ! किती
म्हणोनि रसवंतिला बहर लोटला संप्रती
तुझी मधुर मुग्धता सहजरम्य लीला अशा
झणीं रिझवतील ना रसिकवृत्तिला त्या कशा ?
अशा नयन तारका हंसत आपुल्या रोंखुनी
कशास बघतेस आडुनि हळूच डोकावुनी ?
हले हृदय यामुळें बहरल्या मनोभावना
घडीभरि तरी अतां विसरलों मनःस्तापना.

१३।८।२३ मुंबई

---

## पंजरस्थ चंडोलास—

विहंगराजा चंडोला !
स्वतंत्रतेच्या वेल्हाळा !
प्रीतीचा घुंगुरवाळा
विहरुनि अविरत आकाशीं
छकड्या तान्ह्या लडिवाळा !
हृदयाचा राजसराणा

धिक् धिक् ! तव परवशतेला !
आनंदाचा तुज चाळा
बांधुनि पदिं चिमण्या वाळा !
जागिं आनंदा उधळीशी
रसिकजनांना तुझा ळळा
माणिक तूं मोतीदाणा

जीवाचा पंची प्यारा ! गमेसी गुणगणगंभीरा !
शाहीरांची रसवंती गाइ तुझे गुण अखंड ती

* * *

हाय ! परी तुज नशिबाला काळ कठिण हा अजि आला !
परवशतेच्या पाशांनीं जड तनु जाई जखडोनी
स्वतंत्रतेच्या सौख्याला आंचवलासी चंडोला !
क्षणिक सुखाला भुललासी शाश्वत सौख्या मुकलासी
सदा उदासावा जीव जगास येइ तुझी कींव
परवश दुबळा देह जगीं असुनी नसला हतभागी
परवशता–पाशीं फसला जिवंत असुनी तो मेला
दास्यशृंखला पदिं जखडे नरकीं दैवहता ओढे
स्वर्ण–पंजरीं सुख न तुला दुर्दैवा तव नसे तुला
व्यर्थ निंदिलें मी तुजला कळे चुकी माझी मजला

* * *

सुखराशींत रुळण्यास मिळे हृदय परी तव सतत जळे
तुजभंवतीं सुखभांडार नच–हा कृत्रिम बाजार !
अमृत तुला जरि पाजियलें हलाहलासम परि झालें
दिधला मोत्यांचा चारा कसा रुचावा परि सारा
गोड गारशी वनराई विषतरु–फल–मय परि होई
मधुर सुगंधित कारंजी तुषार विषारी उधळिति जीं
पुष्पवाटिका फुललेल्या जहरी गंधें परि नटल्या
गुलाब कोमल जरि वरती कंटक खालीं पहा किती !

अशी बिछाइत अंतरली
झोंप सुखाची मग कुठली ?
भाले बोंचति रत्नांचे
खडे खुपति पदिं हिरकणिचे
रत्नखचित पंजर नच हा
शरपंजर जणूं खचित पहा !
पालक–प्रेमामृत गळते
जाळत जीवाला जाते.
दुर्दैवाच्या दरींत रे !
दैन्याचें घुमते वारे
सुदिन ! सुखाचे मावळले
दुर्दिन दुःखाचे दिसले.
तुटला तारा भाग्याचा
सुटला धीरचि हृदयाचा
विटला प्रपंच जगताचा
मिटला मोहहि मायेचा
काळ कंठुनी कष्टांनीं
जगणें जीवा फसवोनी.
देइल तें लेणें ल्यावें
घालिल तें खाणें खावें
डोळे असुनी ना बघणें
मुख असुनी मौना धरणें
क्षणोक्षणींच्या मरणाला
जीवित गणणें भाग तुला !

* * *

थांब आंवरी शोकाचा
उमाळा–पण हा दुःखाचा
केंविलवाण्या या स्थितिला
बघुनि जिव हा कळवळला
नेत्र दयेचा डबडबला
भाव कोंवळा गहिंवरला
परिस्थितीचा प्रभाव हा
देई दुःखासी असह्य
परिस्थितीचा दास परी
बनूं नये या संसारीं
करणें दैवावरि मात
यांतचि आहे पुरुषार्थ
कटु खट संकट–सोपान
सुख–वैभव–गिरि–पथ जाण
मनिं दृढनिश्चय धीर धरी
ध्येय–पूर्तता होइ तरी
अधिरें चंचला ती प्रकृती
कार्यनाश–कारण जगतीं

आली संधी सोन्याची फुका न दवडावी साची
साधुनि संधी हो मुक्त मार भराऱ्या गगनांत
बसूं नको तूं खिन्न मनीं शून्यदृष्टि लावुनि गगनीं
सावधान मन चंडोला ! संतत वर्ते अनुकाला

५–७–२१ मिरज तरुणभारत

---

# काव्य–निर्झर

हृदयप्रांतीं निर्मळ निर्झर वाहे काव्याचा
तिथें वहरला नंदन साचा दिव्यानंदाचा
उगम पावला उदात्त उद्देशाच्या उदरांत
सुकल्पनांच्या कड्यावरुनि घे उड्याच दिनरात.
दृष्टांताच्या दरींत दडली शब्दाची माया
गूढार्थाची गभीर दुनिया सहजीं सजवाया
विचार तुषार वेंचुनि गुंफित बीनसरी प्यारी
मोहनमाळा नव्या जादुची नवलाची न्यारी
भावरसाचे भरुनी प्याले दे प्रतिभादेवी
रसिक सुजनगण काव्यामृत हें प्रेमानें सेवी.
हृदय नाचतें उल्हासानें रसवंतीसंगें
काव्यानंदीं गान–तरंगीं आंदोलत रंगें
हृदयदेविचा लाडलाडका हा निर्झर बाळ
उधळी झुळझुळतें जगतावरि गाणें लडिवाळ.

ग्वाल्हेर विजय

---

# उषावती

आळवीत भूपाळी प्रेमाची विहगासंगें
कोण सुखाची सदाफुली ही आनंदें रंगे !
शेज सोडुनी सोन्याची ती स्वर्गमंदिरांत
पूर्वदिशेचें द्वार उघडुनी डोकावुनि बघत.
नव्या केशरी रंगमहालीं रमली अलबेली
जिथें चालली तिथें स्वर्गीची साक्ष खडी केली.
घनतिमिराचा सारुनि बुरखा कुळवंती नार
दिगंतांत लावण्यकांतिला उधळी गुलनार
नटुनी थटुनी लाजत मुरकत आली स्वर्बाला
शुभ प्रभातीं उषावती ही उजाळित विश्वाला.
हिमवंती ही नाचनाचरी चमचमते इकडे
लाजलाजऱ्या फुलवंतीचा नोंकझोंक तिकडे !
जिलेवंत जळवंती माया भरल्या दरियाची
भिरभिर वाऱ्यावरती नाचे नव्या नवाईची.
उषा उदेली गुलाब गोंडस गगनाचा फुलला—
प्रणयश्रीनें—ब्रह्मांडाचा गुंग गोल डुलला.
उत्साहाची, कर्तव्याची, पहिल्या प्रीतीची
उषाच फुलली मम हृद्प्रांतीं चढत्या तेजाची.
तीच पावुनी स्वर्गपदा कीं, सुदिव्यता ल्याली.
दावि उजळता भविष्य—पथ मज या मंगल कालीं.

**मौज**

# हंसऱ्या तारकेस—

हंसरे तारे ! हांस गद्गदा
हांस उधळुनी दिव्यानंदा
किरण हांसरे फेंक एकदां
विश्वा हंसविशी तूंच सदा । हंसवशील गे मला कदा ?

आयुष्याच्या घनांधकारीं
हास्य रसें मज रंगविणारी
प्रेम तारका एक मिळे जरी
उदासवाणी जीव पिसा । हंसेल कायमचा असा

जगांत जडता जहरी जखडे
मलाच माझें नुकलें कोडें
मनीं निराशा बांधी वाडे
दुःखाचे शिरीं तुटति कडे । आणि पुढें दुर्दैव खडें !

मार्ग काढतां अंधारांत
कुणी दयेचा देई हात
तोच परि पुढें गळ्यास चेपित
बेमानांचा बाजार । करी जिवाला बेजार !

पुढें सरकतां मार्गे लोटिती
काळिज देतां चिरुनी खाती
जहरी अंतरीं मिठास वरती
हितशत्रू हे हपापले । हाणुनि पाडायास भले

रानझुडुप हें जग कांटेरी
फुंकर लास्याची तूं मारीं
यक्षिणिची कांडीच तूं खरी
सुधाच होइल जहराची । फुलेंच बनतिल कांट्यांची !
मत्सराग्निनें जळती हृदयें
स्मशान झालें जग बघ सदये !
थडगी रडती प्रीतिची सये !
रचिलीं स्वार्थाचीं सरणें ! स्वार्थास्तव जगणें मरणें।
स्वार्थाचा संसार थाटला
अंतरिं काळा भाव दाटला
विषयीं प्रीतिस पूर लोटला
जगांत जगणें जीवानें । सांग कसें गे मुग्धमनें !
धर्मनीतिचें निघे दिवाळें
दयाबुद्धिनें केलें काळें
स्वैर जनांचे चालत चाळे
अहंमन्यतावश सगळे । बळी असे तो कान पिळे !
भयाण भेसुर भवाटवी ही
खलश्वापदें निष्ठुर पाही
लाजविती हे कृतांतासही
पावित्र्यतेचा पंथ रिता । शुष्क शांतिची सुखसरिता !
प्रदेश विषमाहि सुखदु:खांचे
मृगजळ पसरे प्रेमाशेचें

स्वप्न तरळतें संसाराचें

हंसतां मजवरि तूं आतां । धिःकारिन मी या जगता

आदि अंत ना आनंदाला
भूतलावरी स्वर्ग पातला
हंसु आलें या ब्रह्मांडाला

जीवनमदिरेचा प्याला । आशारंगाला ल्याला

हास्यकरांच्या बसे विमानीं
आनंदाची कांस धरोनी
तेजबळें तव मार्ग देखुनी

अनंतांत जातों विरुनी । पाशपसारा तोडोनी

आशा हृदयीं पुनःकवळुनी
उत्साहातें परत वळवुनी
कर्ममार्ग घेतो उजळोनी

अखंड परि तूं मजवरती । उधळि हांसरी निजकांति

---

## बोल गुलाबा गड्या !

[ हृदय तरंगासवें० ही चाल ]

कोड पुरवशील कां ?
गोड गुलाबा गड्या !

तुडवित पादें रानमाळ
भटकत मी हा त्रिकाळ
जीव शिणुनि हो व्याकुळ
म्हणुनि विनवणी तुला.

फत्तर अति कठिण येथ
तापना मनास देत
रुक्ष सकल जग भासत
आसरा न लाभला.

प्रेमपुनित पुष्पलोक
कोमलतायुत विलोक
जादुचा जगांत एक
भासला तुझा मला

विविध रंग रुचिरता
मुग्ध मधुर मृदुलता
सुंदरता मंगलता
नवल थाट तेथला !

फुलें फुलेंच चहुंकडें
प्रीतिवीर कीं खडे
छंद सुखाचा जडे
स्वर्ग मूर्त ठाकला !

मार्दवता माहिरली
भावना भरारली
विश्ववृत्ति विकसली
कर्ममार्ग उजळला

द्वेषदुःखहीनता
वसे प्रेम दिव्यता

नांदते स्वतंत्रता
पुष्पलोक शोभला !
स्वार कल्पनेवरी
वृत्ति होत धांवरी
तुझ्या जगांत ने तरी
ध्यास हाच लागला.
तुजसंगतिं रमुनियां
जनहितार्थ झिजुनियां
सुखविन सकळां सख्या !
जन्म सफळ तरि भला !
बुरा भला गणी मला
नेइ परी त्या स्थळा
हंसुनि बोल नां फुला !
विनवुं सांग किति तुला ?

१६।४।१९२३ नाशिक.

---

## हृद्गत !

[ वृत्त--शिखरणी ]

समुद्राच्या लाटा उसळति जशा या वरिवरी
विचारांच्या तैशा अमित उठती चित्तिं लहरी
जडे जीवा भ्रांती मिळत लव शांती नच मनीं
जगाच्या बाजारीं भटकत भिकारी निशिदिनीं.

भणाणे द्वेषाचा पवन जहरी झोंबत जिवा
तसा स्वार्थांधांचा छळित कटु कावा नवनवा
इथें मात्सर्याचा प्रखरचि भडाग्नी धगधगे
दया प्रीती नीती नय नच कुठें—जीव न तगे
निराशेचा दाटे निबिडतम अंधार भंवतीं
उदासीचे काळे हृदयिं घन सारे उफळती
सडे ही दास्याच्या तनु विकल पंकांत रुतली
अभागी दुःखाच्या दरिंत बुडला—आस खुटली
परी दुर्दैव्याला कुटिल उपहासें जग हंसे
कुणा ये ना कींवा—नच मुळिं जिवाधार गवसे
विटे संसाराला—रमत न कुठें मानस मुळीं
जनीं रानीं नाहीं खुलत सुकली ही जिवकळी
फिरंगी हें तारू अजवरि सुकाणूविण फिरे
तुफानीं लाटांनीं परि खवळला सागर भरे
दिसेना यत्नेंही तिळही नयनां मार्ग पुढती
जिवाचें हो पाणी—सुटतचि सुखाशा सकळ ती
अनाथांचा वाली सकल जगिं देवा! असुनियां!
अशी माझी दैना कशि बघवते? कां नच दया?
नको भुक्ती मुक्ती धन सुखहि कीर्तीहि जगतीं
परी कर्तव्याची सतत मज दे जागृति रती.
कळूंदे कां माते प्रभुवर! जगीं जन्म दिधला
जगींचीं कर्तव्यें सकळ करूंदे पूर्ण मजला

रुचेना जिवाला विफल कृतिवांचून जगणें
बरें याच्याहूनी गमत नित मृत्यूंतिल जिणें !

१३ आगस्ट १९२३ मुंबई

---

## चल–आण विषाचा प्याला !

[ जगद्विख्यात महान् तत्त्ववेत्ता साक्रेटीस सत्वासाठीं प्राणसमर्पण करतांना अंतकाळीं हेंच उद्गारला असेल ना ? ]

मरुंदे जागुनि सत्त्वाला चल–आण विषाचा प्याला !
लागले स्फुराया ओंठ भरूंदे हा कांठोकांठ
उसळुंदे फेस चौफेर रसरसुंदे लाली और
नाचुंदेत यावरि रंग जगताचे जहरि तरंग

स्वातंत्र्य–प्रिय या काला
जीर्ण देह सोडायाला
आत्मा उत्कंठित झाला

आकंठ पिऊंदे मजला चल–आण विषाचा प्याला !
एकेक विषारी बिंदू भासतो सुधेचा सिंधू
अणुरेणुंत अपरंपार चेतना भरे अनिवार
पत्तरही फुलले सारे सत्त्वाचें शिरलें वारें

मरतां या सत्त्वापायीं
जन्माचें सार्थक होई
विक्राळ काळ मज बाही

कवळितों खुषीनें त्याला चल–आण विषाचा प्याला !

वावरे अनीती सारी उजळ ही न्यायमंदीरीं
हे न्यायमूर्ति अधिकारी बनले मदांध अविचारी
सत्तेची चढली धुंदी चालविती अंदाधुंदी

स्वार्थाला विकुनी शील
गाडुनी विवेका खोल
न्यायधर्म गणिती फोल

थाराच नुरे सत्याला चल—आण विषाचा प्याला !

अस्मानी सुलतानीला ये बहर अरेरावीला
बेबंदशाहिचा घोर माजला दरारा फार
दडपशाहीच्या जुलमाचें साम्राज्यचि सैतानांचें !

कायदे दया—धर्माचे
नच—परी क्रूरवृत्तीचे
हे असे झुगारुनि तुमचे

चाललों पहा स्वर्गाला चल—आण विषाचा प्याला !

ताजवा झुको न्यायाचा मजविरुद्ध खोट्या जगिंचा
निर्दोषी ठरणार न परी मी खास देवदरबारीं
ही शुद्ध मनाची ग्वाही मृत्यूची पर्वा नाहीं

जन्मलोंच देशासाठीं
झिजलों नित सत्यासाठीं
मरतों अजि सत्वासाठीं

हें समाधान चित्ताला चल—आण विषाचा प्याला !

सत्याच्या संग्रामांत घेतलें शीर हातांत
सत्याग्रही रणझुंझार काळाची न करी कदर
तल्वारीवरती शौर्यें नाचतसे लढता वीर
करिं खेळवितो तख्दीर
संकटें झुगारित दूर
कोणाची मग मगदूर
आत्मतेज दडपायाला ? चल–आण विषाचा प्याला !

पढवाया तत्त्वज्ञान केलेंच जिवाचें रान
हरपलें तनुचें भान साहिला जनीं अपमान
साधाया जनकल्याण हा आज अर्पितो प्राण
पेरिलें बीज तत्त्वांचें
जनमनोभूमिमधिं साचे
उजळेल पीक सोन्याचें
सुखवाया भावी पिढिला चल–आण विषाचा प्याला !

तुडवा अजि पायिं खुशाल मरणानें चढतें मोल !
जग मला उद्यांचें थोर निजशिरीं खास चढवील
तुमच्या या निंदास्तुतिची कां करूं फिकीर वृथाची
ही अशा कोट मरणांची
घालुनी माळ सौख्याची
पाहिरी चढे स्वर्गाची
बेदर्द मर्द हा झाला चल–आण विषाचा प्याला

तुम्हाला तरि हें कळुंदे वीर मरण सुखशांती दे
डरणार न सत्वापायीं प्रत्यक्ष्य कृतांतालाही
हें ब्रीद सत्वधीरांचें हें ब्रीद कर्मवीरांचें

' जागुनी तुझ्या सत्त्वाला
' हो खडा वीर–मरणाला '
हें विवेक सांगे मजला

सांगतों हेंच जगताला चल–आण विषाचा प्याला !

उपकार जगावर केला अपकार परी तो ठरला
तो मार्ग जात नरकाला जाहला खुला तुम्हाला
हा सत्पथ ने स्वर्गाला मोकळा मला हा झाला

तोडिला पाश दुनियेचा
मग बंध उरे कोणाचा ?
घ्या प्रणाम हा शेवटचा

धीर ना अतां जीवाला चल–आण विषाचा प्याला !

१६।८।१९२३ मुंबई

---

## राष्ट्र–संन्यासी

कराया कर्मयोगाला वराया शांतिसौख्याला
बनें मी राष्ट्रसंन्यासी हराया देशदैन्याला
विषारी स्वार्थबुद्धीची विभूती फांसली अंगीं
फकीरी वेष खादीचा सुखावे जीव बैरागी

गळां ही शीलरत्नांची विराजे मंगला माला
धरोनी देशभक्तीला करीं घे ज्ञानयष्टीला
दया हा धर्म हो माझा स्वदेशा मानितो राजा
करीं मी प्राणपुष्पांनीं मनाच्या मंदिरीं पूजा
जिवाला एकला ठावा विसांवा देव नी प्रेम
मुखानें 'मातरं वंदे' जपावा मंत्र निष्काम
त्रिकाळीं देश धुंडाळी त्यजोनी लाज देशार्थ
सळाळे रोमरोमीं या सुरांचें सत्व सामर्थ्य
नको संपत्ति कीर्ती ही नको तो स्वर्ग मुक्ती वा
झिजूं दे लोककल्याणीं तनू माझी सदा देवा !

---

## दुर्दैवास आव्हान.

वर्षें वीस मुशाफरीस जगतीं झालीं पुरीं आजला
आलों चालुनि मार्ग कांपित कसा ठाऊक माझें मला
जीवाला जखडे परिस्थिति; पुढें दुर्दैव माझें खडें
दुःखांचे तुटती किती शिरिं कडे—नैराश्य चोंहींकडे !
वाटे धीर जसाजसा परिचयोमानीं जगीं या चढे
भक्तांचें प्रभु तो दयाघन सदा वारीतसे सांकडें
दुर्दैवा ! तुजशी जरी अजवरी केला महासंगर
ठाके ठोकुनि दंड मी अजुनिही झुंझावया बेडर
बांधाया नच तीव्र बंध शकती दैवा ! तुझे हे मला
कोणालाहि कुठें कदापि जगतीं हा जीव ना बांधला

अंगीं सत्व नि शील शुद्ध असता ही दिव्य शक्ती मला
माझें ध्येय पवित्र गांठिन जरी कल्पांतही पातला
झालों धीट पुरा अतां निपटची भ्याडा ! कुठें धांवसी
ये—ये—मी बघतों करामत नवी तूं कोणती दाविसी

२९।१।२३ सातारा रोड. मौज.

---

## तो क्षण—पहिला कीं शेवटला ?

मी मनरमणि ! स्मरणीं आणिन तो क्षण आमरण
जखम जिव्हारीं प्रीत कट्यारी करी नेत्रबाण.
तुझ्या प्रीतिचे रंग उसळले पहिले नवलाचे
जिव रंगला अंगीं शिरलें वारें प्रणयाचें.
प्यालों ज्या क्षणिं तुझ्या प्रीतिची मदिरा मदिराक्षि !
तेव्हांपासुनि माशावाणी तळमळ मीनाक्षि !
जगास मेलों, भान हरपलों, चढला उन्माद
तुझ्याच चरणीं खेळुं लागला हा ब्रह्मानंद.
हृत्पटलावर ठसा उमटला हा त्वत्प्रीतीचा
ध्यास लागला तुझा नि तुझिया सदा संगतीचा.
सुखा पारखा झुरणिस लागे जीव सारखा गे !
वरी हांसतो परी अंतरीं आगचि बघ लागे !
तो क्षण आयुष्याच्या फुलत्या वसंतकालाचा
माझ्या प्रीतीसंसाराच्या कीं सुरवातीचा.
दिसेल कां मज पुनः एकदां क्षण तो सौख्याचा ?

हंसेल कां पुनरपी मजवरी रवि तो भाग्याचा?
गुलाबगालीं लाली आली प्रथम चुंबनानें
परि शेवटच्या वियोगाश्रूंनीं धुतली काळानें
पहा जात हा पुढें झपाझप विकट हास्य करित!
पायघड्या प्रेमी हृदयांच्या कोमल तुडवीत.
निष्ठुर काळाची बेमानी सुचवी जीवाला–
'क्षणभंगुर संसार विषारी सत्यांनीं भरला!'
म्हणोनि माझें मलाच नकळे धीर मुळीं नुरला!
तो क्षण पहिला शेवटलाही तसाच कीं ठरला?

----

## वंदे मातरम्!

[ गझल ]

देशभक्ता मोक्षदाता मंत्र वंदे मातरम्
हिंदवीरा सत्वधीरा! बोल वंदे मातरम्!
देव, राजा, धर्म माझा सर्व कांहीं देश हा
रोमरोमीं नादवीतो मंत्र वंदे मातरम्!
गर्जना गंभीर गर्जे गव्हरीं सह्याद्रिच्या
साथ दे दिग्प्रांत; कोंदे मंत्र वंदे मातरम्!
हीं दऱ्याखोरींहि सारीं स्फूर्तिनें या नाचती
शाहिरी थाटांत गाती गीत वंदे मातरम्!
झोंपले झुंझार जागोनी स्वधर्मा हे अम्हां
सांगती स्वर्गांतुनी संदेश वंदे मातरम्!

राजसत्ता कोंडितां कारागृहीं लोकाग्रणी
शृंखला झंकारली पायांत वंदे मातरम् !
टांगले फांसावरी स्वातंत्र्यवीराला तरी
अंतकाळीं अंतरीं त्याच्याहि वंदे मातरम् !
धांवले भाले रिपूंचे झेलिले छातीवरी
हिंदमाता राखिली गर्जोनि वंदे मातरम् !,
लेखणी तरवार, शाई रक्त, सामुग्री अशी !
काळपाषाणीं लिहीले बोल वंदे मातरम् !
कालचा शाहीर काढी लोकशाहीचा भला
जीवतारा खेंचुनी हे बोल वंदे मातरम् !
घोर ही सैतानशाही माजली ! जाळील हा—
पारतंत्र्याच्या पिशाच्चा मंत्र वंदे मातरम् !
काळनिद्रा सोड आतां भाग्यवंता भारता !
जीवनीं संजीवनी लाधेल वंदे मातरम् !

रसवंती

---

# शिलालेख

स्वभाव चंचल अदय हृदय जगिं वंचक युवतींचें !
जहर पाजिलें बळेंच मज या कडू अनुभवाचें.
सुंदरतेचा साज गुलाबी शेज मृदुल वरती
निष्ठुरतेचा काळा फत्तर लपला परि चित्तीं !

अघटित—घटना—चतुर विधीनें केली चतुराई
ठेंच लागतां या दगडांची व्याकुळ मन होई !
कालाब्धीचे उंच उसळतां तरंग उत्तुंग
उडुनि जाति वरवरले नटव्या प्रीतीचे रंग !
आशेच्या स्वर्गांत तूंच नां उंच मला नेलें
घोर निराशागर्तेमाधिं कां मग वद फेंकियलें ?
जाऊं दे तें ! अतां वृथा कां आटविसी जीव
अचल हिमाचल चळेल परि नच ढळे प्रेमभाव !
लोट मला शोकाचा खवळे अफाट दर्या हा !
मरेन मी परि मत्प्रेमाला येत न मरण पहा !

तुझ्या हृदय—पाषाणावरती साक्षी काळाचा
शिलालेख कोरिला प्रीतिचा शुद्ध भावनांचा.
हात कृतांताचाही नाहीं समर्थ पुसटाया
प्रेम—स्मृति मम तोच जागविल अखंड तव हृदया.
वैभवांत तूं सुखें लोळतां पुढें कधीं काळीं
क्षणभरि तरि पोळील जिवाला कढत्या अश्रुजळीं.
त्या लेखावर विस्मृतिचीं जरि पुटें किती चढलीं
तींच आंसवें स्वच्छ काढतिल धुवुनी त्या काळीं.
डबडबलेल्या नयनिं नाचुनी मम मूर्ती तुजला
'प्रेम अमर निःस्वार्थी !' दाविल याच लिखाणाला
मेल्यावरती मी प्रेताला कवटाळुनी चितीं
पस्तावोनी अश्रुफुलें तूं उधळशील वरती.

कळेल अंतरिं नंतर. माझ्या प्रेमाचें मोल
दिसेल देवकळा दगडांमधिं मग तूं रडशील.

## प्रेमाची फसवणूक

[ पंचचामर ]

प्रीतिचे किति खेळ खेळुनि चंचले ! पहिले तसे
जादुची उधळोनि माधुरि मोहिलें मज राजसे !
डाव तो कपटी न जाणुनि जीव हा फसला पिसा
साजतें दिलदारिला आजि घात कां करणें असा ?
नाचरे वरचेच सुंदर रंग और झळाळले
ते नव्या नवलाइचे फसवे कुठें उडले भले ?
प्रीतिचे अनमोल माणिक मोति हे तळिं हांसती
आज दिल्दारियांत या परि हातिं शंखचि लागती !
बाग तो बहरेल सुंदर जादुचा हृदयीं नवा
आस भंगुनि खास फत्तरास ही रचिली तुवां !
त्या तुझ्या वचनें उताविळ काल जो जळला तसा
जीव तोच हताश वंचित आज हा जळतो असा !
भारिते हळवा अखंडित जीवभाव भुलावणी
नीतिचा रसरंग हा झुकता नवा कलिकेंतुनी.
प्रीत घातक चातुरी करि दिल्लगीहि परोपरी
काळजावरि ही तुझी फिरली सुरी जहरी परी !

३०२८

चंद्रिका रिझवी सुधामय झोंत वर्षुनि हांसरी
जाळती बरसात या शिरिं कां परी बिजली करी
चांदणी नभिंची गुणी झणि झेलण्या हृदयांत या
जीव धांवत आणि फत्तर आदळे ! चिरडी तया !
पोंवळ्या अधरीं शराबाचि रंगली इसपाहनी
प्यावया धजतां भयंकर दंशिते परि नागिणी !
खेळतां लहरींवरी तुझिया फुटे तखदीर हें
स्वप्न हें हंसरें सरे नव रात रोशन ओसरे !
प्रीतिची हृदयीं धडाडत अश्रुच्या सरणीं चिता
आग लागत बाग जाळत ! जागजागिं भयाणता !
जा— अतां दुखऱ्या दिला शिणवोनि कां मज गांजसी !
कोणता तुज लाभ तो ? हिणवोनि कां अशि हांससी !
प्रीतमाळचि तोडुनी हृदयास या तुडवोनि जा.
हीं फुलें उधळीं कुणां दुसऱ्यावरी ! मज दे रजा !
हाय ! पायदळीं तुझ्या पडलीं फुलें झट कुस्करी !
निष्ठुरे ! मुख्यत्यार तूं पण ही पुरे करि मस्करी.
जाहले अपराध माफ अमाप ते करिं एकदां
बोलिलों—विसरून जा—कमजास्त जें कितिएकदां
चाललोंच—अखेरचा मुजरा अतां तुज घेइं हा
देवराय तुझें भलेंच करो खुशाल सदा रहा !

———

# भवानी तलवार

[ चाल—चंद्रकांत० [

प्रथम नमोनी आइ भवानी जग मंगल खाणी।
वंदि विधिच्या वागेश्वरिची विश्वात्मक वाणी.
नमी अतां मी राष्ट्रदेवता स्वतंत्रता—माता
राष्ट्र—तेज—मंगल गंगा जी उद्धारी जगता.
नमस्कार त्या शिवावतारा शिव—सगुणाकारा
चिरंजीव स्वातंत्र्य—राणिं तयां सकलां वीरवरां.
तुझ्या यशाचें कवन गावया सोडित ललकारीं
स्फूर्ति तूंच दे मला झडकरी भवानि तल्वारी !

*　　*　　*

शरण तुला रण—मरण वीरगण सेवुनि आनंदें
अमर—पदा समरांकित जिंकिति दिगांतिं यश कोंदे !
धरुनि करीं तुज महन्मंगला स्वतंत्रता बाला
गुलामगिरीचा पाश संहरी करि अरि—नाश मला.
प्याली रिपु—रुधिरास मंगला ल्याली रणरंगा
जगांतरंगीं अभंग उसळे तेजेरस—गंगा
शिवदेवाची प्यार जिवाची जीवन—संजिवनी
रण—गगनीं चपलाच चमकली कंप करी धरणी.
समता ममता स्वातंत्र्याचा स्वर्ग भंवतिं विहरे
तव शीतळ छायेंत भाग्य नव नंदनवन बहरे !

तुझेंच पाणी पिउनि उजळलें पीक सुवर्णाचें
शौर्य–तेज चढलें कळसाला दख्खन दुनियेचें.
नांव मराठा ऐकुनि चळचळ काळहि कांपावा
शब्द मराठा ऐकुनि अरिचा प्राणचि कोंडावा.
पाक कुळींचा मर्द मराठा काळाचा काळ
तुझ्याच साठीं घाली कंठीं मरणाची माळ.
भला मराठी अमदानीचा भाग्यकाळ बढता
चित्तचक्षुला दिसे भवानी ! स्मरण तुझें होता.
वीज चमकली तुझी उडाली राष्ट्राची नीज
चढे रात्र अंधेरि चहुंकडें बुडें शौर्य–तेज
तुझ्याच तेजासवें सुखाचीं स्वप्नें मावळलीं
उलट हांक दे काळ अवदशा अघोर कोसळली !
लवाति जयांच्या दृष्टिक्षेपें ताठरल्या माना
मदोन्मस्त सुल्तानहि डरला ज्यांच्या शब्दांना
अझुनि खेळते मराठ जादू गडागडावरती
सह्याद्रीच्या कडेकपारीं घुमवित सत्कीर्ती
कुठे कालचे कर्मवीर ? निर्वीर देश होई
आज माजली अशी काय ही नवीन नवलाई !

* * *

त्रिभुवन–पावन गान यशाचें आतां गातांना
कंठीं रुतल्या कवीश्वरांच्या शाहीरी ताना !
जवामर्दिचा जिता जोम जिरला जिथल्या तेथें
मर्द मनाचें तेज तरुण तें म्हातारें होतें.

स्वराज्यवादी ज्वलज्ज्हाळचि पूर्वज ते गेले
वंशज त्यांचे गुलामगिरीला आम्ही विकलेले
स्वपूर्वजांच्या नांवावरती स्वतःला विकुनी
गुलामगिरि कवाळितों खुषीनें परब्रह्म गणुनी.
शब्दशूर हे आज घरोघर नोकरिला सजले
दिव्यापोटची उरे काजळी दिव्य दीप विझले.
स्वातंत्र्याच्या सरणावरती सत्वाची होळी—
पेटवुनी अम्ही मूढ पिकवितो परक्यांची पोळी !
शिवप्रभूचे मर्द मनाचे ते चेले सच्चे
तयांचेच अम्हि भ्याड दिलाचे कमनशिबी बच्चे.
स्वार्थ शिकवि बेमानी चढली धुंदी अधिकारी
कुऱ्हाडिचा दांडा गोत्याला काळचि अविचारी.
स्वजनद्रोही महापातकी बनलों नादान
देशधर्म विसरुनी स्वतःशीं ठरलों बेमान.
आपसांत गुरगुरुनी करितो आपुलाच नाश
मायभूमीला परदास्याचा लावुनि गळफांस.
सूर्य उगवला जगावरि परी पहांट नच अमुची
स्वहितहि नकळे नशा न निवळे वृथा अहंतेची.
कलम शीर तरी शील सलामत राखुनि ते वीर
कळिकाळाला नमवित होते पायीं झुंझार—
काल—आज परि नुरली कांहीं शीलाची चाड
स्वार्थ सुचत जरि कुणी घातली अब्रूवरि धाड.

दडपशाहिला मान तुकविती फर्जीचे प्यादे
घर लुटलें चोरांनीं तरिही हंसती आनंदें!
देशभक्तिला कर्तव्याला दिली मूठमाती
वृथा वल्गना देशभक्तिची परि भलतीच कृती!
मान मरातब सवंग लोकप्रियता संपत्ती
ह्रपापुनी यासाठिं मळविली स्वकुळाची कीर्ती!
गुलामगिरीची पुरेच गीता कंठ गुदमरे हा
शोकाश्रूंनीं ह्रदय भंगलें आइ भवानि! पहा!

*　　*　　*

शुभ स्मरणमात्रेंहि तुझ्या संचरें अंगिं शौर्य
रोमरोमिं सळसळे तापलें रक्त येत धैर्य.
महाराष्ट्र हें नांव भवानी! तूंच सार्थ केलें
चौमुलुखीं चौघडे मराठी शौर्याचे झडले.
कोपलीस कां अम्हांवरी परि आज अशी बोल
धांव पांव घेई हें पंचप्राणांचें मोल.
वरद हस्त मस्तकीं लाभुंदे तुझाच आम्हांला
कृतांत नमवुनि घालूं गवसणी या ब्रह्मांडाला.
खिन्न कां अशी प्रसन्न होउनि करी कृपा आज
दिसेल तुजला पुनः उसळलें दिव्य राष्ट्र—तेज.
शिवरायाची थोर पाठिशी पुण्याई सबळ
क्षणांत या देशाचें मळलें नांव करूं उजळ.
कुणी शिवाजी करीं खेळविल भवानि तल्वार
देशदैन्य निजरक्तें धुवुनी पुनः कर्मवीर.

देश—केसरी दुर्दैवाच्या पंकामधिं रुतला
आर्तरवानें हेंच निरंतर विनवी प्रभुजीला—
' नको स्वर्गपद मोक्ष मुक्तिही नको प्रभो ! कांहीं
परि अमुची तल्वार भवानी पुनः अह्मां देई ! '

---

## बा कदंबा !

[ एक अन्योक्ति ]

सौंदर्य दिव्य तव गोंडस गोजिरे बा !
आनंदलें रसिक—चित्त अहा कदंबा !
हा रम्य रंग खुलता भुलवीत खासा
वेड्या जगा झुलवितो बहिरंग ऐसा !

ना चारुगंध परि केवळ डामडौल
देई जगीं न कुणिही कवडीहि मोल
जो दुर्गुणी परि असे मदनासमान
देती तया सुजन ते तिळही न मान.

हा गोड सुंदर दिसे वरचा सुरंग
कोणी वदे जहरिला परि अंतरंग.
हे बोल सत्य तरि धिक् शतधा खला रे !
पापी अमंगळ जळो तव रूप सारे !

११।१०।२३. मुंबई

---

# मधुर बाला

स्वच्छंदी मन–नंदिनी विहरते प्रेमामृतस्यंदिनी
खेळे चंद्रकला प्रशांत धवला विश्रब्ध विश्वांगणीं.
स्वर्बाला मधुमंगला अवतरे स्वर्गासवें भूतलीं
स्वर्गश्री सुखदा हृदा शुभपदा किंवा स्वयें पातली !

उत्साहप्रद सुंदरा सुमधुरा कीं ही उदेली उषा
मुग्धा मुक्तकरें सदा उधळते आनंद दाहीदिशां
चित्‌शक्ती वसली चलाचालिं मुदें नांदे जगीं मूर्त ही
लोकीं मान्य वदान्य धन्य करिं ही चैतन्य–युक्ता मही

कीं ल्याली सगुण स्वरूप विधिची लीला मना तोषवी
पुण्यात्मा–सुतपः–प्रभा प्रगटली ! पुण्याइची जान्हवी !
सत्काव्य–प्रतिमाच सुंदरतमा आनंद–सीमा खरी
वर्णाया गुणरूप दिव्य कविची हो श्रांत वागेश्वरी.

मूलोका शुभदायिका–पथ चुके—ये तारका–बालिका
प्रेमानंद सहर्ष वर्षित जगा आकर्षवी दे सुखा
कीं कल्पद्रुम–मुग्ध–चारु–कलिका स्वर्गातुनी ही गळे
कीं साक्षात् सुर–संपदा दिपविते नेत्रास तेजोबळें

बाले ! बोल वृथा असें मन कसें तूं मोहिलें प्रेमळे !
घालें हें खुललें हृदब्ज गुणिले ! आनंदलें कोमले !
देखोनी नवता अखंड फुलत्या सौंदर्य–सृष्टींतली
झाली कुंठित कल्पना–गति तशी वृत्तीहि वेडावली

नाहीं ठाउक नांवगांवहि तुझे तूं कोण अन् कोठली
मी हा प्रार्थितसे परी प्रभुवरा सानंद बद्धांजली
'या जन्मीं नच भाग्य हें जरि, पुनर्जन्मीं तरी लाभुंदे
माझी मैत्रिण वा दयाळु भगिनी देवा ! हिला होऊंदे.'

४।८।२१ ग्वाल्हेर

---

## ध्वजारोपण

आला हा गुढिपाडवा सण नवा आनंददायी जरी
कोठोनी न कळे परी थडकले हे शब्द कानावरी
"नांदोनी नरकीं गुलामगिरिच्या जीवन्मृतासारखे
स्वातंत्र्याविण हीन दीन बनुनी शांतीसुखा पारखे."
"सिंहांनीं जगतीं श्व–वृत्ति वरणें लाजीरवाणें जिणें
मर्दांनीं रडणें अखंड दुबळी धिक् षंढता दाविणें !
ऐक्याची भडके चिता सकळही मांगल्य जाळी तरी
मोदें मंगल–दर्शिका उभविणें कैंची ध्वजा त्यावरी ?
"बिंबेना मनिं धर्म–तत्त्व कवणा निःसत्त्व रूढी उरे
सोहाळे सगळे तिचेच जनिं या ऐसे वृथा माजरे"
देशाची भवितव्यताच जणुं हें तेव्हां बजावी मला
तो संदेश तिचा तसाच वदतो हे देशबंधो ! तुला
झाली दास्य--विमुक्त राष्ट्र--जननी तो भाग्यशाली क्षण
सोन्याचा दिन साजरा उजविण्या तेव्हां ध्वजारोपण

वर्षप्रतिपदा १८४५ पुणें.

---

# रुग्णशय्येवरचे विचार

खिळे ही रुग्णशय्येला कुडी निःशक्त झालेली
पडे या काळदूतांचा गराडा हा सभोंताली !
न देहीं त्राण हो कांहीं करी आजार हैराण
थिजोनी जाय घोंटाळे उरे डोळ्यामधें प्राण.
कुणी ना शुश्रुषेसाठीं जिव्हाळ्याचे विदेशीं या
मनाला कल्पना नाना छळोनी पोळती वाया
पडे देहावरी काळी दिसे छाया कृतांताची
अकालीं आदळे कानीं तयाची हांक जोराची
तपें ना पाहिले दोंही जगाच्या या प्रकाशाला
अरेरे ! तोंच मृत्यूचा पडावा हा असा घाला
नसे प्रारंभ संसारा पुरा ना मांडिला खेळ--
अडे अर्धाच; आशेचा मनोरा ढांसळी काळ !

* * *

करावें देशकार्याला झिजावें लोककल्याणीं
' मिळे स्वातंत्र्य देशाला ' मरावें हेंच ऐकोनीं
सुखाची जन्मभू माझी सदाची प्यार जीवाला
तिच्या अंकावरी घ्यावी चिरंनिद्रा अखेरीला
फिटावें रीण अल्पांशें ऋणी मी जन्मजन्मींचा
असें या तातमातेचा तसा आप्तेष्टमित्रांचा
जगींचीं सर्व कर्तव्यें करीं माझ्या पुरीं झालीं
मनाची वासना मेली मरावें मी अशा कालीं

बुडे शोकीं सभोंताली
प्रभूच्या रंगुनी गानीं
अतां या पोरक्या आशा
चिरायू देव देइल कां ?

जिव्हाळ्याचा बसे मेळा
मिटावा अंतिचा डोळा
जळोनी खाक होणार
निराशेनें उले ऊर !

## प्रेमाचा प्रभाव

मानी तापट वृत्तिचा बहु असे मी स्वावलंबी पुरा
ध्येयामागुनि धांवलों त्यजुनियां आप्तेष्ट देशांतरा.
आपत्ती किति साहिल्या ! करपलें काळीज दुःखानलीं
कोणी नाहिं सहानुभूति लवही तेव्हां मला दाविली !

दैन्याच्या वणव्यांत होरपळलों खंती मनीं ना परी
त्वत् प्रेमार्णव लाभतां मज तदा धिःकारिला स्वर्गही
आतां आज परी नवे सुदिन हे दैवें मला दावितां
पैसा कीर्ति मिळे सुभाग्य उजळे वाढे जनीं मान्यता

हीं सारीं सुखसाधनें पसरलीं माझ्या सभोंतीं जरी
आनंदी न; हताश खिन्न मन हें संन्यासवृत्ती वरी.
नित्याचा क्रम चालला मम अतां जीवन्मृतासारखा
याला कारण एक ! होत तुझिया प्रेमास मी पारखा

स्वर्गीय द्युतिनें स्मशान फुलतें प्रीती मिळाली तर
स्वर्गाचेंहि बने स्मशान अवघें प्रीती निमाली तर

१२।४।२५ पुणें

## हा काळ धन्वंतरी !

[ एका प्रेमवेड्याचे उद्गार ]

" कां हा वेष मलीन दीन ? हंसरी वृत्ती विनोदी कुठे ?
बेपर्वाइ भणंग वृत्तित दिसे दिल्‌रंगही पालटे
कां हो ! खिन्न विरक्त पूर्ण दिसतां कीं रोग कांहीं जडे ?
कां एकांत रुचे वदा सकळ तें ओंठावरी जें अडे. "

ऐसे प्रश्न वृथाच केंवि पुसतां माझी कथा जाणतां
लागे वेड तुम्हासि हेंच मजला वाटे अतां तत्त्वतां
' ती ' माझ्या असहाय हाय ! हृदयीं गेली करोनी व्रण
माझें दुःख मलाच माहित पुरें बोलूं कशाला पण

वृद्धांनों ! उपदेश आणि तुमचें पांडित्य आतां पुरे
तुम्हीही असलेच यौवनमदें केलेच नां चोंचले ?
मित्रांनों ! उपहांसुनी हिणविणें शोभे मुळीं ना तुम्हां
बोला ईश्वरसाक्ष सत्य छळितो कीं प्रीतिचा रोग हा !

कोठें औषध रामबाण न दिसें शांती नसे अंतरीं
प्रीतीरोग–निवारणार्थ जगतीं हा काळ धन्वंतरी !

५।७।२४ बेळगांव.

---

## ताई—!

या जन्मीं घडला वियोग अपुला दैवें प्रिये ! कायम
नैराश्यानाळें या म्हणोनि जळत्या जीवा जडे संभ्रम
आशा--तारक लोपला मम सखे ! दुःखा जनीं ना तुला
जाळोनी मृदु भावना हृदयिंच्या ' ताई ' म्हणूं कां तुला ?

गीतींचा अपुराच हार अपुला राहे तरी सुंदरी !
जीवाची भवसागरीं गमतसे भंगेच आशा--तरी
सारा जाय ऋणानुबंध तुटुनी नातें नवें जोडिलें
सौख्याचा करि साजरा मुदभरें संसार तूं प्रेमळे !

कीं व्हावी सखि ! भाउबीज अपुली ही आजची साजरी
आलों —निर्मळ भाव—पूर्ण हृदया ओंवाळणी घे तरी.
गेला मंत्र जुना नि मानसपुजेसाठीं नवा मंत्र हा
आतां सूर निघे नवाच सगळ्या गाण्यांत माझ्या पहा !
सारा तोडुनि मोहपाश करि मी प्रेमास आत्मार्पण !
'.ताई·-ताइ' असेंच योजित तुला हें योग्य संबोधन.

---

# निराशेंतील आशा

देखोनी बहुता दिनीं प्रणयिनी ! आनंदलें मन्मन
प्रेमोत्फुल्ल हृदब्ज गे जिवलगे ! मोदें करी नर्तन
झाली हा ! विरह—स्मृती कटु परी आनंद मंदावला
भाळीं अल्पच सौख्यकाळ लिहिला दैवें असा भासला.

आला योग अहा ! अकल्पिताचि हा ऐसा तुझ्या भेटिचा
आया धीर हताश शून्य हृदया ये दूत कीं स्वर्गिंचा !
गीतींची परते पुनः तुजसवें संजीवनी पूर्वींची
मी गेलों विसरून या हृदयिंची ती कांचणी रोजची.

जीवानें जागीं कंठिले तुजविणा ते दों उन्हाळे जसे
दुर्दैवांत दिसें तसेंच लिहिलें शेषायु हें राजसे !

कोटीनी सहवास–सौख्य मजला तूझें पुन्हां लाभणें
आहे जीवित भारभूत वघ हें शांतीसुखानें उणें !
माझी नित्य जपोनि ठेवशिल तूं प्रेमस्मृती स्वांतरीं
आतां अंतिम हीच एक सखये ! आशा निराशेंतली !

२१।१।१९२३ ग्वाल्हेर

---

# सौख्याशा जळलीच----!

सौख्याशा जळलीच काय जगतीं जीवा अतां लाधणें
प्रेमाशेविण वांचणें न रुचतें प्रेमी जिवा धिक् जिणें !
'आ' वासोनि परिस्थिती संभवतीं पाही गिळाया मला
जो आशा--तरु वाढला मन--वनीं दैवें कसा तोडिला !

लग्नाचा नवयोग येत जुळुनी तो आपुला मंगल
आशा गोड बळावली सुगृहिणी माझीच तूं होशिल.
पोशिंदे परि रूढिचे म्हणिं गडे ! हे आडवे येउनी
'शाखा गोत्र जुळे न' हाय वदती !' आशा जळे तत्क्षणीं

अन्यायी बनला समाज अपुला आला मला प्रत्यय
रूढीची दुबळा अखंड पुजितो ही चंडिका निर्दय
रूढी धर्ममिषें गुलाम बनवी लोकांस सत्ताबळें
रूढीला जन 'धर्म धर्म' वदती वेडे कसे आंधळे !
आशेनें जगलों वृथा अजवरी—इच्छा खुळी निष्फल
आशेनें मरतों फलप्रद पुनर्जन्मीं तरी होइल !

१९।९।२२ मुंबई.

---

# पुनर्दर्शन

कालतमीं लोपली । पुनरपी प्रकाशली
तारका विलोकिली निराशता दुरावली
प्रखर वियोगानलीं । जीवकळिच करपली
संजिवनी लाभुनी खुले डुलोनि हांसली !
कल्पना न सुंदरी । या हताश अंतरीं
भाग्यतारका अशी पुनः हंसेल मजवरी !
बाग हृदयिं बहरला ! । प्रीतिहार गुंफिला
पळि अंतऱ्यांस पडत तरिहि दूर फेंकिला !
जीव बावला भला । हार सुकुनि चालला
त्यांतला सुगंध मात्र येथ मधुर सांठला !
प्रीतगीत यापरी । हृदयिं निमालें जरी
घुमत राहिली अखंड नादमाधुरी परी.
जखम जिव्हारीं पुरी । काळ हा बरी करी
वण इथें तरी असाच राहिला मदंतरीं.
आस खुंटल्यावरी । जीवतोड हो पुरी
स्मृति नितांत मधुर तुझी जागते परोपरी.
भरल्या नेत्रांतलें । मर्म सकल उमगलें
योग हा सदा असाच—कुठुनि भाग्य एतुलें ?
नांद जा गडे सुखें । चिर वियोग ये सखे !
हृदय खोलिलें करावयास दुःख हालकें

सौख्य लाभलें निकें। हें परंतु थोडकें
असुनि नसुनि सारखेंच जीवित तुज पारखें!

६।४।१९२३ मुंबई

---

## काव्योद्यान

देती सुंदर कल्पना—नव—लता
छाया जिथें शीतल
हे नाना रस—निर्झरौघ करिती
ज्या सार्द्र चेतोहर!
स्वच्छंदी मधु—शब्द—भृंग रमतां
हो मंजु गुंजारव
दे आनंद मरंद गंधहि मना
व्यंग्यार्थ पुष्पांतला!
काव्योद्यान असें फुलें नि विलसें
श्रीशारदामंदिर:
शांति—स्थान नितांत रम्य! रसिका!
ये येथ विश्रांतिला.

---

## गडे कविते!

'नाहीं गोड रसाळ सुंदराचि अन् विद्वन्मनोमोहिनी
तेजस्वी प्रतिभायुता नवनवी लोकीं यशःकांक्षिणी'

धिःकारीं अवमानितील तुजला मात्सर्यभावें कुणी
टीकेचा करुनी जनीं विषय तो ऐसें तिरस्कारुनी
वेडे ! सोडुनि चाललीस मज कां या लोकनिंदाभयें
माझें ऐक जरा विवेक वरुनी—जाऊं नको—थांब—ये !
कां लोकांकरितांच या अजवरी मी आळवीलें तुला
सर्वस्वावरि लाथ मारुनि तुझा संसार हा थाटला !
मृत्यू खास चुके न कोणि म्हणुनी कां आत्महत्त्या करी ?
एकाला विष तें दुजा अमृतसें हें सत्य लोकांतरीं
कानानें बघते खुळीच दुनिया खोट्यासही वानिते
दृष्टीकोन तिचा जसा तशिच ती निंदास्तुती बोलते.
धिक्कारोत खुशाल हे जन मुर्दे वानोत किंवा तुला
राहे मन्मनमंदिरीं नित सुखें तूं प्यार माझी मला

१९।१।२३, ग्वाल्हेर.

---

## अतिपरिचयादवज्ञा—!

वेल्हाळे कविते ! बळें सुदयिते ! प्रेमें तुला बाहितां
‘ जा—नाहीं ’ लडिवाळ बोल वदशी शृंगारभावें अतां
कोणी आळवितां परी कवि नवा जाशी कशी त्याकडे
कीं केली सदये ! अती परिचयें माझी अवज्ञा गडे !

४।५।२३ मुंबई

महाराष्ट्र साहित्य.

---

# ताजमहाल

काळा ! व्यर्थचि ' सर्वभक्षक ' असा कां गर्व तूं वाहसी ?
आनंदें स्वकरीं धरोनि धवला कीर्ति—ध्वजा ही अशी
दिव्य प्रीति इथें पहा विजयिनी नांदे चिरंजिविनी !
कीं भूदेवि सुमंगला नवल हा शृंगार ल्याली गुणी.

११।१०।२० आग्रा

---

# मी गाणार असाच नित्य—

जल्सा ऐन भरांत ! रंग चढला आनंदवृत्ती खुले
झंकारीं दिलदिलरुबा झुलवितो मंजूळ बोलीमुळें
डोळे नादतरंगिं रंगुनि सुखें आत्मा समाधींत हा
जादू माधुरिची फुले जन गुणग्राही रिझाया अहा !

तारा भृंग विहंग सुंदर फुलें गंधाढ्य हीं गोजिरीं
हीं तेजाळ अथांग सिंधुतळिंचीं रत्नें अशीं हांसरीं
हा मंदानिल शृंग तुंग गिरिचें हें रंगलें अंबर
साथीदार निसर्ग मंगल वदे ' गा—गा सदा बेडर '

प्रीतीचें नव चित्र गोड हंसतां बेभान हो भावना
आशा—स्वप्न सुरम्य बाळपणिंचें आनंदवी मन्मना
काव्य—स्फूर्ति उचंबळे सहजची माझी मला नावरे
रोधाया धजसी वृथा कवण तूं तीतें स्वयंमन्य रे !

जा-जा-कां मज गांजिसी अरसिका ! गातां गळा दाबसी ?
मी गाणार असाच नित्य धरुनी दिल्प्यार बीणा अशी.

१।४।२३ ग्वाल्हेर

---

# देवि शारदे !

जगिंचा प्रकाश पहात तेविस जाहलीं वरुषें वया
जग काय हें उमगोनि ये मजला जरा अवधींत या
फिरतें अखंडित कालचक्रचि दे प्रचीति बरी बुरी
धरि वक्रदृष्टि कठोर दैवहि शांति ना लव अंतरीं.

प्रतिकूल घोर परिस्थिती भंवतीं परी न जुमानिली
पथिं कंटकांसम संकटें किति तीहि पार झुगारिली
भव--दाविं पोळत जीव माउलि ! सांवली गमसी खरी
धरुनी मनीं दृढ भाव पाउल ठेविलें तव मंदिरीं.

गरदी इथें परि दाट ! लोटिति दूर हे मजला कुणी
धरिती वृथा मशिं वैरभावचि मत्सरें जळुनी मनीं
तिळमात्र खंत न; काढुनी निजमार्ग निर्भय चालला
तव भक्त निस्पृह हा पहा तुझिया पदांबुजिं ठाकला !

नलगे कदापि जनीं मरातब मान्यता धन संपदा
सुख–राशि ऐहिक या अशाश्वत मानितो तृणशा सदा
मतिमंद छंद धरी तुझा मननंदिनी ! जन हा भला
नव मोद दिव्य शुभास्पदे ! तव पाद--सेवनिं लाभला

मनिं सूर जे घुमले तुझे जनिं तेच आळविले मुदें
विनवीं तुला मज गावया हृदयांत धीर असाच दे
नित राहुंदे वरदे ! कृपा–कर हा तुझा शिरिं शारदे !
पद--पंकजीं मन–भृंग गुंगुनि मंजु रुंजनिं रंगुंदे !

१।५।२५ पुणें.

# काळाचा खेळ!

" Unfathamable Sea! whose waves are years
Ocean of Time, whose waters of deep woe
Are brackish with the salt of human tears,
Treacherous in calm and terrible in storm,
Who shall put forth on thee
Unfathamable Sea ? "

*Shelley*

# नांदी

लीला अनंत तव गूढचि कालदेवा !
  ही जीवकोटि सुखवी कटु ताप दे वा
ब्रह्मांड नाचत अखंड तव प्रभावें
  तूतें करी प्रथम वंदन भक्तिभावें !

# काळाचा खेळ !

नयनमनोहर निसर्गशोभा खुलली नवलाची
कृत्रिम शोभा रुचते कैंची कोंदट नगराची ?
खुल्या हवेमाधिं चला मजेनें घडिभर हिंडाया
फुलतें नव सौंदर्य निसर्गाचें हें निरखाया !
निळें धुरें नभ वरती खालीं डुलती हीं रानें
हिरवी दुनिया हंसते ठुमकत डुलत्या डौलानें
पानमळेही कितीक पिकते भवंताली दिसती
फुलत्या हिरवाळिं गाइगुजींचीं खिल्लारें चरती
गोजिरवाणी अंवराइ ती गार विसांव्याला
चालुनि थकल्या वाटसरूला श्रमल्या जीवाला
डोंगराळचा मुलुख भंवतिचा बढत्या बहरीचा
भली निसर्गश्रीच उधळते सुरंग नवतेचा !
सृष्टिसतीचे लाडलाडके मधु निर्झर बाळ
स्वच्छंदें बागडती गाती विशुद्ध वेल्हाळ.
नाजुक लतिका सुंदर कुसुमालंकारें नटल्या
आलिंगाति तरु गाढ मुदभरें प्रेमानें फुलल्या.
इरित तृणाचे नवरंगांचे सुंदर गालीचे
मोत्यासम चमकती तयावर हिमबिंदू साचे.
रानफुलें इवलालीं फुलली नाना रंगाचीं

दौलत उधळी मंजुवायु दशादिशां सुगंधाची
हरिणसशांचे कळप हिंडती नित रानोमाळ
दुडदुडती नव तृणांकुरांना भक्षित हरवाळ.
गोपबालकें खेळ खेळती मौजेचे इकडे
रानें राबती पोटासाठीं शेतकरी तिकडे !
उंच भराऱ्या घेत नीलनभिं विहंगगण नाचे
वाऱ्यावरचे गाति मुशाफर शाहिर सृष्टीचे !
वनदेवीचा विलास संतत चाले स्वच्छंद
अहा ! कोंदला दाहि दिशेला अखंड आनंद.
बाह्यसृष्टिमधिं आनंदाचें साम्राज्यचि सारें
अंत:सृष्टिंत उदासीनता नकळे कां पसरे.
प्रसन्नता मावळे जिवाला विषण्णता जाळी
कळाति कधिं कुणा दुर्दैवाचीं लिखितें जीं भाळीं ?

*　　*　　*

पायवाट ही दिसे एक जी मळली चालोनी
मौजेखातर पुढें जाउंया असेंच येथोनी
निवडुंगाचें रान माजलें कुंपण शेताला
घाणेरीचें गरीब लेणें हें बांधाऱ्याला.
दिसे टेंकडी पूर्व दिशेला खाशी टुमदार
दुरुनि शोभते अहा ! साजरी किति हिरवीगार !
रानबोरिचीं करवंदीचीं जाळीं कांटेरी
जांभुळ पिंपळ फणस पिंपरी तिथें गर्द भारी !

तिथें मेंढरें चाराया हिंडती मेंढपाळ
गोड चाखवा अलगूज्याचा घुमवित मंजूळ.
पहा गांवठण उंचवठ्यावर इथें पायथ्याला
शेंपन्नासच उभा उंबरा दिसतो गांवाला.
उजाड खेडें चार घरांचें तें हांकेवरती
पल्याड वाहे झुळझुळ ओढा निर्मळ दिनरातीं.
मंगलवाद्यें अहा ! गर्जती उत्सव थाटाचा
खेडदळांचा सण वर्षाचा आज बेंद्राचा !
कृषीवलांची धनदौलत हे पुजिले बलिवर्द
शृंग रंगवुनि शृंगारीले दुमदुमला मोद !
सानथोर नरनारी नटल्या उल्हासित चित्तीं
नवपल्लव तोरणें बांधुनी गृहांस भूषविती.
आनंदाचा बहर उसळला तिकडे गांवांत
परि शोकाची काळी छाया कां पसरे येथ ?
कां हळहळतो जमाव इकडे कांहीं लोकांचा ?
घळघळ लोटे नयनिं तयांच्या पूरचि अश्रूंचा.
थांबा--ऐका--काय बोलवा चाले लोकांत
कर्णपथावर भुमका दुःखद ही कांहीं येत
" पुरे साल आजला--क्रूर तो काळाचा खेळ !
दुर्दैवाचा पडला घाला--गेले पाटील "
गुरें पांखरें रडती फत्तर दुःखानें कढती
सळसळ करिती झाडेंझुडपें रडगाणीं गाती.

बारमाहिंची अंगीं एकचि खादीची बंडी.
ऐन प्रहरचा वखत जाहला—जीव भागलेला
दिस डोईवर ढळला तरिहि न घे विश्रांतीला.
निकोप आरोग्याची ऐसी शाश्वत संपत्ती
सुखसमृद्धी शांतिधनाची कल्पलता जगतीं !
काय चाललें जगांत याची वार्ताही नाहीं
नसे मुळीं संपर्क विषारी जगताचा तिळही.
धन्य इमानी जगीं निरोगी सालस राणोजी
देवें दिधली परिस्थिती जी त्यांतचि हा राजी !
कांदाभाकर शिळीच चावी—रुची किती त्याची
ताज्या पक्वान्नांना येणें सर कैंची त्याची !
भल्या पहांटे उठुनि उरकितो अपुल्या न्याहरिला
बैल घेउनी पहा चालला आतां मळईला !
हृदय नाचते उल्हासानें, उत्साहचि भरला
हुरूप चढला नव्या दमानें लागे कामाला.
गडी आणखी चार दोन ते येती मदतीला
मोट जुंपुनी पाणी पाजित साऱ्या शेताला.
तमाखु सेवन यथेच्छ चाले विहिरीकांठाला
एकचि झुरका--हुशार झाला जीव भागलेला !
किती निथळती अंगामधुनी घामाच्या धारा
परी सुखाचा मनांत खेळे झुळझुळता वारा
शिरीं टोपली, करीं शिदोरी, मूल कडेवरती,

बिजली लवते येइ मंजुळा तशी प्रणयवंती.
जेवुनियां जेवण ताजें तो तृप्त मनीं झाला
ओंजळिनें प्यायाला पाणी वाहे पाटाला.
तीही थोडा हातभार मग लावी कामाला
परत साजणी जळण वेंचुनी आली झांपेला.
दिवस बुडाला सांज निवळली तांबुस गगनांत
जाय रंगुनी नवरंगानें पश्चिमचा प्रांत !
कामकाज निरवुनी माणसें शेतांतुनि आलीं
देत हुंबरी खिल्लारेंही माघारा वळलीं.
शेंगा वांगीं काळी कंवळी भरलेलीं कणसे
पालाभाजी घेउनि राणोजीही आलासे.
दारीं तिष्ठत उभी प्रणयिनी खेळवि कटिखांदा
अपुला तान्हा--कौतुकते मनिं सेवी आनंदा !
दुरुनि निरखितां स्वारी पतिची हर्षित मनिं होई
उत्कंठेनें अहा ! राजसा सामोरी जाई.
हळूच पुसते लाजत मुरकत हंसुनी लडिवाळ
' उशीर कां इतुका ? केंव्हांचा वाट बघे बाळ '
उचलुनि घेई डोईवरचा गवताचा भारा
दिवसभराचा शीण तयाचा क्षणीं हरे सारा.
मंजुळ बोली प्रेमाची मनिं ठसे मंजुळेची
किती चुंबनें गोड गोड ती अहा ! लाडक्याचीं.
सुरत सांजरी मोहक किति तरि जोबनवंतीची

खास शोभते नाजुक राणी कोण्या सुभगाची...
नार नऽहाळीचा नारिंगी सजीव सारंगी
भरज्वानीचा भरला प्याला इष्की नवरंगी.
चांद उजळता आणी भरती पहिल्या प्रीतिचा
तुफान दरिया लावण्याचा उसळे बहरीचा !
रत्न खरोखर रत्न लाभलें हें राणोजीला
इच्या संगतीं सीमा नुरली त्याच्या भाग्याला...
सुखदुःखाची भागेदारिण जीव तिला काही
शोभा सुंदर संसाराला स्वर्गाची येई !
प्रेमाच्या गुजगोष्टी बोले गहना गुलनार
शब्दासंगें जीव झुलतसे—मोदा नच पार.
विनोद चाले, जेवण झालें स्वस्थपणें आतां
प्रहर लोटला वैरण पाणी ढोरांना देतां.
खालीं कांबळ वरती वाकळ पथारि अंथरली,
देवाजीची भाकुनि करुणा स्वारी मग निजली
सान अर्भकें, अंगमेहनत किंवा जे करिती
खरी सुखाची गाढ झोंप ती तयांनाच जगतीं !
केला आला दिवस साजरा नित आनंदाचा
वर्षें महिने दिवस चालले--क्रम हा नित्याचा
चित्र किती हें सुंदर सुवकचि या संसाराचें
कीं बरवा आदर्श बिंबवी सुख तें स्वर्गाचें.
उमर लोटली सुखांत सारी आजवरी त्यांची

निष्ठुर दुर्दैवाला कळली वार्ता परि याची.
सुखें चालली जीवित यात्रा कुण्या सज्जनाची
महाघातकी दुर्दैवाला रुचेल परि कैंची ?

* * *

दुर्दैवाचा विलास दारुण जाळी हतभागा
दग्धदैवदुर्विपाकयोगें तो मुकलाच जगा.
घोर राक्षसी प्रळय मांडिते लीला दैवाची
कळेल कैंची दैवचमत्कृति गूढाचे नवलाची ?
सुखदु:खाचे कालचाक्रिं या फिरति सदा कांटे
डाव साधुनी अचुक दैव घे उडी तिथें वाटे !
कुठवर कायम तसाच राहिल सद्दीचा जोर
कम्बख्ती कमजोर शिकंदर सवाइ तगदीर !
कालवशाचि संगीन भाग्य तें सुरदैत्यांचेंही
कुठ प्रतिष्ठा मनुजकीटकाची मर्त्याची ही !
सदा बदलती कुटिल गतीची काळाची माया
क्षणांत फिरतां नूर झुकविते झुकते ही दुनिया.
कभिन्न काळा प्रांत भविष्याचा हा अज्ञात
काय काय न कळे काळाच्या अजस्त्र उदरांत !
क्षणांत हंसवी क्षणांत रडवी दैवाची लीला
दुर्दैवाचा अजब तडाखा चुकला कवणाला ?
दैववंत आजि भाग्यगिरीच्या शिखरावर रमती
तेच उद्यां जागीं दु:खदरीमाधिं मातीला मिळती

दुबळी मानव आशा हंसते क्षणभर सुख मिळतां
ऊर फाटतो चाहुल थोडी दुःखाची कळतां.
कांहीं नाहीं हातीं जगतीं दुबळ्या मनुजाचे
प्राक्तनांत जें असेल लिहिलें तेंच घडायाचें !
राणुजिला दुर्दैव छळिल कां–काय खुळी शंका
भाग्यवंत जगिं हाच तयाच्या कीर्तीचा डंका !
उंच उंच ही चढे प्रभावळ चढत्या भाग्याची
क्षणिं दैवाच्या वज्राघातें ढासळेल कैंची ?
काय करिल दुर्दैव बापुडें ! काळाची करणी !
काळ उलटतां जाई झोला दैवाचा तुटुनी.
क्षणभंगुर संसार सजविला कटुतर सत्यांनीं
हृदयीं भिजलीं मृत आशांचीं थडगीं अश्रूंनीं !
मनिंच्या आशा मनांत मरती दशा विषम येतां
ईश्वरचरणीं निष्ठा देई समाधान चित्ता !
नको भरारी भव्याविषयीं वृथा कल्पनेची
दिसेल तें तें मुकाट बघणें हितावहाचि हेंची !

* * *

अहा ! पातला हर्षा वितरित हा वर्षाकाल
कृषिकवर्ग उद्योगी कोरहि खाया नच वेळ !
थोर मनाचा परोपकारी कष्टाळूचि खास
कष्ट करोनी धान्य पिकवुनी जगवी जगतास.
रानमाळ डोंगरी पिकविली सारी खडकाळ

खपुनि अहर्दिन पकि उजळिते लोखंडी फाळ !
सुखवृद्धीचे समृद्धीचे सुदिन सुज्ञ गणती
दुर्दिन दुःखद दुजे कुणि जरी अज्ञपणें म्हणती.
धरा शांतवी वर्षर्तू हा रखरखलेली ही
आबादी आबाद चहुंकडे नांदे लवलाही.
वर्षाराया ! मेघावलिचा मंदिल रंगेल !
शिरीं खोंवशी बिजलीचा शिरपेचहि अनमोल.
काव्यकल्पना सुंदर भासे प्रेमी जीवाला
उग्र भयंकर रूप तुझें परि दिसलें कोणाला ?

* * *

मेघ डंवरले रात्रिपासुनि मंद वृष्टि चाले
झिमझिम रिमझिम बरसातीनें सकलां त्रासविले.
धुकें दाटलें, दिसती धूसर धुंद दिशा दाही
दिवस कासराभर सूर्याचें दर्शन परि नाहीं.
चिक चिक सारी—मेघ गर्जती बहूरूपधारी
शेता जाया राणोजीची परि सजली स्वारी.
दारा आडुनि मंजु मंजुळा बोले मृगनयना
" सण वरसाचा आज बेंदराचा हा आहे नां ! "
" गडे कशाला मग शेताला अतांचि जायाचें
धुवुनी शृंगारोनि नाहिं कां बैल पुजायाचे ? "
" खरंच लाडके ! त्यासाठिंच मी जातों मळईला
पुरणपोळिचा बेत पाहिजे खास आज झाला "

" विश्रांतीचा दिवस आजचा नव्हेच कामाचा
आणि परतावे उशिर–ऐकिले कां–नच कामाचा.
करुनि तांतडी निकडीनें जरि हो परतायाचे
परत पाउलीं–तरिच कुठें ते आतां जायाचे "
" जशी हुजुरची आज्ञा होइल राणी सरकार !
गुलाम बंदा हा प्रेमाचा हुकुम पाळणार "
आलिंगी मृदुलांगी बोलुनि या विनोद बोला
कर कंठीं सोत्कंठ घालुनी चुंबनांत रमला.
" विनोद भलता–न्यारी बाई प्रीतीची रीती "
' इश्श काय हे '–असें वदुनियां पदर सांवरी ती
दबल्या ओंठीं लबाड लपते नवतीची लाज.
गुलाब लाजे गालीं चढतां प्रीतीचा साज !
लाजलाजऱ्या ओठीं अडला प्रीतीचा बोल
बावरली भावना दाविते चाळे चौचाल.
चोरुनि पाही अर्ध्याउघड्या नजरेचा कोन
हृदयबिंब तरळते प्रीतिचें त्यांत उचंबळुन
मधुर हांसुनी किंचित् मुरडुनि चंचल तनुलतिका
दावि कशी अनुरागरंजिता उसना राग फुका !
" एक साजणी–एक आणखी--झाली मज घाई "
" पहा आपणां लबाड हंसतो अपुला छकुलाही "
" अरे गुलामा करूं लागले का सारें तुजला ?
दे तर पापा एक गोडसा आतां आम्हांला "

मुके मटामट किती घेतले प्रेमभरें शिशुचे
शिशुकौतुक तें जनकजननिचें किति वर्णायाचें !
" लगबग येतों प्रहरभरानें घरला जेवाया
नको येउं तूं बाळ घेउनी शेताला वायां.
बाहिर सोडूं नको मुळीं गे सांभाळीं बाळा
अचपळ भारी ठेव सारखा त्यावरती डोळा.
वाऱ्यावावटळीचे आले दिवस पावसाचे
घाल आंगडें गरम टोपडें याला लोंकरिचें.
पाठीं लागे बाबा-बा-बा बोलत वेल्हाळ
चुंबुनि वारंवार वदतसे ' जातों ' सांभाळ "
दिली इशारत दुर्दैवानें वाटे त्या काळा
' झटकन येतो--' आणि कुचकुचे पाल वळचणीला !
धस्स जाहलें उरांत--चरके मनांत मंजूळा
जाइ राणुजी बघे वळूनी किती तरी वेळां.
दृष्टिआड जाहला परि तिची दृष्टी ना ढळली
गेल्या मार्गावरती वेडी टक लावुनि बसली !
विकल्प येती मनीं किती या अगणित कटु शंका
फुटे बांगडी तुटे गळसरी तशांत नुमजे कां !
उजवा डोळा लवतो भारी धीर तिचा सुटला
अपशकुनांचा कहर जाहला जीव तिचा विटला.
मुसळधार पावसास झाली तोंची सुरवात
क्षणाक्षणाला खालीं वरती जीव तिचा होत.

कपडालत्ता घडुती सारी भिजुनि चिंब होत
गळती लागुनि हो घोंटाभर पाणी—झांपेत
घडवंचेविर चार घोंगडी जाडी अंथरुनी
मांडीवरती मूल पाजवी पोटाशीं धरुनी.
असे मंजुळा अनाथ अबला भारी धीराची
बसे बिचारी कांस धरोनी दुबळ्या धैर्याची.
हिंवली भरली--मुठींत धरुनी व्याकुळ जीवाला
दीन बापुडी परोपरीनें आळवि देवाला
" धांवा पावा कां हो केला हा रुसवा देवा !
अभागिणीचा कोणा यावा तुम्हाविणा केंवा ?
भक्तासाठीं सदा जागता सदया भगवंता !
किती पाहतां अनाथनाथा ! अंत दयावंता !
आळवणी ही किती करूं मी तुमची भगवाना !
माझे पंचप्राण सत्वरीं कुशालि भेटवा नां !
कां गे सटवे टिटवीबाई जीव आटवीशी ?
घिरघिर घिरट्या घालुनि कसलें अभद्र सुचवीशी.
' घू घू ' भिववी भेसुर घुंगट घुमत्या घुबडांची
पुरी इशारत भवितव्याची गमली धोक्याची.
पळो अमंगळ दयाळ देवा टळो इडापीडा
अखंड राहो अभंग मंगल माझा वज्रचुडा !
पाजळुनी पंचारति पंचप्राणांची अंबे !
करीन ओवाळणी—नवस हा आई जगदंबे !

करुणा विस्तारीं कुलदेवि ! अशा या अवकाळीं
उभा गांव आशेचा ना तरि ओसाडचि भाळीं !

* * *

'आई'–'आई'—कुणी फोडिली कोठुनि किंकाळी ?
हृदयज्वालामुखितुनि फुटली शोकाला उकळी !
करित बादली बडबड लोंढा पाण्याचा येई
तसा वादळी वारा हलवित पर्वतशिखरेंही !
खोप उडाली वाऱ्यावरती. चीज वस्तु सारी
वाहुनि गेली. वेळा प्रळयाचीच गमे आली.
" दुस्मनदावा कसा साधला मेल्या दुर्दैवा !
छळणा करिसी किती घातक्या ! कैंचा दुष्टावा ?
अंतकाळ पातला मांडिला आतां प्राणांत .
कोठें शोधूं कोठें गेला सोडुनि मज नाथ ?
बघे साजणी वाट पांखरावाणी भिरभीर
हळव्या जीवाच्या विश्वासा हा वेडा धीर.
बेचैनी बेहद्द जिवाची घडीघडी बढली
घोर निराशा भंवति दाटली कळसाला चढली.
कोसळती सरिवरी सरी आदळेच आभाळ
आपत्ती गुदरली अकल्पित—मोठी आबाळ.
जणुं फुटलें आकाश—पळभरी पाउस थांबेना
होत जिवाचें पाणी काळ क्षणही कंठेना.
तुफान माजुनि होत दुर्दशा जी या सृष्टीची

विकल्पवादळ मनीं माजतां तीच मंजुळेची !
बारा वाटा चंचल पाणी वाऱ्यासह पळते
तिचें चित्त चंचल पाण्याहुनि अस्थिर तळमळतें !
दुःखाचें आऊर लोटलें विचार काहूर
कांहि सुचेना कांहिं रुचेना जाळी हुरहूर !
उरला घडिभर दिवस—वायदा परतीचा सरला
कुठें राणुजी ! जीव झरझरा शोकामधिं झरला.
वाट पाहुनी थके बिचारी त्रेधा जीवाची
करा कल्पना—शोचनीय किति स्थिति मंजूळेची !

*            *            *

गडगड भीषण घनघर्षण हें वर्षण जोराचें
धडकी भरविति कडकडाट लखलखत्या बिजलींचे.
घोर भयंकर झंझावातहि नाचे सैतानी;
वृक्ष थोरले धडाड पडती मुळांत मोडूनी.
ओढे नाले तुडूंबले हे खळखळखळ करिती;
पाणी पाणी चहूंकडे सळ सळ धारा पडती;
दगडावाणी तशांत चाले गारांचा मारा,
'त्राहि भगवन्' करी गांजला जीवमात्र सारा !
वरुण कोपला करि जणुं सहस्रधारा शरवृष्टी
चळचळ कांपे धरणी—सृष्टी झाली अति कष्टी.
अतिवृष्टीनें ओला दुष्काळचि हा पडणार;
प्रळय पातला—खरेंच यंदा भाकित ठरणार !

वाळवंट वैराण सहारा जेथें वणवणलें
जीवब्रह्म हैराण जाहले मरणाविण मेलें !
तिथेंच भरला तुफान दरिया अवघ्या दिवसांत
अगाध लीला परमेशाची ! मति कुंठित होत.
उजाड खेडीं कितीक पडलीं महापूर आला
कितीं कुटुंबें उघडीं पडलीं मिळलीं मातीला !
कितीक बुडते जीव फोडिती टाहो हुंकार
दया न देवा तया बधिर करि कीं हाहाकार !
हजार वाटा अतां मोकळ्या झाल्या मरणाला
मिती मुळीं ना संहाराला क्षिती न चित्ताला !
सरपटणारे किती जिवाणू झाडावर चढती
जलाल जहरी जनावरें ती किति फूत्कारीती.
केविलवाण्या कर्णकठोरचि कर्कश किंकाळ्या
ब्रह्मांडाच्या अतां वाटते बसती कानठळ्या !
सारा हलकल्लोळचि केवळ हा दो प्रहरांत
दुनिया दुबळी बुडेल वाटे सारी पाण्यांत.
क्षणिं पाताळीं डोंगरलाटा आरडत्या दडल्या,
क्षणांत दिसती अस्मानाला जाउनियां भिडल्या;
काळिज फाटे कानीं पडतां बुडत्या आरोळ्या,
पळे तोंडचे पाणी झाल्या हृदयाच्या चिंध्या.
काळिकाळाची खेळ मांडिते जलवंती माया
बिन दिक्कत मोकाट उधळिते दुनिया बुडवाया.

जलप्रलय हो दृश्य भयंकर भ्याले ब्रह्मांड
थके लेखणी झणीं वर्णनीं करि काळें तोंड.
प्रसंग दारुण शब्दचित्र तें कवण चितारील ?
धरापृष्ठ संपेल लिहीतां सागर अटतील !
या अवकाळीं खचेल हिंमत छाती दडपेल,
शूरमर्द बेबर्द बहादुर थरथर कांपेल
नव्हे सुज्ञ हो–ही बाजारी बोलाची बात
अशा प्रसंगीं मर्दांचाही नामर्दचि होत.
झपझप पाउल थबकत आतां भ्याल्या काळाचे
चलाचलाची गात चित्कला गाणें शून्याचे,
शिळंदार पर्जन्य झडीचा पडतो कोसळुनी
झोंबे जीवा थंडगारवा हाडें फोडोनी.
थयथयाट करि असुरी माया जेथें प्रलयाची
तिथें फिराया माय कोणत्या व्याली जीवाची !

*    *    *

थांबा–पाहूं–कोण्या बेडर जीवाचा पाड
अंधुक आकृति दिसे हालती दाट धुक्याआड.
वाटे कोणी अनाथ अबला ही चाले धीट
आपणही बेकदर चला जाऊं पाठोपाठ.
डोळे फाडुनि बघे निराशा ही कोणावरती
दुर्दैवाच्या भालेबरच्या रोंखियल्या जगतीं.
अपार सिंधू खवळे भंवती उसाण कल्लोळ

कोण पिशी चालली उराशीं कुर्वाळनि बाळ ?
श्रमी जाहला हाय ! हाय ! किति जीव मंजुळेचा
पांख मोडले आशेचे मनिं लेश न धीराचा.
घोर निराशेची ही पसरे रातचि अंधेरी
अशापरी दुर्दशा—कशाला पडली बाहेरी ?
नुरला पारावार बिचारीच्या तो शोकाला
आक्रोशें ब्रह्मांडगोल कीं भंगलाच गमला.
तिच्या बावऱ्या अधिऱ्या जीवा विरंगुळा पडला
नजरेचा भोंवरा गरगरे—घेरी जीवाला;
शोक विव्हला निघे मंजुळा पतिच्या शोधाला
भरे हुडहुडी—धुगधुग थोडी मरत्या आशेला.
रडुनी रडुनी पार आटलें डोळ्यांचें पाणी
मारि कोरडे दैव—ओरडे ती वेड्यावाणी.
जाळि विषारी दुर्दैवाचा उफराटा वारा
तिच्या उजळत्या दैवाचा कीं तो तुटला तारा.
ढळे मेरुमंदार डळमळे गगनीं ग्रहमाला
शोकें उललें विश्वहृदय जणुं कंपचि शेषाला;
पतिनिष्ठेनें अंध जाहली विवेक मग कुठला
जीव वाहिला पतिचरणाला पतिच्या प्रेमाला.
पतिव्रतेला शिवतें भय नच कळिकाळांचेंही
त्रिभुवनिं दैवत पतिदेवाविण सतिस दुजें नाहीं.

भयाण भेसुर चराचराचें स्मशान हें शांत
फिरतें थडगें जितें प्रीतिचें मंजूळा क्लांत.
सहिरा बहिरा जीव वाळला अंतस्तापानें
प्राण थरथरे क्षणाक्षणाच्या त्या निश्वासानें.
इकडे तिकडे फिरते रानींवानिं बापुडवाणी
भ्रमिष्ट शिणली टाहो फोडित राणुजिची राणी !
कुठें जिवाचा राव दिसेना ठाव ठिकाणाही
पतिभक्तीची करुणामूर्ती धुंडि दिशा दाही.
धुकें दाटलें मार्ग दिसेना तरी भ्रमे दीना
पायीं कर्दम कंटक खुपती बघवेना दैना !
कृष्णजाल पसरलें सृष्टिवर हें काळोखाचें
काळभैरवें ग्रहण लाविलें राक्षसि रंगाचे !
पाठीं पुढती खालीं वरती नजरेची फिरती
पळापळाला बदले चंचल चालीची वृत्ति.
क्षणांत पळते–क्षणांत वळते–चित्त तिचें चळतें,
उभीच पळभर जळत निरंतर अंतर तळमळतें.
देहभान दिलजान हरपली शुद्धबुद्ध कुठली
बधिरल्याच बेभान भावना–जीवाशा सुटली.
शून्य सानुलें रम्य घरकुलें रितेंच हृदयाचें
प्राणांतीं पांखरूं फडफडे पिसाट प्रणयाचें.
येत मूर्च्छना जीव तिचा तरि अडखळलाच कुठें.
पडते झडते परि सांवरुनी वारंवार उठे.

फिरे जिवाचा भंवरा गरगर—हृदयाचें पाणी
तुषार फेंसाळुनि बोलांचे येती उसळोनी.

*　　　*　　　*

" मंजु मधुर दिलरुबा दिलाचा तुटला दिलदारा !
बदसूरीचे बोल बोलती या तुटल्या तारा.
जिव्हाळ्यास झोंबतो जिवलगा ! हा जहरी वारा
जिव जगतसे जीवाविण धावे सैरावैरा.
जीवतुटी ही काळें केली प्रणयी जीवांची
दीलजमाई सुटते कधिं कां जमल्या जीवांची ?
अहा ! राजसा, सख्या, सुंदरा, नाथा, मनरमणा,
कुठें रंगला जिव आपुला या दासीविणा ?
भाग्याचें सौभाग्य संपलें हें हातोहात
कोण आसरा दुखऱ्या जीवा आतां दुनियेंत ?
बेमानीची दुनियादारी भासे मनहारी
झूट फुकाची तुटते सारी क्षणिं परि दिलदारी.
कां हो केला या दासीवर हा इतुका राग
नयनीं खेळे मूर्ति आढळे ही जागोजाग.
जगणें मरणें एक जाहलें जिवंत मुड्याला
जित्या जगाचें कोडें नुकले मेल्या जीवाला.
जिव बधिर जड— पर्वा वारेमोल न देहाची
दगडीं दडल्या देवा माझी दया न ये कैंची ?
कुठें उडविला प्यार जिवाचा माझा चंडोल

खोल घुमविले हृदयीं ज्यानें सलगीचे बोल?
पतिदेवाची पूजा माझी—झाला भंग तिचा
अर्धा गुंफायाचा हारचि तुटला प्रीतीचा.
प्राणांची पंखरण—करपोनी कळ्याहि आशेच्या
सुकल्या साऱ्या क्षणीं पाकळ्या गळल्या जीवाच्या.
आयुष्याचा वसंत पुरता नाहिं किं हो फुलला
जों न दिलाचा बाग बहरिचा खुमारिनें खुलला.
रुचला कैंचा भगवंता हो हा करणें घात?
मृदुल फुलांचा दडपोनी कां दिल दगडी होत?
अनाथ आशा थिजल्या नयनीं तळावते आतां
डोळे भरुनी बघुनि अश्रुनीं न्हाणीते नाथा.
या हो नाथा! शोकें फुटला हृदयाचा कोट
विचित्र योगें पडली बोला फुला एक गांठ.
भेसुर मुडदा वहात आला पाण्यानें फुगला
जीवासंगें देहहि ठेंचाळुनि त्या अडखळला.
नजर नेटकी नीट निरखुनी न्याहाळी त्यास
करुणागंगा क्षीण मंजुळा पडली बेहोष.
पदराखालीं जीव कोंवळा जगला कीं मेला
भान नच तिला कसें कळावें—ठाउक देवाला.

*   *   *

कसा राक्षसा वर्षाराजा! घालिसि थैमान?
राजा कसला तमोवृत्तिचा निष्ठुर सैतान!

मयूर चातक उत्कंठेनें बघति किती वाट
भाट तुझे द्विज अती आदरें गाती स्तुतिपाठ.
सृष्टी देवी स्वागत करिते सादर सानंद
कृषिवलांना तुझाच लागे रात्रंदिन छंद.
जीवनदात्या ! माबापचि तूं सदय अन्नदाता
प्रेमें पुजिलें म्हणुनि भला उतराई होसि अतां.
विचार सारासार मुळीं नच सत्ता गाजविसी
क्रूरपणाची कमाल करिसी सृष्टी कष्टविसी.
तापद खरखरलेंहि पुरविलें निदाघ–साम्राज्य
सुखाभास कटु–मृगजळ परि तें गमतें ना त्याज्य.
'धरुनी समता करुनी ममता जगता तोषवितो
वरुनी सुमती सुखवि वसुमती सुखवृष्टी करितो.
दयानिधी मी महोदारधी करि आबादानी
शांतिसुखाची न्यायनीतिची माझी अमदानी.'
कां सैताना ! अशी वंचना नादाना करिसी ?
दया क्षमा शांतीचा पुतळा सकळां भासविसी !
काळें काळें पुरतें कळलें अंतर तव जहरी
रंग दाविसी फुका वरिवरी फसे न कोणि परी.
अरे दांभिका खला वंचका ! सत्ता गाजवुनी
अहंतागुणें ताडिसि अदया ! न्यायाला चरणीं.
दो दिवसांचें वैभव सत्ता मत्ता जायाचें
औट घटींचें राज्य ! परि शिरीं अपेश कायमचें.

उदारधी हा अगाध जलधी नव ऐश्वर्यनिधी
मेघमंत्रिगण अधन तुझे त्या जलधन पुरवि सुधी.
तुष्ट पुष्ट बहु परधनिं झाले तरि राक्षस कुमती
दुष्ट नष्ट चांडाळ कृतघ्नचि गर्वे गुरगुरती.
खास क्रूर सैतान खरा तूं जीवनसम्राटा !
जित्या समंधा ! मत्त मदांधा ! ताठा तुज मोठा.
कष्टद भारी कारकीर्द तव अत्याचाराची
दडपशाहिची बेमानीची किति अन्यायाची.
जर्जर झाल्या या जुलमानें दीन दिशा दाही
प्रळय मांडिता क्रूरपणाची तव रावणशाही.
पहा जाहली देशमाउली त्रस्त किती आज
न्यायी प्रेमळ सदा म्हणविशी कांहिं धरी लाज !
मेघमंत्रि गण सत्ताधारी झाले उन्मत्त
तुझ्या कृष्णकीर्तीचा झेंडा फडके दुनियेंत.
अपंग अनाथ जीव किती हे काळाच्या दाढीं
दुष्टपणाची पिटविति दौंडी साऱ्या ब्रह्मांडीं.
अनावर्षणीं पाणी पाणी करुनी तडफडते
अतीवर्षणीं होत जिवाच पाणी जग बुडतें.
ऋतूनायका ! वरी विवेका नितांत सुखकारी
जळो तुझी अमदानी न तरी ही अत्याचारी.

*　　*　　*

चला पाहुंया स्थिती जाहली काय राणुजीची
कैसा कोठें गेला—नाहीं वार्ताही त्याची.
हाय ! घेतला निरोप वाटे सखिचा शेवटला
ढवळ्या बैला आणायाला गेला शेताला.
करी इरादा परत पाउलीं घरिं परतायाचा
हेत निराळा दिसुनी आला परि परमेशाचा.
ओढ्याकांठीं बैल धुवाया घेवोनी आला
झाडावरती प्रातर्विधि आपणही करि जों स्नानाला.
दुरुनि देखिला—लोंढा आला—क्षणभर बावरला
वटवृक्षावर म्हणुनि नजिकच्या तो भरभर चढला.
भुजंग भीषण तिथेंच विळखा विखारि घालुनियां
क्रूर काळसा टपलासे जणुं झणिं झड घालाया.
न कळत पडतां पाय तयावरि दंश तयें केला
गतप्राण राणुजी आदळे खालीं तत्काळा.
काळ लागला हात धुवोनी वाटे त्यापाठीं
नातरि कां हो तिथेंच व्हावी ती भुजंग भेटी.
प्रभूच सजतां मारायाला तिथें कोण तारी
इच्छा परमेश्वरी बलवती गूढरूपधारी.

*　　*　　*

मेघगर्जनेच्या तालावर बिजलीचा नाच
बरसातीचा सूर सारखा—तिरंगि जलसाच
वर्षाभूपस्वागतसमयीं सुदिव्यसंगीत

श्रवणीं भरलें—भुवनीं परि हें स्मशानसंगीत.
ओढ्याकांठीं किंजळदाटी—थाटी मुडद्यांची
घोर अवकळा भयाण पसरे स्मशानभूमीची.
विलाप दारुण करुणाक्रंदन रव ये कोठोनी
इथें प्रीतिचें प्रेत घडघडे हें अश्रूसरणीं
पसरे वटवृक्षाचा वरती विशाल विस्तार
बसे खालती दीन मंजुळा—धरि बुडता थार.
शोकाश्रूंनीं तर्पण करिते सुख सौभाग्याचें
अंकीं घेउनि शीर—अरेरे—मृत राणोजीचें.
अंतकाळची आस राहिली भेटाया तिजला
देह मृत परी तरिच थडकला तिच्याच पायाला.
कठोर दैवें राणोजीची केली अशि भेट
भरे निराशा जहरी प्याला हा कांठोकांठ.
जखमी जीवा जाळत जाई तिचिया तो थेट
भाळीं येतां बळेंच गिळणें एकेकाचि घोंट.
दुःख उमाळे उचंबळति किति—शोकाचा पूर;
कपाळ पिटिते बडवुनि घेते उद्वेगें ऊर.
" किती भयंकर वैधव्याचा हा वज्राघात ?
अतां पुरवला जरी जाहला शिरिं विद्युत्पात.
देवा ! झालें सौख्याशेचें सारें वाटोळें
आकाशींची कुऱ्हाड माझ्या शिरावरी अदळे.
कळस जाहला दुर्दैवाच्या आजि निष्ठुरतेचा

सौभाग्याचा रवि मावळला मंगल कायमचा.
दैन्यनगाच्या कडेकपारीं कुजणें नशिबाला
कां खेळविशी अजुनी देवा ! देहीं जीवाला ?
घोर पाप तव राज्यीं देवा ! काय तरी केलें
खडतर नष्टाचर्य ललाटीं तरि ऐसें लिहिलें ?
दीनवत्सला ! ब्रीद सोडिसी दीनरक्षणाचें
निघे दिवाळें पुरे काय कीं तुझिया न्यायाचे ?
दयासिंधु आटला नि ये कीं वेळा प्रळयाची ?
टाकुनि देवकळा बनासि कां मूर्ती दगडाची ?
जगीं माझ्यासम मीच अभागी हे लतिकाताई !
टिपे टपाटप कां माझ्यास्तव तूं गाळिसि बाई ?
वेरुं नको ही माणिकमोती अभागिणीसाठीं
दैव कोपलें तूं कां होसी उगीच गे कष्टी ?"
"गडे मंजुळे ! कोण शांतविल ? समदुःखी आम्ही !
प्रसंग येतां कोणाचाही उपेग नच कांहीं !
म्हणती जगतीं प्रीत वाढते प्रीतीनें जैसी
दुःखी जीवच रिझवूं शकतो दुःखी जीवासी.
हां हां म्हणतां काळवायुनें तरुनाथा नेलें
जीवाधाराचे तुटला अन् मी मातीला मिळलें !
कां लावावा देवा दुर्दैवाला बोल वृथा
अपुलें खोटें पूर्व संचितचि तें फळलें आतां.
नको मंजुळे नको करूं हा जीवाचा त्रागा

अंकीं अपुला हा शेवटला आशेचा धागा.
वदुनी ऐसें चटकन चुंबुनि ती लतिकाबाळी
पर्णकरानें प्रेमभरें जों बाळा कुर्वाळी,
तोंच हिंवानें पुरें करपलें मलूल झालेलें
तिच्या जिवाचें फूल एकची तें गळुनी पडलें.
करुण दृश्य हें बघुनि मंजुळा भानावर आली
'उदंड आयुर्दाव मम फुला घाल विभो!' वदली.
"एकचि आशा जगीं जगाया निवास जीवाला
फूल जीवाचें एकचि जळता जीव रिझायाला.
पदरीं घ्या हो छेलछबेला छकुला तान्हूला
प्रभो! कृपेची पांखर घाला बाळा सांभाळा.
देवा! चरणावरी वाहिला जीवाचा लाल
तारा मारा उचित तें करा आतां ब्रिजलाल!
ऊठ राजसा! चिमण्या राजा! कलिजा लडिवाळा!
कपाळ फुटलें तव मातेचें उघडूं दे डोळा.
दुर्दैवाचा खडा पाहरा जागे भंवताली
परिस्थितीचा वणवा भडकुनि अपणाला जाळी.
तूंच–तूंच रे परब्रह्म मज अनाथ विधवेला"
वदुनी ऐसें चुंबुनि धरिलें पोटांशीं शिशुला.
ताठ काष्ठवत कुडी राहिली प्राण उडुनि गेला
श्वास न चाले काळ झोंप ती लागे बाळाला.
रक्त गोठलें–प्राण कोंडले–बालक मृत झाला

हिरा हरपला—आशातंतू शेवटचा तुटला.
सुरी दुधारी पति निधनाची हृदय भग्न झालें
पुत्रमृत्युचें तेल तापलें त्या जाळत गेलें.
मातृहृदय तें गाइसारखा हंबरडा फोडी
" धांव वांसरा ! तुजहि न माझी काय दया थोडी.
आलें बाळा—थांबा नाथा—आतां कां घाई
सोडुनि जाणें कसें शोभतें रुचतें हें बाई !
' देवा—देवा '—म्हणे अमांताचि कवटाळी तरुला.
तिच्या धांवण्या देव धावला—ऐकुनि हाकेला
कडाड गगनीं गडाड झाले चकमकले काय ?
चंचल बिजली कडाडली त्या वृक्षावर हाय ?
दुभंग झाला भूवर पडला क्षणीं उन्मळोनीं
वृक्ष जळाला—आणि मंजुळा झणिं गेली जळुनी.
जणूं धाडिलें देवेंद्रानें देवदूतिकेला
स्वर्गीं न्याया पतिव्रतेच्या पवित्र आत्म्याला.
यमधर्माचे दिव्य पाश कीं सरसावुनि आले
जिवाशिवाची जोड कराया उत्सुक जे झाले.
राणोजीची प्रेम दीप्ति कीं ती प्राणज्योती
स्वर्गांतुनि धावुनियां आली भेटाया पुरती.
विशाल कालोदरीं दडाले तीन जीव कोठें ?
देह छिन्न विच्छिन्न मृत इथें बघतां भय वाटे.

बाइ कल्पने ! धांव तूंच ये रसिकांच्या साह्या
चित्तचक्षुला करुण दृश्य हें पुरतें पटवाया.

* * *

कशास पुसतां कुणास ' कां हा अघटित अवकाळ ?
उत्तरतो हा काळची पहा ' हा माझा खेळ '.
भरभर जाई पळत्या पायीं वळुनि बघे मागे
निंदा वंदा कुणी तयाला तो हांसूं लागे.

* * *

हरहर ! ऐशा तीन जिवांच्या तीन परी करुनी
कृतांत काळा ! कां करिसी हें विकट हास्य अजुनी ?
कितीक दिव्यें सहज दडपशी हरपे ती माव
सराव निर्ढावोनी झाला—कुठला पस्ताव ?
जा—जा—चतुरा ! चतुराई ही अघटित घटनेची
आजचीच कां दाविसि जगता नव्या नवाईची ?

# भरतवाक्य

ऐशा घोर किती कठोर जगतीं
लीला तुझ्या निस्तुला

हा ! हा ! हंत कशी न खंत तिळही
काला ! कराला तुला ?

विश्वाचा पथ कालचक्र फिरतें
नित्य क्रमें आक्रमें,

आतां दुःखतमें भ्रमे घनतमे
चित्त भ्रमे संभ्रमें.

---

# राधारहस्य.

# नमन

[ चाल—कृष्ण मुरारी० ]

वंदित अति विनय–विनत विजयद
हरि–पद शुभ–संपद–पद.
दढरत अविरत विलसत अतुल विमळ
हरि अघ–मल जडवि छंद नंद–कंद ॥ ध्रु० ॥
नव–विकसित सुमन सुमन–गुण
मृदुल विमळ करि अर्पण
भाव विरत; भान हरत; जीव झुरत.
सुख–निदान शांति–दान
सुयश–गान–सुरस–पान
मनमिळिंद करि अमंद ! वंदित० १

———

# वेणु-नाद

[ चाल-भूपती खरे ते० ]

चल-जाउं गडे साजणी ! झणीं कुंजांत
मत् प्राणविसांवा कृष्ण तिथे गं रमत.
घुमवितो कुंजवनीं मधुर वेणु-नादाला
मनमोहन हा ब्रिजलाल बांसरीवाला.
ती सगुण सांवळी मूर्ती नयनीं पाहूं
हृदयांत सांठवूं-दिव्यानंदा सेवूं.
खेळतो जीवसा सखा हरी हृदयांत
मम जीवन-काव्यीं सुंदर रस तो गमत.
हा सुगंध जीवाच्या खुलत्या कलिकेंत
चैतन्य गमे कीं या मम जड मूर्तींत.
वेणूत नादसम हृदयीं विहरत रमतो
हृदयाचा राजा कलिजा जीवा गमतो.
सानंद अमंदचि रंगुनि वेणूसंगें
तत्पदारविंदीं जीव भृंगसा गुंगे.
ऐक नां-ऐक-किती वेणू-रव सुस्वर तो
ब्रह्मांडीं नित पडसाद सुखद खुलवीतो.
विश्वें विरलीं स्वर्गिय नाद-ब्रह्मांत
ब्रम्हांड-हृदय तें प्रेमें रंगुनि जात.
बांसरी सुरलेचि गोड तिची ललकारी
झुलविते जीव मृदु नाद-तरंगीं भारी.

शुभ–धाम हृदय–विश्राम शाम अभिराम
मधु–नाम पूर्ण करि निज भक्तांचे काम.
चल–गडे ! लगबगा प्रियकर जिवलग पाहूं
वनमाली सुंदर घनश्याम हा सेवूं.
ही–नको–नको संसार–यातना कांहीं
कृष्णार्पण होउनि रिझवुं जीव लवलाही.
तोडुनी क्षणीं हें सारें माया–जाल
आत्म्याची ओळख पुरी वेणु पटवील.
सच्चिदानंद–मधु–कंद सखा गोविंद
वृंदारक–वंदित–पदारविंद मुकुंद.
तत्पदीं सकल–कल्याण–पदीं सौख्याचा
खेळतो स्वर्ग मम मंगल आनंदाचा.
सुखविषय रुचेना, कांहीं सुचेना बाई !
वेणुच्या नाद–रसिं जीव झरोनी जाई.
ही नव्हे बांसरी–जादुगिरी मतवाली
राधिका क्षणीं या वेणूरूपची झाली.
कीं माया प्रभुची वेणु–सगुणता ल्याली
मोहुनी मोहिनी ब्रह्मांडाला घाली.
जड तनू इथें परि जीव धांवला तेथें
स्वच्छंद वाजवी वेणु कन्हैया जेथें.
तो नंदबाळ लडिवाळ यशोदा–तान्हा
जणुं मंत्रबळें भारितो गोवळा कान्हा.

या नादरसाच्या मंजुळ नवथर लहरी
प्रतिरोमांमधुनी नाचति मंगलकारी.
जाहले चराचर शांत–शांति–रस पिउनी–
बेभान भावना होति वृत्ति बहिरोनी.
गिरिधारी माझा प्यार जिवाचा राजा
बांधिन तयाची प्राणसुमांनीं पूजा.
हृदयाचा राणा कृष्ण मुरारी सखये !
मुरलीधर देखाया आतुर मी चल--ये.
कां उभी अशी तूं निश्चल वेड्यावाणी
कीं जडे समाधी वेणु--नाद--रस--पानीं ?
वायूंत डोल घे लोल वेणुचा बोल
जग--गोल गुंगला परिसुनि तो बिनमोल.
हरि ताप जिवाचा वेणु--मधुर--आलाप
संसृतिचा गळला पाशहि आपोआप.
ब्रह्मांडाधिपती परमात्मा या काला
जगदुद्धारास्तव अवनीतळिं अवतरला.
मधु–मधुर–वेणु–रव–सुरस–रस–सुधा–पानीं
रत अविरत चित्त–भ्रमर गुंगला गानीं !
गुंजारव मंजुल चाले वंजुल कुंजीं
परि कृष्ण–भृंग रमला मम हृदय–निकुंजीं
बन्सीधर पाहूं छंद तयाचा लागे
शिरिं धरूं पुनित तच्चरण–रजकणाला गे !

चाहुनी जीव पुजूं हृदयीं मंगल मूर्ती
तरि भुक्ती मुक्ती खरी सौख्यसंपूर्ती.
तल्लीन सुमंगल करित दिव्य संगीत
तादात्म्य पावुनी जीव विरे वेणूंत.
हें कृष्ण स्वरुपीं सकल चलाचल नटलें
अणुरेणुंत कृष्णब्रह्मचि अवघे भरलें।
चहुंकडे कृष्ण—मधु—रूपचि खिळलें नयनीं
ऐकण्या वेणु एकत्र शक्ति हो श्रवणीं.
‘ जय कृष्ण ’--‘ कृष्ण जय ’ जप चाले हृदयांत
हो विलीन राधा दिव्य कृष्ण--मूर्तींत
कृष्णांत राधिका भक्तीमूर्ती मुरली
जगताला मेली—द्वैत भावना नुरली !

---

## विरहिणी राधा

[ चाल–अजि अक्रुर हा० ]

हा विरह कसा साहूं बाई हाय !
जीवास लागली हाय ॥ ध्रु० ॥
हे कृष्ण सख्या ! सख्याहरी वनमाळी !
धांवण्या धांव झणिं घाली
चिर विरह मुळीं असह हृदय साहीना
उत्कंठा मनिं माईना.

जड जीवित हें शून्य कसें वद साहूं
जगिं जिवंत कैंची राहूं ?
स्मृति कधिं कां नच मम होत
करुणा कशि मनिं ना येत ?
वद कुठें चित्त तव रमत ?
नच धीर मनीं नाहिं कशांतही गोडी
जाहलें तुझ्याविण वेडी.
बा ! ब्रिजलाला ! बघुनि बावरी वृत्ती
जन सारे मजला हंसती.
कुणि कींव करी, निंदिति लहानथोर
" निर्लज्ज कुमार्गी पोर "
" जन–रीत इनें सकल सोडली आज
ना जना मनाची लाज "
दुर्विलास दुर्दैवाचे
कीं पाप पूर्वजन्मींचें
अजि फळलें गमलें साचें
शिखरावरुनी अदळें सुखशैलाच्या
मी दरींत दुर्दैवाच्या !
" श्रीकृष्णाची आवडती बहुमानी
प्रीतीची चंदाराणी.
मज मानितसे अपुला ब्रम्हानंद
माझाच तयाला छंद

आधार खरा कृष्णाचि जगतीं जीवा
एकला विसांवा ठावा
जिवलग जीवाचा प्यारा
हृदयाचा कालिजा न्यारा
जीविंचा जिव्हाळा सारा
। गर्व तुझा सर्व उतरला छान
तो स्मरणहि कधिं तव करि न."
"तूं गवळ्याची साधी भोळी भाळी
पोरगी न राजस बाळी !
तो कृष्ण परी तनय नंदराजाचा
छाटका असे मुलुखाचा.
रंगेल गडी काळा अंतर्बाह्य
कपटी तुज पुसेल काय ?
तो झुरे न मुळिं तुजसाठीं
तूं निलाजरी परि मोठी
फसलीस मात्र ग फुकटी
तूं लोचट तो जरि तुजला झिडकारी
प्रीतीची रीतच न्यारी !"
"जन हंसती ग म्हणती वेडी झाली
लोकांतुनि उठुनी गेली.
ठरशिल राधे ! विफल जारिणी जगतीं
पसरेल तुझी अपकीर्ती.

जग—भरला हा स्वार्थाचा बाजार
सुजनाला करि बेजार.
तो कृष्ण बांसरीवाला
नाटकी गारुडी कुठला
सोड या दुष्ट नादाला
जखडेच गडे ! पसरुनि मायाजाल
हा गोपगोपिजन सकल."
वाग्बाण असे जहरी किती सखयांचे
हृदयास बोंचती साचे.
मर्मी सारीं झोंबति हींच सदाचीं
टोंचून बोलणीं त्यांचीं.
हा ऐकोनी भलता जनापवाद
भंगलें हृदय हो विद्ध !
विरहानलिं जळत्या ज्वालीं
काहिली जिवाची झाली
शोकाला उकळी फुटली
कंठीं येती प्राण हे क्षणोक्षणाला
डोळ्यांत जाहले गोळा.
मज वांचुनियां क्षण तुज करमत नव्हतें
कां प्रेम विलय पावे तें ?
मम छंद तसा कां लटका लावियला
आतां कां घाता सजला ?

मज लागे ती चटक मधुर मुरलीची
क्षिति आतां धरुं कवणाची ?
प्रेमनाश कैंवीं झाला ?
मम भाग्यरवी मावळला
नैराश्य–प्रळयचि आला !
मम आनंदा कायमचा हा आळा
सांवळ्या यशोदाबाळा !
हे उरले रे ! पंचप्राण नयनांत
तव दर्शन–लालस होत.
झणिं धांव–पहा जीवाचा क्षण सरता
मोहना मनाच्या ! आतां.
जळली कां रे ! माया ममता सारी
किति निष्ठुर होसि मुरारी !
बघुं नको राजसा ! अंत
मांडिला अतां प्राणांत
शोकार्त जीव करिं शांत
या डोळ्यांचें पाणि खळेना बाई !
जीवांचें पाणी होई.
डोळे भरुनी पाहिन कधिं मी तुजला
लागला घोर जीवाला.
कुरवंडोनी काया ही तुजवरुनी
ओंवाळिन या प्राणांनीं.

तव मनहारी मूर्ति हृदयिं सांठवुनि
अंतरीं निरंतर पुजुनी.
पंचारति या प्राणांची
पाजळुनि शुद्ध भक्तीची
ओंवाळिन तुज मी साची
तरि खचित मला सुख–सर्वस्वाचि घालें
जीवाचें दुःख निमालें.
तव गुण–गान श्रवण–सुभग खग गाती
आनंदीं तन्मय होती
सुमनांतूनी तव यश–परिमळ सारा
दरवळला दाहि दिशांला
खिळली खाशी मूर्ति रुचिर तव नयनीं
भासली चलाचालिं वसली
त्वद्रूप राधिका झाली !
देहभान विसरुनि गेली !
तव गुण–गानीं ही रमली
ना त्राण मुळीं–तारीं किंवा मारीं
भक्तांचा तूं कैवारी !
हीं अश्रूंचीं सुमनें करुनी गोळा
ओंवितें अतां घननीळा !
ये–घालूं दे चारुकंठिं गोपाळा !
विरहाची मोहनमाळा.

क्षणिं राधेला दिव्य समाधी लागे
कृष्ण–चिंतनीं जिव जागे.
तों मुरली कानीं आली
कावरी बावरी झाली
जीवाला भ्रांती जडली
तीं दृष्टि फिरे चंचल रानोमाळ
पाठिशीं उभा गोपाळ !
नच कृष्ण दिसे–स्वप्न सकल तें भासे
तोल जाइ शोकासरसें.
झणिं सांवरुनी पोटीं कुरवाळोनी
गाढालिंगानिं चुंबोनी.
तो कृष्ण वदे–" दास राधिके ! देख
हा पुरे–पुरे करिं शोक "
" किति खुळी बावळी तूं गे !
विफल शोक करिसी सुभगे !
जिवलगे ! जीव तव मागे
मम वास सदा भक्त–हृदयमंदीरीं
तव हृदयाच्या गाभारीं !
आनंदित हो राधा मन अवितृष्ण
एकरूप राधा–कृष्ण !
दिव्यानंदीं रंगुनि राधा जाई
दिव्यांतचि विलीन होई !

'जय गोविंद--जय जय राधा--कृष्ण'
चाललें जगाचें गान
गोकुळचा पालनवाला
तिजसाठीं धांवुनि आला
वाजवी मधुर मुरलीला
मधु--मधुर झणीं नाद--सुरस सेवोनी
ब्रह्मांड जाय रंगोनी !

---

## एकदां तरि वाजिव मुरली !

[ चाल--मन द्विधा होते० ]

अंगीं चर्चियली गोमटी उटी चंदनाची
खळी खुले गालीं उमलतां कळीच हास्याची
माथां शोभतसे किरिट हा मोर पिसाऱ्यांचा
नाम रेखियेला ललाटीं केशरकस्तुरिचा
तुरे पल्लवांचे कोंवळे खोंविसि घननीळा !
रानफुलांची ही साजरी कंठीं वनमाळा
प्रभा झळकताहे तळपत्या कानिं कुंडलांची
भारितसे जगता जादु ही हंसऱ्या नयनांची
नागबंदि शोभा झळाळे पीतांबर कांसे
कटिं कर ठेवुनियां सांवळी सूरत गालिं हंसे
तेज वदनिं खेळे आगळें कोटिरवीहूनी
हंसती दाहि दिशा कांतिनें तुझिया उजळोनी

उगाच वनमाली ! दाविसी नवीन नवलाई
शिणगार न शोभे एकल्या मुरलीविण बाई !

*     *     *

धरिं अधरीं मुरली ऊठ ना झडकरि सांवळिया !
सांग--किती विनवूं ? जीव हा शिणला बघ वांयां
मंद मधुर हंसली मृदुल कर--कमळिं खेळतांना
अधर--सुधेच्या या मधुर मधुवरी लोळतांना
हिरमुसली रुसली फुगोनी बसली--मुसमुसली
बोल कन्हैया ! कां तिच्यावर इतराजी असली ?
गोड लाळडी जी सदाची प्यारचि जीवाला
प्रेमें चुंबुनियां घालवी तिचिया रुसव्याला
ब्रिजलाला ! घे--घे-- स्वस्थ कां--मुरली वाजीव
मंजुळ बोलीची जिवाला जादू पाजीव.
गोड लकेरीची खुमारी नवलाची न्यारी
चलाचलीं खेळे प्रीतिची संजिवनी प्यारी !
जिचिया बोलानें जिवाची शुद्धबुद्ध हरली
शामसुंदरा ! ती जादुची वाजिव नां मुरली !

*     *     *

फुललें ब्रह्मांड प्रीतिनें नाद--नटी नटली
अणुरेणुंत अवघी भरोनी विश्वामधिं विरली !
मुरलि--तरंगाचा नाद--रव--तेजोरस उसळे
कण फुलले--बनलें स्वर्गिचें तारांगण सगळें !

बोल तरळती हे मुरलिचे—गगनीं नक्षत्रें
बाल्याचीं स्वप्नें प्रीतिचीं कीं हंसरीं चित्रें !
अनंत अज्ञेय प्रगटलें; अव्यक्तहि खुललें
मायेचे पडदे गळाले ! द्वैत—पाश तुटले.
विश्ववृत्ति बहरे महिरली मुरलीच्या नादीं
भाव अचेतन ते उमलले घुमत्या पडसादीं
अणु हृदयामाधिं या भक्तिचीं ब्रह्मांडें भरलीं
सुकतिल बघ—जरि ना मुरलिची संजिवनी घाली.
जीवाची मुरली छेडितां भक्तीच्या गाना
किती अळवूं अजुनी ? दाटल्या करुणेच्या ताना !

* * *

वृंदावन सुकला ? कुंजवन उदास गहिंवरलें
नयन फुलांचे हे हांसरे दवाश्रुनीं थिजले !
बन्सीधर ! कां रे पाहसी आज असा अंत
मावळली माया मुरुंदे राधा मुरलींत
शून्यवृत्ति बनली प्रीतिला बघ फुटला पान्हा
मोलाचा देते जिवाचा नाजुक नजराणा
स्वर्ग--मोक्ष--मुक्ती नको ब्रह्मांड--राज्यपदही
परब्रह्म अवघे दुजे नच मुरलीविण कांहीं
नादब्रह्मीं या रंगले सप्तलोक तरले
सप्तसूर घुमतां मुरलिचे ज्ञाणिं पावन झाले
करि करुणा कृष्णा ! जिवाचा क्षण सरता आला
बिरुदावलि अपुली मुकुंदा ! पटवीं जीवाला.

ऊठ राजसा रे ! एकदां तरि वाजिव मुरली !
पाजिव शांति--सुधा विनवुनी तुज राधा झुरली !

---

# राधा–माधव

[ चाल---नृत्यममता. ]

राधा:—चल-मार्गांतुनि हो दूर। जाउंदे जाहला उशिर। माधवा! ॥ध्रु०॥
कुंजांत फुलें वेंचाया। केव्हांची आले वांया। श्रीहरी!
अर्धाच उरे हा आतां। म्हणिं हार गुंफुनी पुरता। झडकरी
मनिं परतायाचा हेतू!। अवचीत कुठुनि येशी तूं। वद परी
॥चाल॥ खुणविसी। करूं गत कशी। हंसुनि हिणविसी।
उगिच कां छळसि। उगिच कां छळसी
एकांतिं गांठुनी मजसी। ही अशी!

* * *

माधव:—अति आतुर भेटायाला। हा दास धांवुनी आला। राधिके!
नच धीर--न लावि विलंबा। दे एकच साखरचुंबा। मज सखे!
आलिंगुनि कंठीं घाल। प्रेमानें मोहनमाळ। ही सुखें
॥चाल॥ मधिं बोल। प्रीतिचा बोल। गोड अनमोल।
सोड हा राग। सोड हा राग
उसळुंदे प्रीत--रस--रंग। तो तुझा!

* * *

राधा:—अडदांड धीट तूं फार। कुळवंती नाजुक नार। मी परी.
कशि लाज तिळहि नच तुजला। झटसि कीं असा अंगाला। बहुपरी.
जन--रीत तुला नच कांहीं। अब्रूची चाडच नाहीं कशि तरी!

॥चाल॥ निरुपाय। जाहला हाय!। धरुनियां पाय।
विनविते तुजला विनविते तुजला
हो दूर--जाउंदे मजला। माधवा!

*   *   *

माधव:--चल--जा तर अपुल्या वाटे। हृदयांत कोंबसी कांटे। निष्ठुरे!
जीवतोड झाली पुरती। जा फिकिर तुझी या पुढतीं। मज नुरे-
प्रेमाची सलगी सरली। जीवाची वृत्ती फिरली। हें खरें-
॥चाल॥ तुजहुनी। प्यार गुणखनी। मुरलि--मोहिनी।
चुंबुनी इजला। चुंबुनी इजला
रिझविन मी शून्य जिवाला। राधिके!
राधा:--करिसी कां प्रीती--लोप। उसना हा माझा कोप। नेणसी?
हृदयास जाळि हुरहूर। मजपासुनि कां रे! दूर। ठाकसी?
प्रीतिचा फुलता बाग। खुलवितो राग अनुराग। जाणसी-
॥चाल॥ बावळी राधिका खुळी। कपटि नच मुळीं।
क्षमा करिं आतां। क्षमा करिं आतां
मी विनोद केला भलता। माधवा!
कां असा ठाकुनी दूर। मुरलीचे छेडिसि सूर। मनहरा!
मधु--मधुर--नाद--ब्रह्मांत। रंगला जीव हा विरत। सुंदरा!
यक्षिणिची कांडी हंसरी। जादुतें जीव हा भारी। प्रियकरा!
॥चाल॥ मोहिनी। नाद--नंदिनी। करि भुलावणी।
हरितसे भान। हरितसे भान
कुणि घ्या ना हिसकावून। ही अशी!

*   *   *

**माधवः**—हां—दूर—दूर सर मागें । तुटले प्रीतीचे धागे । आपुले.
कळली तव कपटी रीत । दावुनियां लटकी प्रीत । वंचिलें.
दिल्लगी सरे प्रीतीची । दिल्जमाई आतां कैंची । चंचले !
॥चाल॥ नव नार । दावि शृंगार । झुलविते फार ।
कसब परि चोर्त्तिं । कसब परि चित्तीं
प्रेमी जन फसती अंतीं । राधिके !

* * *

**राधाः**—प्रीतीची मंजुळवाणी । हरि ! तुझ्या गुणांचीं गाणीं । गातरे !
ही राजस राधा--बाला । मथुरेच्या बाजाराला । जात रे !
जमवुनियां गौळणमेळा । थाटांत तशा घननीळा ! । सुख भरें.
॥चाल॥ मागुनी । हळुच येउनी । देसि ढकलुनी ।
फजीती करसी । फजीती करसी
गमतिची खुलावट खाशी । खुलविशी.
घट डोईवरला भरला । मारुनी खडा फोडियला । काल ना ?
तनु भिजली किति कांकडली । थंडीनें हिंवली भरली । मोहना !
परि तशीच ओलेत्यानें । गुंगलें वेणु--नादानें । मीच ना !
॥चाल॥ किति असें । जडविलें पिसें । मोह--मधु--रसें ।
प्रीतिचा खेळ । प्रीतिचा खेळ
साहिला उगिच गोपाळ ! । कां तरी ?

* * *

**माधवः**—का अझुनी झुलविशि मजला । तव भाव मनींचा कळला । नागिणी !
मी कांबाळिवाला काळा । गौरवर्ण राजसबाळा । तूं गुणी
श्रीमंतिण तूं परनार । गवळ्याचा मी हा पोर । साजणी !

॥चाल॥ हिरकणी । जिवाची गुणी । चटकचांदणी ।
उधळते प्रीत । उधळते प्रीत
रस–रंग नवतिचा फुलत । नवल हा !
विलगतां जिवाला जवळी । वारुळिंची नागिण पिंवळी । मारते-
अस्मानीं जळती ज्योत । भेटतां तिची ती प्रीत । जाळते-
हा गुलाब गहिरा फुलला । कांटेरी विष जीवाला । झोंबते-
॥चाल॥ जा–तरी । न नटवेगिरी । जहर माधुरी ।
दावि मायेची । दावि मायेची
दिन दुनिया झुलवायाची । राधिके !

* * *

राधाः–जगताचा तोडुनि पाश । दिनरात तुझाची ध्यास । घतला-
तुजपायीं जननिंदेची । प्यालेंच आग दुःखाची । प्रेमला !
सांडली जिवाची आस । साजरा स्वार्थ-संन्यास । सजविला !
॥चाल॥ वाग्बाण । विषारी जाण । करिति हैराण ।
हृदय भेदून । हृदय भेदून
बघ–भिडति जिव्हाळीं पूर्ण । जाळती.
हृदयाच्या रसमंदारा ! । जीवाच्या जादूगार ! । केशवा !
सांवळी सुरत जादूची । खेळे नयनीं नवलाची । माधवा !
जीवाच्या जमल्या नजरा । द्वैताला कुठला थारा । तेधवा
॥चाल॥ जगदीश । तूंच परमेश । मनोमन खास ।
खूण ही पटली । खूण ही पटली
ब्रह्मांडाचा तूं वाली । माधवा !
नाशवंत काया दुबळी । पतिदेवाला अर्पियली । मी जरी

जिवावर सत्ता साची । तुजविणा नसे इतरांची । श्रीहरी !
बघ, जीव जाहला गोळा । कां मिटसि दयेचा डोळा । सुखभरीं
॥चाल॥ मज तारिं । क्षणीं वा मारिं । दडवि दिलदारी
शरण चरणास । शरण चरणास
हीं जीवफुलांची रास । उधळली !

* * *

माधवः—ये ऊठ लाडक्या जीवा ! । मोलाचा प्रीती ठेवा । तूं मला !
जीवाचा जोडीदार । सांवळा प्रीति सरदार । मी तुला !
प्रेमळ ही फिरकी नजर । कां भिजे ? कुशंका कहर । माजला
॥चाल॥ जिवलगे ! । जीव तगमगे । हंसुनि हंसावि गे ।
करिन मी न तरी । करिन मी न तरी
अधरांची नाजुक चोरी । ही अशी !

---

## राधा-रंजन

[ चाल-केशव करणी अगाध० ]

कृष्ण:—चांदरात उजळली चांदणें भल्या बहरिचें फुलें
झोक चंदेरी झकपक झुले !
शांत—कांतिचा उधळि दिगंता जादूचा धवलिमा
चमकिचा चढत्या हा चंद्रमा
उसळुनि ये खैरात खुषीची खुलत खुलावट कशी
खुमारी अजब नवतिची जशी

॥चाल॥ रसरंग डंवरला इष्की दुनियेवरी
दिलरंग बहरला उसळुनि ये वरिवरी
आनंद महिरला रसरसला रसभरी
तुफान तुंबळ उचंबळे हा दिलदरिया खवळला
दाटला प्रीतपूर लोटला ॥ १ ॥
राधा:—जाइजुईची शेज फुलांची रचतांना मंदिरीं
जादुची कानीं ये बांसरी.
वृत्ति सकळ बेभान उसळल्या; जीव धांवला त्वरें
मोहना ! वेडी बनलें कि रे !
प्रहररात्र लोटली कन्हैया ! चंद्र डोइवर ढळे
लागली हुरहुर मानस जळें
॥चाल॥ हा नजरबंदिचा खेळ खेळुनी कसा
लाविला जिवाला फांस सख्या ! राजसा !
प्रीतिचा ठसा करि जीवाचि वेडापिसा
कुलजाची भारजा भारिली भूलफेंकिनें तुवां
डाव हा नवलाइचा नवा ॥ २ ॥
कृष्ण:—चल—वृंदावनिं रास रचूं या—कुंजवनिं खेळुंया
प्रीतिच्या नवरंगीं रंगु या !
फुलत्या फुलवंतिचा फुलवरा चढविन माथ्यावरी
पुजिन ही भावें हृदयेश्वरी !
नाचरंग रंगांत उसळत्या जमुना जलवंतिचा
लुटूं चल—मजा आज होरिचा !

॥चाल॥ वनवायु उधळितो गंध मंद शीतळ
हा निर्झर गातो मधुर गीत झुळझुळ
फुलवेल तरुसि बिलगते प्रेमविव्हळ
विरहाश्रूंची मोहनमाळा चक्रवाक जपतसे
प्रीतिचें जिवास जडलें पिसें ॥ ३ ॥
हृदय रिझेना येथ तिळभरी स्वर्गलोकिं चल तरी
सेवुं या विलास नानापरी.
स्वर्गंगेच्या हिंदोळ्यावर जीव झुलवुं घडिभरी
उधळुं या प्रीत दिव्य भूवरी !
वेंचुनि ताराफुलें रचूं या सेज साजरी भली
बिछाइत अस्मानी मखमली.
॥चाल॥ फेंकला नभांगाणिं इंदु कंदुकापरी
झेलुं या झुलवुं या तसाच वरच्यावरी
मग बघतिल टकमक या तारासुंदरी
लावण्याची प्रभा झळकती निरखुनि तुझि गं अशी ।
लाजतिल झट रंभा उर्वशी ॥ ४ ॥
दिलादिलाचा बाग बहरला फुले प्रीत–वाटिका
रंगली ही जीवित–नाटिका
ब्रम्हांडाची मधुर बांसरी मंजु नादल्यामुळें
प्रीतिनें सप्तलोक फुलविले
सूर शांतिचा घुमत राहिला खुलली तेजाळची
पोकळी अनंत आकाशिंची

॥चाल॥ तूं तूंच अप्सरा स्वर्गींची शापिता
भूवरची तूंची मंगल वनदेवता
कीं नागकन्यका पाताळिंचि तत्त्वतां
जीवकळा जीवाची माझी जादु जीवनांतली
प्रीतिची पावन परमेश्वरी ॥ ५ ॥
लीला—लालस लाला सजला तुला रिझविण्या खरा
मनींचें कोड पुरवुं दे जरा
तुझ्या प्रीतिचा छेलछबेला अलबेला रंगला
दिलाचा देव सगुण सांवळा
बोल—अबोला सोड—प्रीतिचा बोल सुधेचा झर
मनाचे कान भारुं दे जरा
॥चाल॥ कां रानमाळ नाचते नजर नाचरी
रानांत एकल्या चुकल्या हरिणी परी
भीतिनें भेदरे भांबावुनि बावरी
चाले कां चळकांप छातिचा ? अडला ओंठावरी
फुटूं दे बोल जरा बाहिरी ॥ ६ ॥
राधाः—पतिवांचुनि नच दैवत दुसरें सतिला जगतीं खरें
चतुर तूं—जाणसि मनिं हें पुरें
पतिदेवाच्या पदीं खेळती—स्वर्ग—मोक्ष सकळही
लोळती पद—धूळींत अहिमही
पाय जिथें नच पति देवाचे—नरक खास भासला
क्षणाचा वास जाळिलाचि मला

॥चाल॥ पतिराज पूज्य कुळदैवत मंगल मला
आराध्यदेवता तूं ! मी भजते तुला
परि कुळस्वामि पतिदेव आधिं पूजला
प्रीत जडे दिल्दार दिलवरा ! खरी तुजवरी परी
अढळ मम भक्तिभाव पतिवरी ॥ ७ ॥
तुझ्या संगतीं जीव जमेना, चित्त रमेना मुळीं
खुलेना पतिदेवाविण कळी
भक्तीचा भगवंत, जिवाचा जगन्नाथ तो मला
सुखाचा सर्वेश्वर शोभला
बरें बुरें तूं समज कसेंही. सोड—मला जाउं दे.
सेवुं दे पति—पद मंगल मुदें
॥चाल॥ या अनंत आकाशांत आणिले कुठें !
गोकुळ—वृंदावन—कुंज—यमूना कुठें !
हें स्वप्न—सत्य कीं ! फुलती जादू नटे !
मोहनास्त्र आंवरी—विनविते रासबिहारी ! तुला
दावें पतिदेवमूर्ति झणिं मला ॥ ८ ॥

*  *  *

कृष्णः—पहा—पहा तर नयन उघडुनी पतिची मूर्ती झणीं
घेइं निजरूपहि तूं निरखुनी
योग—याग—जप—तपासही जें, युगानुयुग दुर्मिळ
दिव्य दर्शन घे हें सोज्वळ
अनंतलीला—लाघव माझें प्रगट करावें तुला
हेत हा मनांत मी बांधला

॥चाल॥ मी अनंत कोटि ब्रह्मांडांचा धनी !
राधाः—ही अंतरसाक्षा पुरी उमटली मनीं
कृष्णः—तूं धन्य ! धन्य तव पतिनिष्ठा साजणी !
राधाः—नको—नको—रे देवा ! जडवूं भ्रांति अतां वाउगी !
कृष्णः—खेळते माझी मायां जगीं ॥ ९ ॥.

---

## राधाराधन

( चाल—उद्धवा शांतवन० )

यदुनाथ ! वाट किती पाहूं      कुठवरी निराशा साहूं ?
किति करुं आळवणी वांया      सांग—सांग यादवराया !
तुज थोरं राज—पद मिळतां      विसरलास माया—ममता.
पोसली जिला गरिबींत
वैभवीं विसरणें प्रीत
ही नसे भल्यांची रीत
जोडुनी नवे प्रिय मेळे      तोडिसी जुने जिव्हाळे ॥ १ ॥
द्वारकापुरी सोन्याची      ती साक्ष स्वर्ग शोभेची
वसवुनी सागरीं खाशी      लोळसि सुख—भोग—विलासीं
परि गोकुळ गोधन—राशी      ही ओस पडे दुर्वेशी
फुललें पहिल्या प्रीतिचें
हें नंदन आनंदाचें
गोकुळ ! मंगल जगताचें !
तुज आठव नाहिं कसा रे !      कशि भूल जडे कंसारे ! ॥२॥

किति नाचत असतिल भंवतीं भिंवईच्या तालावरतीं
दासदासि जोडुनि हात झेलण्या शब्द दिनरात
त्वत्कृपाकटाक्षासाठीं तळमळति जिवांच्या कोटी

परि प्रेमळ साधा भोळा
हा गोकुळिंचा बघ मेळा
गोपी गोपांचा सगळा

निःस्वार्थवृत्ति दिलदार तुज नाहिं कुठें मिळणार ॥३॥

या सहस्र सोळा देख अष्टोत्तर शंभर एक
रंगल्या नव्या प्रीतीच्या नारी सेवेसि जिवाच्या
रुक्मिणी—सत्यभामाही लाडक्या प्रणयिनी दोंही.

परि भोळी भाळी राधा
केलिस जिस मोहन बाधा
चालली तिची ही त्रेधा

तव दृष्टि वळेल कशास ? रमसी वैभव—शिखरास ॥ ४ ॥

वैभवांत चढत्या यात्रा गरिबांचा कोणा केवा ?
राजशाहि धुंदी चढली ही भूल नशेची जडली
गणगोत सोयरे धारे वैभवीं विसरती सारे

हा दोष तुझा नच कांहीं
हा न्याय जगाचा पाही
गरिबीला तुडवित जाई

भाळांत लिखित लिहिलीं भोगाविण नाहीं चुकलीं ॥५॥

हा वृंदावन फुललेला बहरलाच पहिल्यावाणी
फुलवेलि तरूवरि चढल्या फुलभारानें या लवल्या
ताटवा गुलाबी गहिरा ये तसा मोगरा बहरा
किति खेळ खेळलों येथें
रिझाविण्या एकमेकांतें
स्वर्गाचें स्वप्नच का तें
हें स्मशान—! टाहो फोडी जोगिण मी भटकें वेडी ॥६॥
दुःखानें हृदयीं कढती हीं गाइवासरें रडती
रानांतील राघूमैना तळमळती—झाली दैना !
या कुंजवनाचा थाट ! कांटेरीं जंगल दाट !
हरपलें तेज विश्वींचें
करपले मळे प्रीतीचे
भेसूर निराशा नाचे
तुजसवें सकळ मावळली चेतना चालती झाली ॥७॥
खळबळ तें गाणें गाई शोकानें यमुनामाई
उमटलीं पाउलें दिसती दुथडींच्या रानाभंवतीं
नजरेंत नाचते मूळ जागजागिं तुझि वेल्हाळ
खेळलास येथें खेळ
चारल्या धेनु गोपाळ !
गेलाच सुखाचा काळ
दाविला पराक्रम थोर लाविला आज परि घोर ॥८॥
गोशाळा असातिल बाइ ! ते तसे गौळवाडेही

विस्तीर्ण बगीचे भंवतीं ! कारंजीं थुइथुइ उडती
आनंदाची लयलूट ! नाहींच कशाची तूट
वैभव तें देवेंद्राचें
साम्राज्य जणूं स्वर्गाचें
लोळतें पदीं तव साचें
सर नाहीं परि यायाची गोकुळच्या आनंदाची ॥९॥
श्रीरंगा ! तेथें कुठचा नवरंग रास लीलेचा
फावतें कधीं का तुजला आळविण्या मधु मुरलीला
मिळतें का तुज यदुराया ! दधि गोरस चोरुनि खाया
ही दासी शृंगाराची
रसराज्ञी कीं प्रीतीची
राधिका तुझ्या जीवाची
आहे का कोणी तेथें रिझविण्या त्रस्त जीवातें ॥१०॥
ये पहांटचा वर तारा गगन-रंग उजळे सारा
मधु मंद गुलाबी झुळुक वाऱ्याची देई हरिख
गुंगतीच साखरझोंप ये जिवास हळवा हुरूप
मधुचित्र बाळलीलांचें
डोलतें मनामधिं साचें
हालतें जिवाभावाचें
तरळतां सुगंधी स्वप्नें बहरती स्मृतीचीं रानें ॥११॥
उकलतां स्मृतीचे पडदे खुलतील नव्या आनंदें
गोकुळिंचीं दृश्यें गोड ! ते खेळ विलासी गोड !

मोहना ! द्वारकाधीशा ! राधेच्या मानसहंसा !

आनंद नसे विभवांत !

परि जिथें खेळते प्रीत

विलसेंत स्वर्गपद तेथ !

अनुभूती हीच जगाची शिकवण तुज या राधेची ॥१२॥

---

## राधा-रहस्य

[ चाल---चंद्रकांत राजाची० ]

" हार कुणास्तव सखे ! गुंफिसी हा गेंदेदार ?
वाट कुणाची बघसि लाडके ! चढवुनि शृंगार ?
नव्या नवाईच्या आनंदें खुले जीव-कलिका
फुले प्रीतिचा हार-हांसरी छबि वासंतीका !
भल्या बहरिची बढत्या बहरे नवरंगें नटली
खुल्या दिलाची बागशाहि ही मंगलता ल्याली
फुले प्रीतिचा असा फुलवरा-वाहुनि कोणाला
मलाच नां रिझवाया झटसी-अजि या अनयाला-!"
" जीवफुलांची फुले वाटिका-नाथ-! सदाची हीं
अपुल्या या शुभ-चरणधुलींतचि--संशय कां बाई !
मानसपूजा प्रीतीची ही चाले दिनरात
चरणाची दासी ही अपुली प्रेमपाठ गात.
दीनबंधु करुणासिंधू तो बंधुराज माझा
अवतरला कान्हा साधाया सकललोककाजा

कृष्णसखा तो विलसत राणा या त्रैलोक्याचा
हार गुंफते—प्रिया !—तयास्तव जीवाभावाचा
पहा—अहा ! या प्रेमें फुलल्या—सोनकळ्या हंसती
प्रसन्नतेची सहज उसळली नवलांची कांती !
कृष्णसख्यानें नाथ ! मर्दिलें आज कालियाला
हार गुंफते प्रेमें पुजण्या विजयी वीराला ”
“ काय बोलसी—? निर्लज्जे ! हा हार तयासाठीं
पोर गुराखी गाई वळतो जो यमुनाकांठीं ?
देव काय तो ? काळा फत्तर ! कपटमूर्ति कृष्ण
दुनिया वेडी ! तिज दिसते दगडांतहि देवपण !
गत जन्मींची वैरिण तूं मम; पापांची खाणी
निष्ठुर—नटवी, वंचिसि मजला काय असें वदुनी ?
सहज बोलसी परी नागिणी ! जहर जाळतें हें
जबर जखम जीवास जाहली, तळमळतों दाहें
प्रीति—विषय पापिणी ! नाटकी कृष्ण तुझा जार
कपटजाल पसरुनी मारितो परक्याची नार—”
“ नाथ—नका करुं अभद्रनिंदा—कृष्ण खरा देव
पवित्र जिव्हा नका विटाळूं; होइल पस्ताव
मुरली ज्याची विश्वमोहिनी विश्वाला भारी
चलांचलांतिल फुले चित्कला घुमता मनहारी
नाम जयाचें पावन मंगल त्रिविध--ताप--हारी
रूप जयाचें नयनमनोहर मोहक सुख—कारी

दिगंत उजळे नाथ ! ज्याचें विमल कीर्ति तेज
पुण्यात्मा मुरलीधर सकलां गमत देवराज
ओंठावरचा नाहिं वाळला पुरा जारही जो
दैवी शक्तीनें असुरांचा नाश करी परि जो
पराक्रमाची--देवपणाची जिवंत साक्ष दुजी
याविण हृद्येश्वरा ! कोणती अखिल जगामाजी ? "
" पुरे-पुरे कर-- दुष्ट डांकिनी ! काळें कवटाळ
रंगढंग दावुनी असे का पापें पचतील--- ?
धन्य तुझ्या काळ्या हृद्याची ! किती निपट धीट
वैऱ्याचे मम माझ्या जवळी गासी स्तुतिपाठ
आण--आण--तुडवितों पदीं या हा पापी हार
गेला--मातीला मिळला--........ !"
" हाय ! हाय ! केलेंत काय हें--भलता अविचार
निष्ठुरतेनें पायिं तुडवला जीवाचा हार !
पहा--नाथ ! हांसती अझोनी फुलें गोजिरीं हीं
"राधा देवी पापी नाहीं"--देत जगा ग्वाही !
प्रेमाचा दरवळे यांतुनी परिमळ दिव्य अहा !
कृष्णमूर्ति मज दिसे ठाकली फुलाफुलांत पहा !
अणुरेणुंत अवघा भरलेला कृष्णदेव माझा
तेजबळें खल--मतिला नमवी--जग बांधी पूजा
" कुठें--कुठें तो दावि मला गे ! तुझा कृष्णदेव
खंजिर घेइल जहरी हा तत् हृद्याचा ठाव

त्रिखंड धुंडाळुनी काढतो हुडकुनि तो चोर
दडेल कोठें किती पळपुटा तो कपटी जार !"
"वेड्या अनया ! कुठें धांवसी शोधाया मजला
वैरी तव ना--कृष्ण मीच हा--बघ येथें आला
श्रमी कशाला वृथा जिवाला करिसी हैराण
ये--ये--चालिव खुशाल खंजिर--घे माझे प्राण
कुठें लोपला क्षणापूर्वींचा चढता आवेश
गळला खंजिर--क्षणांत कैंचा क्रोधानल--नाश !"
"नको कसोटी क्रोधाची तूं बघूं नाटक्या ! रे"
वृथा कशाला हसुंनि हिणविशी ? सोड अतां चाळे
"नाथ--आंवरा हात--जीव घ्या राधेचा आतां
परी नका वरुं घोर निरय--गति, जोडुं आत्मघाता"
"सोड राधिके ! अनयाची या लोपूंदे भ्रांती
दिव्यप्रीति अपुली होइल जगांत जयवंती
ये--ये--अनया ! आत्मघात करि ! कां मागें फिरसी ?
वेड्यावाणी दाहि दिशेला नजर नांचवीसी !"
"अनय कृष्ण कीं—कृष्ण अनय हा—चहूंकडे कृष्ण !
राधिकाहि मज कृष्णाचि भासे—चहूंकडे कृष्ण !
कृष्णाचें हें घोर कुटिल सारें कारस्थान !
भ्रांती जडली या अनयाला—मायेचें स्वप्न !"
"नयन उघडुनी अनया ! बघा या कृष्णाचें रूप !
विफल मोह कां पडे ? निरासचि हो आपोआप.

विराटरूपीं माझ्या बघ हीं ब्रह्मांडें कोटी
मंडन जगतीं--खंडित खलमति--मी हा जगजेठी
राधा माझी दिव्य प्रतिची मंगल खाणी
भावबळें वश करिते मजला ! लोकीं धन्य ! तिन्हीं
भक्तीचा मी सदा भुकेला दावी नव -लीला
कशी कळावी माया माझी पापी जगताला ?
भक्त--मुकुटमणि राधा--रमणी ! यश हें जगिं कोंदे
भक्तिब्रह्मांडाच्या ब्रह्मानंद--पदीं नांदे !
प्रेम--दीप जगिं दिव्य उजळितो भक्तीचा मार्ग--
प्रेमपंथ दावितो जगाला मोक्षाचा स्वर्ग !
राधा माझी गुरुदेवी ही मार्ग जगीं दावी
दैवी तेजासही इचें हें भक्ति--तेज नमवी !
राधा--देवी--वंदन ऐसें सुखवी जीवाला
परब्रह्म मी तरि मायावति ही--जननी सकलां
आधीं वंदुनि राधादेवी जग मग वंदि मला
राधेचा अधिकार जगाला आज पुरा पटला.
' राधा--कृष्ण ' असेंच गाति हे माझे जगिं भक्त
राधेच्या भक्तिनेंच महती कृष्णाची बढत.
एक -जरा--ही माझी मुरली हेंच जगा सांगे--
' राधा--माधव नटत दिव्य या प्रेमाच्या रंगें !
मुरली नादें विश्व भारिलें, आनंदें डोलें
' जय जय राधा--कृष्ण' गीत शुभ जगतीं दुमदुमलें !

श्रीकृष्णार्पणमस्तु ! शुभं भवतु ! !

# याचना

[ भैरवी—चाल–प्रातःकाळ हा होय सुंदर० ]

आनंद--चिद्घन ! श्रीहरी ! करि वंदना यदुनंदना !
धांव मुकुंदा ! हे गोविंदा ! सौख्यकंद खलकंदना ! ॥ध्रु०॥
करुणावरुणालय ! शरणागत—भव--भय--हरणा ! केशवा !
करि मद--मारण षडरि--विदारण अभय--सुवितरण माधवा !
जनन मरण हरि भ्रमणाचि दारुण भक्त--रक्षण--परायणा !
संसृतिबंधांतुनि मतिमंदा सोडवुनी नारायणा !
तव गुण--गानीं मधु--यश-- पानीं जीव निशिदिनीं जागुं दे.
मनोमिलिंदा छंद अमंदाचि पदारविंदीं लागुं दे.
विमल चरित तव पतित--पावना ! मंगल पथ उजळीतसे.
नमवुनि खल--मति सुखवुनि वसुमति सुमति जगतिं उधळीतसे.
प्रबलचि खल--बल--छल श्रीरंगा ! शमवुनि दे ज्ञानांजना
शांति—सुधा—मय करिं वसुधा--तल भ्रमभंजन ! मुनिरंजना !
राधाधर--मधु--मधुर--सुधारस--पान--निरत मुरलीधरा !
वंजुल कुंज निकुंजीं मंजुल वाजिव तशि मुरली जरा !

REFBK-0003727

REFBK-0003727